Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

04
१३२ लो

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

लोकशिक्षण कार्यकर्त्यांची मार्गदर्शिका

लोकशिक्षणाची रूपरेषा

—— कर्णिक-शुक्ल-थोरात

किंमत १ रु. ७५ नये पैसे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

लोकशिक्षण कार्यकर्त्यांची मार्गदर्शिका

लोकशिक्षणाची रूपरेषा

– लेखक –

वासुदेव बळवंत कर्णिक

लोकशिक्षण अधिकारी महाराष्ट्र, पुणें.

नारायण गोविंद शुक्ल

शंकर लक्ष्मण थोरात

एकमेव विक्रेते : **नेर्लेकर बुकसेलर्स,**

बुधवार चौक, पुणें २.

किंमत : १ रुपया ७५ नवे पैसे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

: मुद्रक :
व्ही. आर. शिंगरे,
सर्वोदय मुद्रणालय,
४५० बुधवार, पुणें २.

54135

: प्रकाशक :
व्हीं. आर. शिंगरे,
विद्या प्रकाशन,
४५० बुधवार पुणें २.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दोन शब्द

लोकशिक्षणाचें कार्य सुरू होऊन आज दहा वर्षे होऊन गेलीं. प्रथम साक्षरता एवढेंच ध्येय होतें, परंतु आज लोकशिक्षणाचें स्वरूप बरेंच व्यापक झालें आहे. प्रौढांचे जीवनास उपयुक्त होणारें तें लोकशिक्षण असें तें स्वरूप आहे. भारतांत अज्ञान फार. अज्ञानाबरोबरच दारिद्र्यही मी म्हणून पावलें टाकीत आहे. अज्ञान आणि दारिद्र्य एकमेकांवर अवलंबून असल्यानें दोन्ही आपत्तींना तोंड देण्याचा सरकार प्रयत्न करीत आहे. सरकारच्या पैशानें हें काम होणार नाहीं. देशाच्या उन्नतीसाठीं 'लोक–शिक्षणाचें' साधन कुशलतेनें वापरणाऱ्या सर्व थरांतील कार्यकर्त्यांची आज जरूर आहे. विशेषत: जनतेला शिक्षण देण्याचें ध्येय ज्यांनीं स्वीकारलेलें आहे, अशा शिक्षकांवर अधिक जबाबदारी पडते, हें जरी मान्य केलें, तरी सर्व समंजस नागरिकांनीं या प्रश्नाकडे आपलेपणानें पाहून थोडें लक्ष दिल्यास मोठें देशकार्य होणार आहे.

लोकशिक्षणाचें कार्य योग्य प्रकारें व्हावें यासाठीं उन्हाळ्याच्या सुट्टीमध्यें जिल्हावार ट्रेनिंगचे वर्ग भरविण्यांत येतात. यावेळीं त्यांना जी माहिती देण्यांत येते ती या 'रूपरेषा' या पुस्तकांत देण्यांत आली आहे. ट्रेनिंगचे वेळीं दिलेली माहिती सर्व कार्यकर्ते नीट उतरून घेत असतीलच, हें संभवत नाहीं. प्रत्येक कार्यकर्त्याच्या हातामध्यें 'रूपरेषा' पाठ्य पुस्तक म्हणून दिल्यास ट्रेनिंग अधिक परिणामकारक झाल्याशिवाय राहणार नाहीं, असा विश्वास वाटतो. गेल्या दहा वर्षांत अशा तऱ्हेचे अनेक ट्रेनिंगचे वर्ग ज्यांनीं चालविले अशा तीन अधिकाऱ्यांनीं आपल्या अनुभवाच्या कसाला लावून जें खरें दिसलें तेंच येथें मांडलें आहे.

लोकशिक्षण हें प्रौढांना द्यावयाचें असल्यानें तें इतर प्राथमिक, दुय्यम– शिक्षणापासून वेगळें करतां येत नाहीं. कोट्यावधि रुपये खर्च करून सरकारनें अनेक वर्षें प्राथमिक शिक्षण जनतेला दिलें आहे. परंतु हें शिक्षण पुरें झाल्यावर मुलें जेव्हां संसारांत पडतात, त्यावेळीं तें विसरलें जातें. जीवनांत शिक्षणाचा उपयोग या मुलांना करतां येत नाहीं व त्यांच्यावर सरकारनें खर्च केलेला पैसा फुकट जातो. प्राथमिक शिक्षण घेऊन बाहेर पडलेलीं मुलें गांवच्या वाचनालयांत वाचूं लागतील, आपल्या शेजारच्या प्रौढांना शिकवतील व स्वत: आपलें ज्ञान वाढवतील, तर गांव झपाट्यानें साक्षर होईल, इतकेंच नव्हे तर, आपले सर्व व्यवहार ते डोळसपणानें करूं लागतील. सरकारच्या पंचवार्षिक योजना अधिक

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

यशस्वी करण्यासाठीं अशीं डोळस माणसें खेड्यापाड्यांतून आज निर्माण व्हावयास पाहिजेत.

सरकारच्या सर्व खात्यांच्या अधिकाऱ्यांचा इतकेंच नव्हे तर, डॉक्टर, वकील यांसारख्या थोर नागरिकांनींहि वेळांत वेळ काढून या प्रौढांचे वर्गांना भेटी द्याव्यात. लोकशिक्षणाच्या शाळा म्हणजे ग, म, भ, न शिकविण्याकरतां दोन दिवस उभे केलेले वर्ग, असें न समजतां, भारतमातेच्या कपाळावरील निरक्षरतेचा डाग पुसून टाकण्याकरतां मनोभावानें चालविलेले प्रयत्न आहेत, असें प्रत्येक नागरिकानें समजून या कार्यास मदत केली पाहिजे.

लोकशिक्षण हें सर्व पुढारलेल्या देशांतही सतत चाललेलें आहे. आपल्यालाही तें अखंड चालवावें लागणार. सर्व शिक्षणाला जर शंभर रुपये खर्च होतात, असें धरलें तर, केवळ एक रुपया लोकशिक्षणासाठीं खर्च होतो. हा खर्च बंद करून प्राथमिक शिक्षणाचा गाडा मोटारचे वेगानें धांवणार नाहीं, हें अजाणत्या टीकाकारांनीं लक्षांत ठेवावें. लोकशिक्षण जर अयशस्वी झालें, तर त्याचा दोष धडपड करणाऱ्या दोन लोकांवर नसून, दुरून मजा पाहणाऱ्या नागरिकांवर आहे, असें आम्हांस वाटतें. सर्वांनीं आपलें बळ खर्च करून सहकार्यानें हा राष्ट्राचा गाडा ओढला पाहिजे, अशी सर्व जनतेला आमची प्रार्थना आहे !

कर्णिक–शुक्ल–थोरात या त्रिमूर्तींनीं नेटानें चालविलेले प्रयत्न व त्यास प्रकाशकानें दिलेलें सहाय्य अभिनंदनीय आहे.

पुणें,
दि. १४–१०–५७.

वा. ग. जगताप,
अध्यक्ष, महाराष्ट्र लोकशिक्षण समिति.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

कार्यकर्त्यांशीं हितगुज

लोकशिक्षणाचे वर्ग गेलीं ७–८ वर्षें जवळून पाहण्याची संधि आम्हाला मिळाली. हे वर्ग पाहतांना असें दिसून आलें कीं कार्यकर्त्यांच्या अपुऱ्या तयारीमुळें व प्रौढांचे वर्ग हाताळण्याच्या तंत्राच्या अज्ञानामुळें, वर्ग यशस्वीपणें चालविणें कठीण जातें. प्रौढांना शिकविण्याचें काम मंदगतीनें चालण्याचीं कारणें दोन. १. शिकण्याबाबतचा प्रौढांचा उत्साहाचा अभाव. २. योग्य व कार्यक्षम कार्यकर्त्यांचा अभाव.

अनुभव असा आहे कीं चांगले, निष्ठावंत कार्यकर्ते प्रौढांमध्यें उत्साह निर्माण करून वर्गाला योग्य असें वातावरण उत्पन्न करून वर्ग यशस्वी करूं शकतात. कार्यकर्त्यांच्या विहिरींत आज फार मोठ्या प्रमाणांत खडखडाट दिसून येतो व त्यामुळें पोहऱ्यांत कांहीं उतरूं शकत नाहीं. ही परिस्थिति गेले कित्येक दिवस आम्हाला उद्विग्न करीत होती. महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं जाऊन कार्यकर्त्यांना मार्गदर्शन देण्याचें काम आम्ही करीत आलों; पण हजारों कार्यकर्त्यांच्यापर्यंत आमचा क्षीण आवाज पोहोंचणार कसा? ह्यासाठीं लोकशिक्षणाची रूपरेषा तयार करून आम्ही ती कार्यकर्त्यांपुढें ठेविली आहे. ही दिलेली शिदोरी फारच अपुरी पडेल ह्याची आम्हाला जाणीव आहे; परंतु 'यत्स्वल्पं तदपि बहु' ह्या न्यायानें ह्याचा उपयोग केला जाईल अशी आशा आहे.

लोकशिक्षणाचा आशय, त्याच्या गरजा, त्याचें तंत्र व पद्धति, ह्यामध्यें सारखा बदल होत जाणार. ह्या छोट्याशा चोपड्यानें कार्यकर्त्यांचें दारिद्र्य फिटणार नाहीं. त्यांच्या विहिरींत नव्या माहितीचे झरे सतत वाहत ठेवले पाहिजेत. लोकशिक्षणाच्या कामाला स्थळ-काळाची मर्यादा नाहीं. इंग्लंड-अमेरिकेसारख्या सुधारलेल्या राष्ट्रांपासून तों आफ्रिकेसारख्या मागासलेल्या देशांतून हें काम चालू आहे. १९व्या शतकांत वेगवेगळ्या देशांतून चालू झालेलें हें काम आज पण त्या त्या ठिकाणीं चालू आहे. एक मित्र आम्हाला म्हणाले, "हें तुमचें काम संपणार तरी केव्हां!" आम्ही त्याला म्हणालों, "तुम्ही आम्ही गेलों तरी हें काम चालू राहील." हीं काम करणारीं आजचीं माणसें जातील, कामाचें तंत्र व पद्धति बदलतील, लोकशिक्षणाचा अर्थ व आशय बदलेल, पण समाजाला शिकविण्याचें काम जें संतादिकांनीं जुन्या काळांत चालू केलें तें समाजधुरीणांना नेहमींच करावें लागेल.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ह्या कामाची माहिती, त्या क्षेत्रांत पडलेल्यांनाच हवी असें नाहीं. ह्या पुस्तकांत दिलेली जहाजाची गोष्ट प्रत्येक जाणत्या माणसानें लक्षांत ठेवली पाहिजे. लोकशाहीच्या नौकेंत आपण सर्व बसलों आहोंत व त्या नौकेचें सुकाणू ज्या मत- दारांच्या हातीं दिलें आहे, त्यांपैकीं शेंकडा ९२ टक्के मतदार ह्या देशांत निरक्षर आहेत. ही नौका संथपणें प्रवास करून पैलतीराला जावी असें प्रत्येकाला वाटतें; पण त्याबाबतचें प्रत्येक नागरिकाचें किमान कर्तव्य सर्वांनीं समजून घ्यायला पाहिजे. लोकशिक्षणाचा प्रश्न हा मूठभर प्राथमिक शिक्षकांच्या माथीं मारून, बाकीचे सुशिक्षित लोक उपहासानें व तटस्थ वृत्तीनें, त्याकडे पाहत बसले तर हा प्रश्न नीट सोडविला जाणें शक्य नाहीं. हें सर्वांचें काम आहे, सर्वांनीं त्यांत लक्ष घालणें जरूर आहे. हें ह्या पुस्तकाद्वारें, लोकांपुढें मांडण्यासाठीं व त्या कामीं कार्यकर्त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठीं हें पुस्तक लिहिलें आहे. सुदैवानें ह्याची पुढील आवृत्ति निघाली तर ह्यांतील उणीवा दूर करण्याचा आम्ही जरूर प्रयत्न करूं.

हें पुस्तक प्रसिद्ध करण्याची परवानगी माननीय डायरेक्टरसाहेबांनीं दिली त्याबद्दल त्यांचे आम्ही नितांत ऋणी आहोंत. त्याचप्रमाणें आमच्या पाठीशीं गेलीं आठ वर्षं धीरानें उभें राहून, आम्हांला हरप्रसंगीं उत्साहित करून व भरपूर मार्गदर्शन करून, आमच्या हातून काम करवून घेणारे माननीय बाबूरावजी जगताप ह्यांनीं ह्या पुस्तकाला दोन शब्द लिहून, लोकांपुढें ठेवण्यासाठीं ते पुढें आले, ह्याबद्दल त्यांचे चार शब्दांत आभार मानून, ऋणमुक्त होण्याचा अविचार आम्ही करीत नाहीं. कुटुंबांत वडिलांचें जें स्थान तेंच आमच्या कार्यांत बाबूरावजींचें. त्याच आपुलकीनें त्यांनीं आजवर आम्हांला सांभाळलें, ह्याचा जाहीर उल्लेख ह्या प्रसंगीं केल्यावांचून मात्र राहवत नाहीं.

सर्वोदय छापखान्याचे चालक श्री. दादासाहेब शिंगरे ह्यांच्या सक्रिय सहकार्यामुळेंच ही कल्पना मूर्त स्वरूपांत येऊं शकली. त्यांचे हार्दिक आभार मानणें हें आमचें कर्तव्य आहे व ते आम्ही मोकळ्या मनानें पार पाडीत आहोंत.

शेवटीं लोकशिक्षणाच्या क्षेत्रांत काम करणाऱ्या ज्या कार्यकर्त्यांमुळें हें पुस्तक लिहिण्याची आम्हांला स्फूर्ति झाली, त्यांचे पण आम्ही आभारी आहोंत.

कार्तिक शुद्ध प्रतिपदा, शके १८७९,
शांतिनिकेतन, ३१९ सोमवार, पुणें २.

—लेखक

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

अर्पण पत्रिका

यशाचीं आशा अंधुक असतांना, द्रव्य प्राप्तीचा संभव फारच कमीं असतांना, शाबासकी किंवा आभार तसेंच जाहीर प्रसिद्धि मिळण्याचीं मुळींच शक्यता नसतांना निष्ठेनें आपलीं स्वत:चीं पणतीं पेटवून तीं सतत तेवत ठेवणारे व पणतींला पणतीं पेटवून देशांतील अज्ञानरूपी अंध:कार नाहींसा करण्यासाठीं विश्वासानें कार्यप्रवण झालेले असे आमचे जे अज्ञात लोक-शिक्षण कार्यकर्ते आहेत, त्या आमच्या मित्रांना कृतज्ञतापूर्वक अर्पण !

अंधाराला दूषण देण्यापेक्षां आपण आपलीं पणतीं पेटवावीं. पणतींला पणतीं पेटत गेलीं तर आज भेडसावणारा अंधार दूर होऊन प्रकाशाच्या किरणाचें दर्शन झाल्यावांचून राहणार नाहीं.

— लेखक

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

अनुक्रमाणिका

क्रमांक		पान नंबर
१	लोकशिक्षणाचा इतिहास	१
२	प्रौढ शिक्षणाची गरज.	४
३	प्रौढांचें मानसशास्त्र	१५
४	लोकशिक्षण वर्गाची सुरुवात.	१८
५	लोकाशिक्षणाच्या पद्धति	२८
६	वाचनाचा आरंभ.	३४
७	साक्षरता कशी टिकवावी.	४१
८	लोकरंजनांतून लोकशिक्षण	४४
९	नित्य कामाचें टांचण.	४९
१०	विकास योजना व लोकाशिक्षण	५३
११	ग्रामपहाणी.	५६
१२	महिला मंडळें.	६८
१३	वाचनालयें.	७१
१४	इतर देशांतील लोकशिक्षण.	७८
	१. इंग्लंडमधील लोकशिक्षण.	८२
	२. सोव्हिअेट रशियामधील साक्षरतेची मोहीम. ...	८४
	ऑस्ट्रेलियाचें पत्र २ रें.	९०
	डेन्मार्कचें पत्र २ रें.	९३
१५	शाळांना समुदाय केंद्र कसें बनवितां येईल ? ...	९७
१६	लोकाशिक्षण कार्यकर्त्यानें काय ध्यानांत ठेवावें ? ...	१११
१७	लोक शिक्षणाच्या गोष्टी.	११५
१८	लोकाशिक्षणाचीं गाणीं.	१२६

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

१. लोकशिक्षणाचा इतिहास

प्रौढांना शिक्षण देण्याच्या प्रश्नाला ह्या प्रांतांत थोडीशी चालना पहिल्या महायुद्धानंतरच मिळाली. त्यापूर्वीं मुंबई शहरांत कांहीं रात्रीच्या शाळा चालू होत्या व ह्या शाळांतून प्रौढांच्या जोडीला मुलें पण शिक्षण घेत होतीं.

१९०५ सालापासून सहकारी सोसायटया निघूं लागल्या होत्या. ह्या सोसायटयांतून होणाऱ्या नफ्याचा विनियोग सोसायटीचे सभासद व त्यांचीं मुलें ह्यांच्या शिक्षणासाठीं करण्यांत येऊं लागला.

ग्रंथालयाच्या कामाला पण ह्याच सुमारास सुरुवात झाली. हें कार्य प्रौढ शिक्षणाला पूरकच होतें. १९१० सालीं बडोदें राज्यांत मोठीं सार्वजनिक ग्रंथालयें व फिरतीं ग्रंथालयें काढण्यांत आलीं.

१९२० च्या सुमारास प्रादेशिक भाषेंत बरींच वर्तमानपत्रें प्रसिद्ध होऊं लागलीं. त्यांचीं पण प्रौढ शिक्षणाच्या कार्यक्रमाला मदत झाली.

१९२२ सालीं सर विठ्ठलदास ठाकरसी ह्यांनीं मध्यवर्ती सहकारी इन्स्टिटयूटजवळ कांहीं निधि दिला व ह्या निधीमधून मुंबई प्रांतांत २७ प्रौढांच्या शाळा चालविण्यांत आल्या.

ह्याच सुमारास कांहीं गांवांतून रात्रीच्या शाळा चालत. त्यांत प्रौढ शिकत व शाळेंत न जाणारीं गुराखीं मुलें ह्यांना शिकविण्याचा यत्न केला जाई.

मुंबई प्रांतांत ह्या कामाला खरी सुरुवात १९३७ सालीं खेर मंत्रिमंडळ अधिकारावर आल्यावर झाली. त्यांनीं ह्या योजनेची आंखणी करण्याकरितां एक प्रांतिक समिति नेमली. ह्या समितीच्या सर्व सूचना सरकार स्वीकारूं शकलें नाहीं; परंतु १९३८ सालीं सरकारनें प्रौढ शिक्षणासाठीं एक सल्लागार मंडळ नेमलें. ह्या मंडळाला साक्षरता प्रसारासाठीं जनतेचें सहकार्य व आर्थिक मदत मिळवायची होती. श्री. एस्. आर्. भागवत हे ह्या बोर्डाचे अध्यक्ष होते. ह्या बोर्डाकडे प्रौढांचे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

वर्ग चालविणाऱ्यांना मंजुरी देणें, साहित्य पुरविणें, आर्थिक सहाय्य देणें हीं कामें सोंपविण्यांत आलीं.

१९३९ सालीं मुंबई सरकारनें ग्रंथालयांची वाढ करण्यासाठीं एक समिति नेमली. ह्या समितीच्या शिफारशीप्रमाणें तालुका व पेटा वाचनालयें निघूं लागलीं. त्यांना सरकारकडून आर्थिक मदत मिळूं लागली.

१९४१–४२ पासून सरकारनें लोकशिक्षण कार्यकर्त्यांना ट्रेनिंग देण्याची योजना सुरू केली. ह्या योजनेप्रमाणें ट्रेनिंग घेणाऱ्या कार्यकर्त्यांना १० रुपयांचें स्टायपेंड मिळूं लागलें व ट्रेनिंग घेतल्यावर त्यांनीं १० माणसें साक्षर केली पाहिजेत अशी त्यांच्यावर अट घालण्यांत आली.

दुसऱ्या महायुद्धामुळें व राजकीय चळवळीमुळें १९४५ पर्यंत हें काम फारसें जोरानें होऊं शकलें नाहीं. १९४५–४६ ह्या वर्षांत मुंबई सरकारनें आपली मर्यादित विभागांची (Compact areas)ची योजना सुरू केली. ह्या योजनेप्रमाणें एक विशिष्ट भाग निवडून त्या ठिकाणीं एक खास अधिकारी ह्या कामासाठीं नेमण्यांत आला. ह्या अधिकाऱ्यानें त्या विभागांतून एका वर्षांत एक हजार प्रौढ साक्षर करावयाचे होते. महाराष्ट्रांत आरंभीं असे पांच विभाग निवडण्यांत आले. १९५१ अखेर त्यांची संख्या ६० वर गेली.

१९४७ सालीं सरकारनें मुंबईंतील तीन भाषिक विभागांसाठीं तीन स्वतंत्र समित्या नेमण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणें महाराष्ट्राकरितां **श्री. बाबुरावजी जगताप** ह्यांच्या अध्यक्षतेखालीं **महाराष्ट्र प्रादेशिक प्रौढ शिक्षण समिति** नेमण्यांत आली. १९५१ नंतर ही मर्यादित विभागांची योजना रद्द करण्यांत आली. सर्व राज्यांतून हें काम चालावें व तें त्या भागांत काम करणाऱ्या शाळा खात्याच्या भाग शिक्षण अधिकाऱ्यानें म्हणजे असि. डेप्यु. एज्यु. इन्स्पे. यांनीं करावें असें ठरलें.

१९४६ सालीं सर्व प्रांतांमधून लोकनियुक्त मंत्रिमंडळें अधिकारावर आलीं. १९४७ सालीं १५ ऑगस्टला देश स्वतंत्र झाला. मध्यवर्ती मंडळांत लोकांचे प्रतिनिधि अधिकारावर आले. प्रत्येक प्रांत आतां आपल्या शिक्षणप्रसाराच्या योजना जोरानें आंखूं लागला. ह्या सर्व

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रांतांतून लोक–शिक्षणाच्या कामांत एकसूत्रता आणण्याच्या हेतूनें, सेंट्रल अॅड्व्हायसरी बोर्ड ऑफ एज्युकेशननें एक समिति नेमली. ह्या समितीच्या अहवालामुळें प्रौढ शिक्षणाच्या कार्यक्रमाचें स्वरूप अजिबात बदललें गेलें. आतां प्रौढांचें शिक्षण साक्षरताप्रसारापुरतें मर्यादित राहिलें नाहीं. प्रौढ शिक्षण म्हणजे लिहिणें, वाचणें, अंकगणित करणें हा प्रौढ शिक्षणाचा आजपर्यंत चालू असलेला अर्थ बदलला. प्रौढ शिक्षणाची व्याप्ति वाढली. साक्षरतेच्या जोडीलाच नागरिकत्वाची, आरोग्या-बाबतची, शेतीबद्दलची व हस्तोद्योगांची माहिती देण्यांत यावी असें ठरलें. ह्या अभ्यासक्रमांत झालेल्या बदलाबरोबरच ह्या चळवळीला पण नवें नांव देण्यांत आलें. इतःपर **प्रौढशिक्षण म्हणजे साक्षरताप्रसार ह्या नांवानें ओळखली जाणारी चळवळ ह्यापुढें समाजशिक्षण–लोकशिक्षण** (Social Education) **ह्या नांवानें ओळखण्यांत आली.** हा बदल केवळ नांवांत किंवा अभ्यासक्रमांतच झाला नाहीं, तर ह्या सबंध चळवळीकडे पाहण्याचा दृष्टिकोनच पार बदलला गेला.

आतांपर्यंत आपण प्रौढाला केवळ लिहायला, वाचायलाच शिकवीत होतों. त्याच्यावर असलेल्या जबाबदाऱ्या मर्यादित स्वरूपाच्या होत्या. ह्यापुढें आपल्या देशांत लोकशाही राज्यपद्धति येणार होती. ह्या राज्यपद्धतींत अंतिम सत्ता ही मतदारांच्या हातीं असते. २१ वर्षें वयाच्या प्रौढाला आपण मतदानाचा हक्क देणार; म्हणजे त्याच्या हातीं ही सत्ता आपण सोंपविणार. आपल्या देशांतील मतदारांपैकीं शें. ९२ टक्के मतदार निरक्षर आहेत. त्यांना केवळ साक्षर करून भागणार नाहीं, तर त्यांची वैचारिक पातळी पण सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. लोकांना त्यांच्यो हक्कांची व जबाबदाऱ्यांची पण जाणीव करून दिली पाहिजे. केवळ साक्षरताप्रसारानें हें काम होणार नाहीं. त्यासाठीं त्याला अधिक शिक्षण दिलें पाहिजे. आपल्या देशाच्या उत्पादन वाढी-साठीं विविध योजना देशांत आंखल्या जातील. ह्या योजना यशस्वी होण्यासाठीं लोकांची मदत मिळवावी लागेल. ह्यासाठीं लोकांची उत्पादनक्षमता वाढवावी लागेल. त्यासाठीं त्यांना योग्य तें शिक्षण द्यावें लागेल; केवळ साक्षरताप्रसारानें हें काम होणार नाहीं; म्हणून

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

नव्या अभ्यासक्रमांत शेतीचें शिक्षण, जोडधंद्याचें शिक्षण इत्यादि नवीं नवी माहिती देणाऱ्या शिक्षणाचा अंतर्भाव केला आहे. ह्यालाच **लोक-शिक्षण** असें म्हणतात. **लोकशिक्षणाचा उद्देश प्रौढांचें जीवन सुखी व समृध्द करणें व त्याला लोकशाहीचा शिस्तबध्द असा जबाबदार नागरिक बनविणें हाच आहे.**

---

२. प्रौढ शिक्षणाची गरज

आज प्रौढांचें शिक्षण ह्या अर्थी भिन्न भिन्न शब्द वापरले जातात. हा केवळ शाब्दिक भेद नाहीं. वेगवेगळ्या शब्दप्रयोगाचा केवळ अर्थच निराळा असतो असें नाहीं; तर त्या शब्दांनीं प्रौढ शिक्षणाचा भिन्न आशय सूचित केला जातो. पूर्वी कांहीं काळपर्यंत प्रौढ शिक्षणाचा अर्थ साक्षरताप्रसार (Liquidation of illiteracy) एवढाच केला जात होता. कांहीं वेळां प्रौढ शिक्षणाचा अर्थ बहुजन समाजाचें शिक्षण (Mass Education)असा केला जात होता; परंतु त्यावेळीं हें बहुजन समाजाला द्यावयाचें शिक्षण साक्षरतेपुरतेंच मर्यादित झालेलें होतें. परदेशांतील कांहीं देशांतून, ज्याचें शिक्षण कांहीं कारणामुळें थांबलें असेल, त्याला पुढील शिक्षण देण्याची तरतूद प्रौढ शिक्षणाच्या कार्य-क्रमामार्फत केली जाते. ह्या देशांत प्रौढ शिक्षणाला 'पुढील शिक्षण' (Continuation Education) अथवा (Further Education) असा अर्थ प्राप्त झालेला आहे.

१९४७ सालीं भारत स्वतंत्र झाला. त्यानंतर ह्या देशांतील प्रौढाला केवळ साक्षर करून भागणार नाहीं; त्याला साक्षरतेच्या जोडीला अधिक पुष्कळसें शिकवावें लागेल, ह्याची जाणीव झाली. प्रौढ शिक्षणाचा आशय बदलला, व्याप्ति वाढली. इतःपर प्रौढ शिक्षणाला 'समाज शिक्षण'–'लोकशिक्षण' (Socil Education) हें नवें नांव मिळालें.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

युनेस्कोसारख्या जागतिक शैक्षणिक संघटनेनें जनतेचें दारिद्र्य, रोगराई व अज्ञान ह्या तीन शत्रूंविरुद्ध एकसमयावच्छेदें करून झगडण्यासाठीं, लोकांची तयारी व्हावी म्हणून, त्यांना चांगलें शिक्षण देण्याची योजना आंखली. ह्या शिक्षणाला 'मूलगामी शिक्षण' (Fundamental Education) हें नवें नांव देण्यांत आलें आहे. त्याप्रमाणें प्रौढांना पण हें शिक्षण देण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

तात्पर्य प्रौढांना शिक्षण देण्याच्या भिन्न भिन्न योजना जगांतील निरनिराळ्या देशांतून, निरनिराळ्या काळीं प्रचलित होत्या व आहेत. समाजाला शिकविण्याची गरज प्रत्येक देशाला नेहमींच भासते. लोक नेहमीं विचारतात, "ही प्रौढ शिक्षणाची चळवळ किती काळ चालणार?" त्यावर उत्तर असें कीं, "ह्या चळवळीला स्थळकाळाची मर्यादा नाहीं. प्रौढ शिक्षणाच्या गरजा जसजशा बदलतील तसतसा प्रौढ शिक्षणाचा अर्थ व आशय बदलेल. समाजाच्या भिन्न भिन्न अवस्थेंत, समाजाच्या गरजा पुऱ्या पाडण्यासाठीं ह्या कार्यक्रमांत जरूर ते बदल करावे लागतील; परंतु प्रौढांना शिकविण्याचें काम समाजाला नेहमींच करावें लागेल. देश, काळ, परिस्थितीप्रमाणें प्रौढ शिक्षणाचा आशय व कार्यक्रम बदलत राहील; नव्हे तो बदलत राहिलाच पाहिजे. तरच त्या चळवळीला अर्थ राहील."

प्रौढांना शिकविण्याची गरज काय ?

१. छापलेला शब्द वाचण्याची ताकद प्रत्येक प्रौढाला मिळवून देणें. ही ताकद प्रत्येक प्रौढाला देण्यासाठीं त्याला लेखन, वाचन, थोडेसें अंकगणित शिकविलें पाहिजे, म्हणजे त्याला साक्षर केलें पाहिजे. प्रौढ जर साक्षर झाला, त्याला जर पुस्तकें, मासिकें, वर्तमानपत्रें वाचतां येऊं लागलीं तर त्याला स्वतःचें शिक्षण स्वतःला करतां येईल. लेखन, वाचन, हीं ज्ञान मिळविण्याचीं जुजबीं साधनें जर प्रत्येक प्रौढाला आपण उपलब्ध करून दिलीं तर त्यायोगें त्या प्रौढाला पुढील शिक्षणासाठीं कोणावर अवलंबून रहावें लागणार नाहीं.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

२. शिक्षण घेण्याची पूर्वी न मिळालेली संधि, प्रौढांना मिळवून देणें.

कित्येक प्रौढांना त्यांच्या बाळपणीं प्राथमिक शिक्षण घ्यायला मिळालें नाहीं. दारिद्र्यामुळें ते बालपणीं शाळेंत जाऊं शकले नाहींत. घरापासून शाळा फार दूर अंतरावर असेल, शिक्षणाचें महत्त्व आई-बापांना समजलें नसेल. बाळपणांत न मिळालेली शिक्षण घेण्याची संधि प्रौढपणीं त्यांना मिळवून देणें जरूर आहे. ह्यासाठीं प्रौढांना शिकविणें जरुरीचें असतें.

३. जीवन जगण्यासाठीं माणसाजवळ कांहीं जुजबीं साधनें असावीं लागतात. इंग्रजींत त्याला (Besic Tools of Life) असें म्हणतात. शिक्षण हें एक अशा प्रकारचें साधन आहे. हें साधन प्रत्येक माणसाजवळ असणें जरूर आहे. लहानपणीं त्याला जर तें मिळालें नसेल तर प्रौढपणीं त्याला तें मिळवून द्यायला हवें. त्यायोगें मनुष्याला आपलें जीवन समाधानकारकपणें जगतां येतें.

४. व्यावसायिक ज्ञान मिळवून देणें.

प्रौढ शिक्षणांचें उद्दिष्ट प्रौढांचें जीवन सुखी व समृद्ध करणें हें आहे. जीवन सुखी होण्यासाठीं प्रत्येक प्रौढाचा राहणीचा दर्जा सुधारला पाहिजे. त्यासाठीं त्याची उत्पादनक्षमता वाढली पाहिजे. तो ज्या क्षेत्रांत काम करीत असेल त्या क्षेत्रांत त्याला आजच्यापेक्षां उद्यां अधिक चांगल्या रीतीनें व चांगल्या दर्जाचें काम करतां येईल. ह्याकरितां त्याला व्यावसायिक शिक्षण द्यावें लागेल. उत्तम शेती कशी करावी, जोडधंदे कसे व कोणते करावेत ह्याबद्दल त्याला माहिती देणें जरूर आहे. म्हणून प्रौढ शिक्षण देतांना त्या प्रौढाला शेतीबद्दल, पशुसंवर्धनाबद्दल, दूध–दुभत्याबद्दल, सहकारी चळवळीबद्दल माहिती द्यावी लागेल. ग्रामीण विभागांतील लोकांना जशी शेतीची माहिती द्यावी लागेल, तशीच नागरी विभागांतील लोकांना थोडें तांत्रिक किंवा औद्योगिक शिक्षण पण द्यावें लागेल.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

५. आपल्या देशांतील माणसें दरिद्री आहेत; म्हणून तीं रोगानें पीडलेलीं आहेत. तशीच तीं अडाणी असल्यामुळें पण रोगांच्या आहारीं जात असतात. ह्यासाठीं प्रत्येक प्रौढाला रोगराईशीं मुकाबला देण्यासाठीं कांहीं गोष्टींचें ज्ञान देणें जरूर असतें. आपलें वैयक्तिक व सामाजिक आरोग्य चांगलें कसें ठेवावें ह्याचें शिक्षण प्रौढांना देणें जरुरीचें असतें. समाजांत स्वच्छता राखली नाहीं तर सांथीचे रोग कसे पसरतात, मुलांची प्रसूतिपूर्व व प्रसूतिउत्तर कशी काळजी घ्यावी ह्यांचें शिक्षण न मिळालें तर बालमृत्यूची संख्या कशी वाढू शकते इत्यादि गोष्टींचें शिक्षण प्रौढांना देणें जरूर आहे.

६. प्रौढ शिक्षणाचा उद्देश प्रौढांचें जीवन सुखी व समृद्ध करणें हा आहेच. पण त्याचबरोबर त्या प्रौढांना लोकशाहीचा शिस्तबद्ध नागरिक बनविणें हा पण प्रौढ शिक्षणाचा उद्देश आहे. हा उद्देश सिद्धीस जाण्यासाठीं प्रौढांना योग्य तें शिक्षण दिलें पाहिजे. हा प्रौढ कुटुंबाचा व समाजाचा घटक आहे. कुटुंबांचा व समाजाचा घटक ह्या नात्यानें त्याच्यावर कोणत्या जबाबदाऱ्या येऊन पडतांत व त्याला नेमके कोणते हक्क मिळतात ह्याची कल्पना देणें जरूर आहे. ह्यासाठीं नागरिकशास्त्रासारखें जरूर ते विषय प्रौढाला शिकविणें अगत्याचें असतें.

७. फुरसतीच्या वेळेचा सदुपयोग करायला प्रौढांना शिकविणें. यांत्रिक सुधारणांमुळें व कामगारांमध्यें वाढत्या प्रमाणांत दिसून येणाऱ्या जागृतीमुळें, कायदे करून कामगारांचे कामाचे तास आज निश्चित केलेले आहेत. ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड ह्यासारख्या देशांत, प्रत्येक कामगाराला फक्त ४० च तास काम करावें लागतें. त्यामुळें प्रौढांना मिळणाऱ्या फुरसतीचें प्रमाण वाढत आहे. ह्या फुरसतीच्या वेळेचा सदुपयोग कसा करावा त्याचें शिक्षण प्रौढांना देणें आवश्यक आहे. फुरसतीचा वेळ जर चांगल्या प्रकारें न घालविला तर जीवनांत पोकळी निर्माण होईल. ती भरून काढण्याचें काम प्रौढ शिक्षण करील.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

यांत्रिक प्रगतीमुळें प्रौढांच्या मनावर खूप ताण पडतो. तेंच तेंच काम खूप वेळ करावें लागतें. ठराविक वेळांत ठराविक काम आटोपावें लागतें. ह्यामुळें प्रौढांचें जीवन यांत्रिक बनतें व त्यांच्या मनावर खूप ताण पडतो. करमणुकीचे कार्यक्रम हा ताण कमी करूं शकतात. प्रौढ शिक्षणाच्या क्षेत्रांत करमणुकीच्यामार्फत शिक्षण देण्याची–लोकरंजनांतून लोकशिक्षण देण्याची जी योजना आहे तिचा ह्या कामीं चांगला उपयोग होतो.

८. पुष्कळदां प्रौढांना विशिष्टि विषयांत प्राविण्य मिळवावें असें वाटतें. त्यासाठीं ते धडपडतात. ह्यासाठीं जरूर ती संधि प्रौढांना मिळवून द्यावी लागते. प्रौढ शिक्षणाचे परदेशांत जे कार्यक्रम चालतात, त्यांमधून प्रौढांना अशा प्रकारचें शिक्षण देण्याची तरतूद केली जाते. ह्या दृष्टीनें इतिहास, अर्थशास्त्र, वादविवाद करणें, इत्यादि विषयांचें शिक्षण प्रौढांना दिलें जातें.

९. प्रौढांमध्यें कलेच्या आवडीची वाढ व्हावी म्हणून त्यांना जरूर ती संधि मिळवून देणें हें प्रौढ शिक्षणाचें एक उद्दिष्ट राहील. ह्यासाठीं परदेशांतील प्रौढ शिक्षण वर्गांतून नृत्य, गायन, वादन, चित्र-कला, शिवणकला इत्यादींचें शिक्षण देण्याची व्यवस्था केली जाते. आपणांकडेही त्या कलांना उत्तेजन देणें जरुरीचें आहे.

१०. जनतेमधील विस्कळीतपणा दूर करून, लोकांमध्यें, एकजुटीची भावना निर्माण करणें हें प्रौढ शिक्षणामुळें साधतां येईल. दुसऱ्या महायुद्धानंतर लोकांमध्यें एक प्रकारचा तुटकपणा वाढलेला दिसतो. नागरी जीवनांत एकलकोंडेपणाची वृत्ति वाढत चालल्याचें दिसून येतें. लोकांच्या भावनांचा वाढत्या प्रमाणांत जो कोंडमार अलीकडे होऊं लागला आहे, त्यामुळें लोकांमध्यें एकप्रकारची (Neurotic) प्रवृत्ति वाढत चालली आहे. परदेशांतील कित्येक ठिकाणीं ह्यांचीं दृश्य स्वरूपें पहायला मिळतात. मानवाच्या इच्छे-विरुद्ध आज वाटेल त्या घडामोडी जगांत होत आहेत. ह्यांपैकीं कोणत्याही घडामोडीला आपण पायबंद घालूं शकत नाहीं. आज आपण

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

अगदीं दुबळ झालों आहोंत. आपल्या इच्छेविरुद्ध आपण पुन्हां केव्हां युद्धांत खेचलें जाऊं, व ह्या युद्धाचे किती भीषण परिणाम आपणाला भोगावे लागतील त्याचा नेम नाहीं. आपण ह्या बाबतींत अगदीं अगतिक आहोंत, असें माणसाला वाटूं लागलें आहे. मानवाची ही भावना एका कवीनें पुढील शद्बांत व्यक्त केली आहे.–

I, a stranger and afraid
In a world I never made

A. E. Housman

अशा या माणसामध्यें आत्मविश्वासाचें वातावरण निर्माण करण्यास समुदाय केंद्राची मोलाची मदत होईल. प्रौढ शिक्षणाच्या कार्यक्रमामार्फत हें काम आपणास करितां येईल.

११. आज समाजांतील विविध गटांतून तेढीचें वातावरण फैलावत चाललें आहे. ही गटागटांतील तेढ व स्पर्धा कमी करण्याच्या कामीं प्रौढ शिक्षणाचा फार मोठया प्रमाणांत उपयोग होईल. अरब व ज्यू, ख्रिश्चन व ख्रिश्चनेतर, हिंदु व मुसलमान, मराठी व कानडी, मराठी व गुजराथी, तेलगू व तामीळ, नागरी व नांगरी, श्रीमंत व श्रमणारे, भांडवलदार व मजूर, सावकार व कुळें ह्या सर्वांमध्यें वैमनस्य वाढत चाललें आहे. तें दूर करण्यासाठीं एका विशिष्ट भौगोलिक परिसरांत राहणाऱ्या सर्व लोकांना नित्य एकत्र आणणें जरूर असतें. हें काम (कम्युनिटी सेंटर्स) समुदाय केंद्रामार्फत चांगलें करितां येतें. ह्या दृष्टीनें प्रौढ शिक्षणाची गरज भासते.

१२. ज्या समाजांतील बरेचसे लोक निरक्षर आहेत, त्या देशांतील लोकांमध्यें राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणें कठीण असतें. आज आपल्या देशांत आपण लोकशाही राज्य–पद्धति सुरू केली आहे. ह्या राज्य–पद्धतींत सर्व सत्ता लोकांच्या हातीं दिलेली आहे. लोकांना राजकारणाचें ज्ञान नसलें तर ही सत्ता त्यांना चांगल्याप्रकारें वापरतां येणार नाहीं. लेनीननें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, निरक्षर माणूस हा राजकारणापासून अलिप्त असतो. (An ignorant man is outside

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

politics) ह्यासाठीं प्रौढ शिक्षणाचा प्रसार होणें अत्यंत जरुरीचें आहे. आपला आजचा मतदार केवळ साक्षर असून भागणार नाहीं; त्याची वैचारिक वाढ जसजशी होत जाईल तसतसा लोकशाहीचा कारभार सुधारेल.

ह्याखेरीज आपण आपलें उत्पादन वाढविण्यासाठीं ज्या योजना सुरू केल्या आहेत, त्या सर्व योजना यशस्वी होण्यासाठीं सर्वसाधारण प्रौढांची मदत लागेल. लोकांना त्यांच्या शक्तींची जाणीव करून देणें व त्या शक्तींचा योग्य प्रकारें वापर करायला त्यांना प्रवृत्त करणें हें प्रौढ शिक्षणाचें आजचें महत्त्वाचें काम आहे. आपल्या राष्ट्रांतील नैसर्गिक संपत्ति व प्रौढांची जन्मजात शक्ति ह्यांची आपण जितक्या यशस्वी रीतीनें सांगड घालूं शकूं, तितकी आपली आर्थिक प्रगति लवकर होऊं शकेल. हें काम अवघड आहे; पण तें चांगल्याप्रकारें होण्यासाठीं आपल्या देशांतील प्रौढांना शिक्षण देणें जरूर आहे.

प्रौढ शिकूं शकतात का ?

परदेशी शिक्षण तज्ज्ञ लोकांनीं ह्या बाबतींत संशोधन करून असा निर्णय दिला आहे कीं ४५ च्या आंतील कोणत्याही माणसाला सहज शिकतां येतें. समशीतोष्ण देशांत तर ५० वर्षांचा माणूस पण शिकूं शकतो; कारण त्याचें मन तरुण असतें.

आपला नेहमींचा अनुभव असा आहे कीं, भारतांतील माणूस जरी निरक्षर असला तरी तो संपूर्णतः अडाणी नसतो. पंडीत जवाहरलाल नेहरूंनीं म्हटलें आहे कीं, " लोकांना अडाणी संबोधून व आपण शहाणे समजून लोकांशीं वागणें बरोबर नाहीं. कारण आज कित्येक शतकें या देशांतील लोकांत त्यांची संस्कृति आहे. परंपरा आहे. या परंपरेला धरून लोक आपले संसार सुस्थिरपणानें चालवितात. सामाजिक कार्यें चालवितात. ३५ कोटींच्या या देशांत लोकशाही निवडणुका जे लोक शांततेनें पार पाडतात त्यांना अडाणी कसें म्हणतां ? फार तर त्यांना निरक्षर म्हणा, पण अडाणी म्हणूं नका. ते अनेक गोष्टी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शिकण्याचा प्रयत्न करितात व शिकतात." गेल्या दहा वर्षांचा आमचा असा अनुभव आहे कीं, आपल्या खेडयांतील लोक शेतीची नवी पद्धति, पिकांची जोपासना, खतांचा वापर, सुधारलेल्या बीं–बियाण्यांचा वापर, जातिवंत कोंबडयांची जोपासना ह्याबाबत खूपच नवें नवें शिकूं लागला आहे. त्याच्या शिक्षण घेण्याच्या मार्गांत अनेक अडचणी उभ्या असतात व म्हणून आपणाला वाटतें कीं तो शिकायला तयारच नसतो.

१. एकाद्या प्रौढामध्यें साक्षर होण्याची ताकद नसते. असे प्रौढ अपवादात्मक असतात. परंतु त्यांना द्यावयाचें ज्ञान पुस्तकांखेरीज इतर अनेक साधनांनीं देणें शक्य असतें. ह्याचा विचार अन्यत्र केला जाईल.

२. प्रौढांमध्यें न्यूनगंड असतो. त्यांना वाटतें कीं शिक्षण घेण्यासाठीं एक विशिष्ट प्रकारची बुद्धिमत्ता लागते. ती ठराविक लोकां-जवळच असते. आपण हातानें काम करूं शकूं. डोक्यांनीं करावयाची कामें आपणांला कशी जमणार ? श्रमाचीं कामें करून पेन्सिलीसारख्या नाजूक वस्तु हातांत धरणें आपणांला कसें जमणार ? ते म्हणतात, "आतां आमच्या हातांची लांकडं झालीं; आतां आमचं वय झालं. आतां हात वळत्यात का ?"

३. त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांची पद्धति सदोष असते. हा नेहमींचाच अनुभव आहे. बहुसंख्य लोकशिक्षण वर्ग चालविणाऱ्या लोकांना शिकणारीं मुलें व शिकणारे प्रौढ ह्यांच्यामध्यें काय अंतर आहे तें समजतच नाहीं. ज्या पद्धतीनें लहानपणीं ते स्वतः मूल असतांना शिकले त्याच पद्धतीनें ते वर्गांतील प्रौढांना शिकविण्याचा प्रयत्न करितात. वर्गांत प्रौढ आल्याबरोबर आधीं त्याला सारीं मूळाक्षरें शिकवून नंतर त्याच्याकडून साऱ्या बाराखडया घटवून घेईपर्यंत ते त्या प्रौढाला कांहींच शिकवीत नाहींत. हें सर्व पूर्व तयारीचें शिक्षण प्रौढांना नीरस व कंटाळवाणें वाटतें. धडाभर तेल नमनालाच खर्च झालें तर पुढें काय दिवे लागणार ?

४. प्रौढांच्या प्रवृत्ति व त्यांना लागलेल्या संवयी त्यांच्या शिक्ष-णाच्या आड येतात.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

कांहीं प्रौढ व्यसनाधीन असतात. आपली तल्लफ भागविण्यासाठीं मादक द्रव्यें चोरट्या मार्गांनीं मिळविण्याच्या प्रयत्नांत ते आपली सारी संध्याकाळची वेळ घालवितात. ह्यामुळें वर्गांत येऊन बसणें त्यांना आवडत नाहीं. त्याचप्रमाणें ज्यांना गांवांतील कट्ट्यांवर बसून गांव कुटाळक्या करण्याची संवय लागली आहे, त्यांना वर्गांत येऊन शिकायला बसणें नीरस व कंटाळवाणें वाटतें. पुष्कळशा खेड्यांतून (शहरांतून सुद्धां) जुगाराचे व पत्त्यांचे अड्डे रात्रींच्या व संध्याकाळच्या वेळीं चालतात. ह्या मंडळींना ह्या खेळाचें व्यसन इतकें जडलेलें असतें कीं त्यामुळें ते वर्गांत येऊं शकत नाहींत.

५. खेड्यांपाड्यांतील लोकांना उत्सवांत अवास्तव वेळ घालविण्याची संवय असते.

लग्न, उत्सव, यात्रा, सण ह्यांमध्यें खेड्यांतील लोक फार उत्साहानें भाग घेतात. ह्यामध्यें त्यांचा खूप वेळ जातो. आपल्या गांवचा लेजमीचा ताफा घेऊन निरनिराळ्या जत्रांना हजर राहणें. आपल्या गांवांतील तालीमबाजांना घेऊन इतरत्र कुस्त्या मारीत हिंडणें इत्यादि गोष्टींमुळें ह्या लोकांच्या शिक्षणांत खंड पडतो. थोडे दिवस शिक्षण झालें व मधून मधून त्यांत असा खंड पडत गेला तर प्रौढ शिक्षणाचें काम कधींच मूळ धरूं शकत नाहीं.

६. सामाजिक फाटाफुटी, वैयक्तिक तेढी ह्यांचा वर्गावर विपरीत परिणाम होतो.

पुष्कळ खेड्यांतून वेगवेगळे गट पडले आहेत. ठिकठिकाणीं फाटाफूट आज दिसून येते. गांवांतील एका गटानें सुरू केलेल्या कामाला दुसऱ्या गटाचें सहकार्य तर मिळत नाहींच; पण उलट पहिल्या गटाचें काम उधळून लावण्याचें काम दुसरा गट करीत असतो. वर्गाला दहा पंधरा माणसांनीं एके ठिकाणीं जमावें लागतें; परंतु त्या ठिकाणीं पण एका गटाचे लोक दुसऱ्या गटांतील लोकांच्या बरोबर शिकायला तयार नसतात. कोणी देशमुख असले तर ते म्हणतात, "आम्ही देशमुख दुसऱ्यांच्या दारांत जात नसतो." देशमुखांचें हें बोलणें ऐकलें कीं जाधव

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पण देशमुखांकडे जायला तयार होत नाहींत. खेडूतांचा पोकळ मोठेपणा शिक्षणासारख्या चांगल्या कामालाही नडतो.

७. खेडेगांवांतील कांहीं हितशत्रु व त्यांचे हस्तक वर्गाला कसून विरोध करितात.

खेडेगांवांतील सावकार, पाटील, समाजकंटक इत्यादि मंडळींना सर्वसाधारण माणसांनीं शिकावें असें वाटत नाहीं. ही मंडळी जर शिकली तर त्यांच्या अज्ञानापासून मिळणाऱ्या फायद्यांना आपणास मुकावें लागेल असें त्यांना वाटतें म्हणून ते लोक ह्या वर्गाला प्रच्छन्न किंवा उघड विरोध करितात. 'वर्गांत येणाऱ्या लोकांना तुम्हाला लढाईंत पाठविलें जाणार आहे.' अशा स्वरूपाच्या कंड्या युद्धकाळांत पिकवून ते लोकांना वर्गापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करीत होते.

अशाप्रकारें प्रौढांच्या शिक्षणाच्या मार्गांत अनेक अडीअडचणी आहेत. ह्या सर्व अडचणींना तोंड देऊन आपणाला काम करावयाचें आहे. त्यासाठीं शिक्षणाची आवश्यकता प्रौढांना पटली पाहिजे. शिक्षणाचा जीवनाशीं संबंध आहे हें त्यांना पटवून द्यायला पाहिजे. केवळ साक्षर झाल्यापासून आपला कांहीं फायदा होईल असें त्यांना वाटत नाहीं. त्यांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या प्रश्नांचा व लोकशिक्षणाचा जर आपण मेळ घालूं शकलों व जर त्यांना पटवून देऊं शकलों कीं, त्यांचें जीवन सुखी व समृद्ध करण्याच्या कामीं साक्षरता हें एक उपयुक्त साधन अथवा हत्यार आहे. तरच हे प्रौढ शिक्षणांत लक्ष घालतील. म्हणून साक्षरतेबरोबर प्रौढांच्या जीवनांतील गरजा पुऱ्या पाडण्यास उपयुक्त होईल; अशी माहिती वर्गांत मिळेल असें प्रौढाला पटवून दिलें तर वर्ग आकर्षक होतात. छापलेला शब्द वाचतां न आल्यामुळें माणसावर कोणकोणत्या आपत्ति येण्याचा संभव आहे ह्याची प्रौढांना कल्पना दिली तर ते शिकायला तयार होतील अशी कल्पना देणाऱ्या कांहीं **'लोकशिक्षण कथा'** या पुस्तकांत मुद्दाम पुढें दिल्या आहेत.

प्रौढांना वर्गांत दिलें जाणारें शिक्षण जर पद्धतशीरपणें दिलें गेलें, तर आजच्यापेक्षां अधिक प्रमाणांत, प्रौढ वर्गांत हजर राहतील.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दिवसभर राबून प्रौढ वर्गांत येतात. शरिरानें ते थकलेले असतात. त्यांचा थकवा शारीरिक असतो. त्यांना आकर्षक पद्धतीनें शिकविलें, त्यांना वेगवेगळ्या मार्गानें उत्साहित केलें तर त्यांचा थकवा सहज कमी होईल. आम्ही आपले वर्ग पंतोजी पद्धतीनें चालवितों. आमच्या लहानपणीं आम्हांला आमच्या शिक्षकांनीं कसे शिकविलें तें आम्हाला आठवत असतें; त्याच पद्धतीनें आम्ही प्रौढांना शिकवायचा प्रयत्न करितों. मुलांना ज्या पद्धतीनें शिकवितात, त्या पद्धतीनें प्रौढांना शिकविण्याचा प्रयत्न करणें चुकीचें आहे. प्रौढ सर्व बाबतींत लहान मुलांपेक्षां निराळा आहे, हें कार्यकर्त्यानें लक्षांत ठेवायला हवें. या प्रौढ वर्गांना **"प्रौढ वर्ग"** असें नांव न देतां एखादें मंडळ किंवा संघ अशा स्वरूपाचें नांव दिलें तर– " वर्ग " शब्दानें येणारें शालेय स्वरूप बदललें जाईल व मंडळाच्या खुल्या वातावरणांत काम चालेल. तेथें येणाऱ्या प्रौढांचा थकवा घालविण्यासाठीं, त्यांना हंसवणारे, रिझवणारे कार्यक्रम वर्गांत घ्यायला हवेत. त्यांना केवळ अक्षरें घोटायला लावलीं, बाराखड्या गिरवायला लावल्या, तर आधींच थकलेले प्रौढ पेंगायला लागतील. ह्यासाठीं रोज वर्गांत नेमकें काय काय घ्यावें त्याचें एक वेळापत्रक आम्ही पुढें दिलें आहे. प्रौढांच्या वर्गांत एखाद्या विषयाचें दळण दळत बसलें तर तें योग्य होणार नाहीं. कार्यक्रमांत नाविन्य हवें असतें, बदल हवा असतो. नुसत्या करमणुकीच्या कार्यक्रमाला पण ते कंटाळतात. रोजचा वर्ग जेवढा आपण अधिक आकर्षक करूं तेवढें अधिक यश आपल्या पदरांत पडेल.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

३. प्रौढांचें मानसशास्त्र

लोकशिक्षण कार्यकर्त्यांना प्रौढांशीं नीट रीतीनें वागतां आलें पाहिजे. प्रौढ म्हणजे लहान मुलगा नव्हे. आपल्या शाळेंत येणाऱ्या बालविद्यार्थ्यांशीं आपण ज्याप्रमाणें वागतों, तसें प्रौढांशीं वागून जमणार नाहीं. आपल्या वर्गांत येणारा प्रौढ बऱ्याचशा मनधरणीनंतर वर्गांत आलेला असतो. आपल्या वर्गांत यायला तो स्वतः होऊन सहसा तयार होत नाहीं. त्याला आणावें लागतें. तो वर्गांत येऊं लागला कीं, त्याच्याशीं आपण नीट रीतीनें वागलें पाहिजे; नाहींतर तो वर्गांत येण्याचें केव्हां बंद करील त्याचा नेम नाहीं. प्रौढांशीं कसें वागावें हें नीट समजण्यासाठीं कार्यकर्त्याला प्रौढांचें मन समजून घ्यावें लागेल.

पहिली गोष्ट म्हणजे ज्या प्रौढांना आपण शिकविणार, त्या प्रौढांशीं आपली नीट ओळख झाली पाहिजे. त्यासाठीं मधून मधून त्याला भेटलें पाहिजे. हा वर्गांत येणारा प्रौढ, पुष्कळदां कोणाचा बाप, नवरा, भाऊ, सासरा असतो. कुटुंबाचा प्रमुख असतो. कुटुंबांत त्याला मानानें वागविलें जातें. त्याला त्याच आदरानें आपण पण वर्गांत वागवलें पाहिजे. हा प्रौढ निरक्षर असेल पण त्याला पुष्कळ गोष्टी माहीत असतील. त्याचा जीवनाचा अनुभव आपल्यापेक्षां अधिक व्यापक व खोल असण्याचा संभव आहे. त्याला आपण योग्य तो मान दिला तर तो आपल्या अधिक जवळ येऊं शकेल.

त्याला भेटतांच त्याच्याशीं मोकळेपणानें बोललें पाहिजे. त्याच्या प्रकृतीची विचारपूस करावी, त्याच्या कामाचें स्वरूप जाणून घ्यावें, त्याचें उत्पन्न काय, त्याच्या कामांतील अडचणी कोणत्या, त्याच्या कुटुंबांत मंडळी किती आहेत, इत्यादीबाबत त्याच्याशीं मोकळेपणानें बोलावें.

प्रौढांना शिकवितांना त्याच्या मूलभूत गरजा आपण लक्षांत घ्यायला पाहिजेत. प्रत्येक प्राणीमात्राला अन्न, वस्त्र, आसरा व संकटा-पासून संरक्षण ह्याची गरज असते. ह्यासाठीं माणसें नेहमीं धडपडतात.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रौढांना शिकवितांना आपण त्यांच्या गरजा लक्षांत घेऊन, आपला शिक्षणक्रम आंखला पाहिजे. आपण जें शिक्षण देऊं तें शिक्षण आपल्या मूलभूत गरजा पुऱ्या होण्याच्या उपयोगी पडेल, असा विश्वास त्याला वाटला पाहिजे.

आपल्या वंशाची वृद्धि व्हावी असें माणसाला नेहमीं वाटतें. त्यासाठीं :तो स्वतःची व कुटुंबाची काळजी घेतो. आपल्या शिक्षणांत माणसाला त्याचें स्वतःचें व मुलाबाळांचें आरोग्य कसें राखतां येईल ह्याची माहिती देतां आली तर ती प्रौढांना हवी असतें. कारण तो स्वतः जगण्याची व आपल्या कुटुंबाला जगविण्याची नेहमीं धडपड करीत असतो. आपलें व आपल्या कुटुंबाचें जीवन सुखी व्हावें, समृद्ध व्हावें असें त्याला वाटायला पाहिजे. आपलें जीवनमान सुधारण्याची उत्कंठा प्रौढांत निर्माण करणें, हें प्रौढ शिक्षणाचें उद्दिष्ट आहे व त्या दृष्टीनें प्रौढांना उपयुक्त वाटतील असे विषय आपल्या वर्गांतून शिकविले गेले पाहिजेत.

प्रौढांना अनेक गोष्टी जाणून घेण्याची उत्कंठा असते. त्यांना करमणूक हवी असते. ही गोष्ट लक्षांत घेऊन कार्यकर्त्यांनीं प्रौढांना, त्यांच्या जीवनाशीं निगडित असलेल्या व त्यांना उपयुक्त वाटणाऱ्या विषयाबद्दल वर्गांतून माहिती सांगावी. त्याचप्रमाणें त्यांची करमणुकी-बद्दलची आवड लक्षांत घेऊन, त्यांच्यासाठीं करमणुकीचे कार्यक्रम घ्यावेत.

प्रौढ सहसा एकटेपणानें राहूं इच्छित नाहींत. चार लोकांत मिसळावें, चार मित्र जोडावें, असें त्याला मनापासून वाटत असतें. ही प्रौढांची भूक लक्षांत घेऊन कार्यकर्त्यानें वर्गांत वागलें पाहिजे. आपल्या वर्गाचें वातावरण अशी मैत्री वाढवायला पोषक झालें पाहिजे.

प्रौढ हा पुष्कळदां भावनाप्रधान असतो. थोडचाशा यशानें तो हुरळून जातो तर थोडचा अपयशानें त्याचा धीर खचतो. ही प्रौढांची वृत्ति लक्षांत घेऊन कार्यकर्त्यानें वागलें पाहिजे. वर्गांत येणाऱ्या प्रौढांना वेळोवेळीं उत्तेजन दिलें पाहिजे. त्याच्याजवळ जें जें चांगलें असेल, त्यानें

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ज्री प्रगति केली असेल, तीबद्दल त्याची तोंडभर स्तुति केली पाहिजे. त्याच्या जर चुका झाल्या, त्याचे जर कांहीं दोष आढळले, तर युक्ति युक्तीनें ते त्याला दाखवून दिले पाहिजेत. त्याची स्तुति सर्वांसमोर करावी; पण त्याला ठपका द्यायची जर पाळी आली, तर मात्र त्याला एकटचाला बाजूला बोलावून तें काम केलें पाहिजे.

प्रौढाला आपला व्यवसाय नेहमीं प्रिय असतो. आपल्या व्यवसाया-बद्दल त्याला बोलायला अथवा ऐकायला आवडतें; म्हणून कार्यकर्त्यानें वर्गांतील प्रौढांचे व्यवसाय समजून घ्यावेत व त्या व्यवसायांबद्दल माहिती मिळवून ती त्यांना देत रहावी.

प्रौढ वयाच्या एका विशिष्ट अवस्थेंत आला कीं, त्याला जगाविषयीं, देवाविषयीं कांहीं तरी जाणून घ्यावें असें वाटतें. मरणोत्तर जीवना-बद्दलची माहिती मिळविण्यास तो धडपडतो. साधुसंतांचे ह्याबाबतचे विचार जाणून घ्यायला तो उत्सुक असतो. कार्यकर्त्यांनीं ही गोष्ट लक्षांत घेऊन ह्याबाबत कांहीं माहिती त्यांना देतां आली तर पहावें.

प्रौढाला राजकारणांत पण रस वाटतो. आपले लोकशिक्षणाचे वर्ग, पक्षीय प्रचाराचे अड्डे बनणार नाहींत ह्याबद्दल कार्यकर्त्यानें नेहमीं जागरूक राहिलें पाहिजे; पण त्याबरोबरच प्रौढांना वर्तमानपत्रांतील ताज्या ताज्या बातम्या सांगून, त्यांची राजकारणाबाबतची जिज्ञासा पुरी पाडण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आपल्या वर्गांत येणारे बहुतेक प्रौढ श्रमजीवी वर्गांतील असतात. त्यांची आर्थिक परिस्थिति खूप खालावलेली असते. सामाजिक चाली-रीतीमुळें त्याला पुष्कळदां अपमान सहन करावा लागतो. आर्थिक पिळणुकीला त्याला बळी पडावें लागतें. जीवनाच्या धकाधकीशीं त्याला नित्य झगडावें लागतें. दारिद्र्य, रोगराई व अज्ञान, ह्या तीन शत्रूंशीं त्याला सारखा सामना देत आपलें जीवन कंठावें लागतें. ह्यामुळें ह्या प्रौढांत न्यूनगंडाची भावना वाढीला लागलेली असते. आपल्याला कांहीं येणार नाहीं. आपलें जीवन सुधारणार नाहीं, आपल्या जीवनांत कधीं प्रकाश दिसणारच नाहीं, असें त्याला सारखें वाटत असतें. ह्यासाठीं ह्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रौढाला खूप जपायला पाहिजे. त्याच्याशीं मित्रत्वानें वागलें पाहिजे. त्याच्या दुःखाबद्दल सहानुभूति दाखविली पाहिजे. त्याचा आत्मविश्वास वाढीला लावला पाहिजे. ह्या वर्गांतून एकादा व्यवसाय शिकविण्याची सोय झाली अथवा एकादा कार्यक्रम आंखला गेला व त्या कार्यक्रमांत प्रौढांना खूप वाव दिला, तर त्याचा आत्मविश्वास वाढीला लागूं शकेल. त्यानें कांहीं चांगलें केलें तर त्याची कोणी तरी प्रशंसा करायला पाहिजे. ही प्रशंसा कार्यकर्ताच जर नेहमीं करीत राहिला तर प्रौढाला, त्याच्या सद्हेतूबद्दल शंका येईल. ह्यासाठीं आपल्या वर्गाला भेट देण्यासाठीं नेहमीं गांवांतील पुढाऱ्यांना अथवा गांवांत येणाऱ्या अधिकाऱ्यांना आमंत्रण द्यावें. भेट देणाऱ्यांनीं वर्गांतील प्रौढानें जें केलें असेल त्याची स्तुति करावी. त्यांना कांहीं दोष आढळले तर ते त्यांनीं कार्यकर्त्याला बाजूला घेऊन ते सांगावेत. बाहेरच्या मंडळींच्या भेटीचा वर्गावर चांगला परिणाम होतो. त्यामुळें वर्गाला संजीवन मिळतें. ह्या लोकांनीं केलेल्या प्रशंसेमुळें प्रौढाचा न्यूनगंड हळू हळू कमी होऊन त्याचा आत्मविश्वास वाढीला लागतो.

---

४. लोकशिक्षण वर्गाची सुरुवात

गेल्या कित्येक वर्षांचा लोकशिक्षण वर्गाबाबतचा आमचा अनुभव असा आहे कीं, ह्या कार्याची उभारणीच भुसभुशीत पायवर केली जाते. म्हणून हा वर्ग सर्वसाधारणपणें यशस्वी होत नाहीं. बरेचसे वर्ग अल्पजीवी ठरतात. कधीं कधीं तर असा अनुभव येतो कीं, कार्यकर्त्यानें जरी प्रामाणिकपणें प्रयत्न केले तरी वर्गाला लोक येत नाहींत. ते वर्गाला प्रारंभीं प्रारंभीं आले तर पुढें पुढें त्यांची हजेरी हळूं हळूं कमी होऊं लागते व वर्ग चालविण्याचें यश व समाधान कार्यकर्त्याला मिळूं शकत नाहीं. ह्यासाठीं लोकांची नेहमीं अशी सूचना असते कीं शिकणारावर सक्ति करावी.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ह्या वाबतींत असा अनुभव आहे कीं, लोकांवर सक्ति करून लोकांना शिकायला लावतां येणार नाहीं. सक्तीनें फार तर लोकांना हजर रहायला भाग पाडतां येईल. शिक्षण घेण्यासाठीं शिकणाऱ्याच्या मनाची तयारी व्हावी लागते. ही तयारी सक्तीनें आपण करूं शकत नाहीं. त्यासाठीं शिक्षणाचें महत्त्व त्या माणसाला नीट पटवून द्यावें लागेल. शिक्षणाचा जीवनाशीं संबंध कसा आहे हें त्याला समजावून द्यावें लागेल. शिक्षणामुळें त्याला आपल्या दैनंदिन अडचणींशीं सामना कसा देतां येईल, शिक्षणामुळें त्याच्या निकडीच्या गरजा कशा भागवितां येतील ह्याची त्याला नीट कल्पना द्यावी लागेल. लोकशिक्षण वर्गांतून मिळणारें शिक्षण आपलें नित्याचें जीवन अधिक सुखी व समृद्ध बनविण्याला कसें मदतरूप होऊं शकेल ह्याची त्याला कल्पना द्यावी लागेल.

सर्वसाधारणपणें प्रौढांना ज्यावेळीं आपण वर्गांत येण्याची विनंति करितों तेव्हां ह्या वर्गाबावतच्या त्याच्या अशा कांहीं कल्पना ठाम झालेल्या असतात कीं, त्याला वाटतें आपण ह्या वर्गांत त्याला फक्त लिहिणें, वाचणें, हिशेब करणें एवढेंच शिकविणार आहोंत. त्याची अशी कल्पना होण्यास आपणच कारणीभूत झालों आहोंत. आपल्या बहुसंख्य लोकशिक्षण वर्गांतून आज साक्षरते व्यतिरिक्त प्रौढांना कांहींच शिकविलें जात नाहीं. साक्षरतेचा आपल्या जीवनाशीं काय संबंध आहे; ह्याची त्याला कल्पना नाहीं. आपण साक्षर झालों नाहीं तर त्यामुळें आपल्या जीवनांत कोणत्या अपूर्णता अथवा उणीवा राहतील ह्याची पण त्याला कल्पना नाहीं. त्याला असें प्रामाणिकपणें वाटतें कीं, साक्षर होण्याचें काम हें मुलांनींच करावयाचें आहे; इतकेंच नव्हे तर हें काम मनुष्याला ठराविक वयांतच करितां येतें. तें वय एकदां निघून गेलें कीं पुढें हें काम माणसाला जमत नाहीं—जमणार नाहीं. त्यामुळें तो आपणाला सारखा म्हणत असतो, "आतां आमचं का हें शिकण्याचं वय हाय ? आतां आमच्या गवऱ्या गेल्या कीं मसणांत. आतां हाताचीं लाकडं झालीं. आतां हात वळत्यात का ?" ह्या सर्वांचा आपण सोईस्कर असा अर्थ लावतों कीं, प्रौढ शिकायलाच तयार नाहींत; पण ही आपली समजूत चुकीची आहे हें पुढें दिसून येईल.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

लोकांना साक्षरतेच्या वर्गांत आणण्यापूर्वी, त्या गांवांत लोकशिक्षणाच्या कामासाठीं एक वातावरण निर्माण करावें लागेल. मनुष्यप्राणी हा समाजप्रिय आहे. एकटयानें राहणें त्याला साधारणपणें आवडत नाहीं. चारचौघांत हिंडण्याफिरण्याची त्याला हौस असते. गेल्या महायुद्धानंतर मात्र माणसांमध्यें तुटकपणाची वृत्ति वाढीला लागलेली दिसते. ही प्रवृत्ति अशीच वाढीला लागली तर त्यापासून समाजाचें अहित होण्याची भीति आहे. पूर्वी आखाडयामध्यें तालमीच्या निमित्तानें, देवळांतून पुराणकीर्तनांच्या अथवा भजनांच्या निमित्तानें, चावडीजवळ गप्पांच्या निमित्तानें लोक एकत्र येत असत. आज लोकांना एके ठिकाणीं आणणें मुष्कील झालें आहे. लोक जर एके ठिकाणीं येऊं लागले, आपल्या अडीअडचणींचा विचार करूं लागले तर गांवामध्यें एक नवें चैतन्य उत्पन्न होईल व त्यामुळें लोकशिक्षणाच्या कामाला अनुकूल असें वातावरण उत्पन्न होईल.

भारतासारख्या ज्या देशांतील बरेचसे लोक संपूर्णपणें अथवा कांहीं काळपर्यंत बेकार राहतात, व ज्या देशांत दारिद्र्य व अज्ञान लोकांच्या पांचवीला पुजलेलें असतें, त्या देशांत लोकशिक्षणाच्या कामाला केवळ साक्षरता प्रसाराचे वर्ग काढून हात घालतां येणार नाहीं. ह्या ठिकाणीं लोकशिक्षणाचा कार्यक्रम बहुविध स्वरूपाचा राहील. ह्या देशांत लोकशिक्षणाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठीं उत्पादनक्षम अशा कार्यप्रवृत्तीमार्फतच तो सुरू करावा लागेल. ह्या कार्यप्रवृत्तीमार्फत लोकांना मिळणारें शिक्षण त्यांना जीवन वेतन मिळविण्यास मदत करूं शकेल. ह्यासाठीं लोकशिक्षण वर्गांतून प्रौढांना एकादां मूलद्योग अथवा हस्तव्यवसाय शिकवावा लागेल. हा व्यवसाय शिकलेला प्रौढ आपल्या दैनंदिन गरजा भागवायला समर्थ होऊं शकेल.

ह्यासाठीं लोकशिक्षणाच्या कार्यक्रमाला सुरुवात, 'गवत मका' शिकविणाऱ्या वर्गापासून न करितां, ती एकाद्या कम्युनिटी सेंटरमार्फत (समुदाय केंद्रामार्फत) करावी लागेल. ह्या कम्युनिटी सेंटरमार्फत बहुविध कार्यक्रम आंखला जाईल. हा कार्यक्रम आंखतांना लोक-

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शिक्षणाचा व्यापक व बदललेला असा नवा दृष्टिकोन लक्षांत घेतला जाईल. ह्या कार्यक्रमांत हस्तव्यवसाय वैयक्तिक व सामाजिक आरोग्य, नागरिकशास्त्र, सामान्यज्ञान, सांस्कृतिक, व करमणुकीचे कार्यक्रम ह्यांवर भर दिला जाईल; कारण हे कम्युनिटी सेंटर (समुदाय केंद्र) लोकांना खरेंखुरें लोकशिक्षण देणारी संस्था बनली पाहिजे. ह्या संस्थेमार्फत लोकशिक्षणाचा खरा उद्देश यशस्वी होईल. आज लोक-शिक्षणाचें उद्दिष्ट ज्या वातावरणांत लोक राहतात, त्याच वातावरणांत लोकांचें जीवन सुखी व समृद्ध व्हावें व ते लोकशाहीचे व सबंध जगाचे नागरिक व्हावेत; त्यांच्यामध्यें समाजाबद्दल आत्मियता निर्माण व्हावी हें आहे. हें उद्दिष्ट साध्य होण्यासाठीं ठिकठिकाणीं कम्युनिटी सेंटर्स (समुदाय केंद्रें) आपणाला चालवावीं लागतील.

लोकशिक्षणाच्या कामाला प्रारंभ करतांना गांवामध्यें एकादें कम्युनिटी सेंटर (समुदाय केंद्र) सुरू करावें. ह्या कम्युनिटी सेंटरचें स्वरूप व त्यामार्फत करावयाचीं कामें ह्यांची सुस्पष्ट कल्पना कार्यकर्त्यांना यावी म्हणून त्या योजनेबाबतची माहिती स्वतंत्रपणें ह्या पुस्तकांत दिली आहे. ह्या केंद्रावर लोक नियमितपणें यावेत म्हणून ह्या ठिकाणीं चर्चेचे व करमणुकीचे कार्यक्रम ठेवले जावेत. ह्या चर्चेसाठीं विषय निवडतांना खूप काळजी घ्यावी लागेल. जे विषय प्रौढांच्या डोक्यावरून जातील अथवा ज्या विषयांबद्दल लोकांना आपुलकी वाटणार नाहीं, अथवा त्यांना रस वाटणार नाहीं, असे विषय चर्चेसाठीं निवडले जाऊं नयेत. चर्चेसाठीं चर्चा नको. त्या चर्चेमध्यें जिवंतपणा निर्माण व्हायला पाहिजे. ह्या केंद्रांवर रोजची ताजी बातमी सांगण्याची व्यवस्था व्हावी. ही बातमी सांगतांनाच चर्चेला सुरुवात व्हावी. उदाहरणार्थ :—

आजकाल वर्तमानपत्रांतून सांथीच्या तापाच्या (एनफ्ल्यूएंझा) बातम्या येतात. अशी बातमी वाचून झाल्याबरोबर, चर्चेला सुरुवात करावी. वर्गामधील लोकांना कुणाला हा आजार होऊन गेला असल्यास त्यांना त्यांचे अनुभव सांगायला लावावेत. ह्या अनुभवावरून आजाराचीं

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

लक्षणें कार्यकर्त्यांनीं समजावून सांगावींत. आजार बरा कसा झाला तें विचारावें व त्यानंतर शक्य असल्यास उपाय योजना सांगावी. हा आजार होऊं नये म्हणून काय करतां येईल; त्याबाबत चर्चा करावी व कार्यकर्त्यानें वेळोवेळीं वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या सूचनांच्या मदतीनें मार्गदर्शन करावें.

अशाप्रकारें रोज वर्तमानपत्रांतील बातम्या ऐकण्यासाठीं, त्यांच्या गांवांतील कांहीं अडीअडचणींचा विचार करण्यासाठीं, लोकांना एकत्र जमविण्यांत यावें. पहिले कांहीं दिवस पाटी, पुस्तक, फळा, खडू ह्यांना ह्या वर्गांत आणूच नये. लोक जमायला लागले कीं, हळू हळू शिक्षणामुळें जीवन कसें समृद्ध व सुखी होऊं शकतें ह्या विषयीं त्यांच्याशीं चर्चा करावी. शिक्षणाच्या जोरावर डेन्मार्कसारख्या लहानशा देशानें आपली केवढी प्रगति करून घेतली, शिक्षणामुळें तेथील शेतकरी जोडधंदे कोणते व कसे करितो, त्यामुळें त्याला किती पैसे मिळतात, सहकारी तत्त्वावर हे धंदे केल्यामुळें त्याला कसा फायदा होतो, ह्या सर्व गोष्टी प्रौढांना ह्यावेळीं समजून द्याव्यात. अशा प्रकारें हळू हळू वर्गासाठीं योग्य असें वातावरण तयार करावें. ह्या काळांत वर्गांत येणाऱ्या प्रौढांशीं जितका परिचय अधिक घडेल तितका चांगला. या परिचयांतूनच आपणास प्रौढांचीच चांगली ओळख होणार आहे. तसेच आपलीही ओळख प्रौढास होईल. एकमेकांचे स्वभाव विशेष समजल्यानें परस्परांत आकर्षण निर्माण करतां येईल.

कधीं कधीं वर्गाला सुरुवात एखाद्या कामापासून करावी लागते. लोकांना एकत्र केल्यावर कार्यकर्त्याला त्यांची निकटची गरज समजून घ्यावी लागते. शिकण्यासाठीं ते एकत्र यायला तयार नसतात; पण गांवाला हव्या असलेल्या विहिरीबाबत जर कांहीं विचार होणार असेल तर ते सभेला यायला तयार होतात. अशा वेळीं विहीर खणण्याची योजना आंखावी. ही योजना लोकांनाच कशी राबवितां येईल ह्याचा त्यांच्याच मदतीनें विचार व्हावा. लोक जर श्रमदान करायला तयार झाले तर विहिरीच्या कामाचा प्रारंभ करावा. त्यासाठीं सरकारी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मदत मिळविण्याचा प्रयत्न करावा. हें सर्व काम लोकांकरवीं करवून घ्यावें. कार्यकर्त्यानें मार्गदर्शन करावें, पुढारी होऊं नये. ह्या कामानिमित्त लोक एके ठिकाणीं रोज जमतील व इथूनच लोकशिक्षणाच्या कामाला सुरुवात होऊं शकेल.

प्रौढांच्या वर्गांत रोजचा कार्यक्रम कसा असावा ?

प्रौढांचा वर्ग हा मुलांच्या वर्गाप्रमाणें समजूं नये. त्याला शक्यतों वर्ग न म्हणतां, 'मित्र मंडळ', 'क्लब' असें नांव द्यावें. ह्या वर्गाच्या वेळापत्रकांत भरपूर लवचिकपणा असावा. शाळेंतील यांत्रिकपणा येथें टाळला जावा. वर्गांत येणारे प्रौढ हे दिवसभर राबणारे असतात. कधीं कधीं त्यांना खूप कष्टाचें काम उपसावें लागतें. सुगीच्यासारख्या दिवसांत तर त्यांना अधिकच कष्ट करावे लागतात. अशावेळीं वर्गांतील काम हलकें पण अधिक आकर्षक असावें. त्यामुळें त्यांचा थकवा कमी होऊन, त्यांच्यामध्यें तरतरीतपणा येईल. एकाद्यावेळीं जर प्रौढ खूप कंटाळलेले असले अथवा थकलेले असले तर त्या दिवशीं रोजच्या कार्यक्रमांत बदल केला जावा. अशावेळीं गोष्टी, गाणीं, भजनें इत्यादि कार्यक्रमांवर विशेष भर दिला जावा. सारांश कार्यकर्त्यानें वेळ पाहून आपल्या वेळापत्रकांत बदल करावा.

हें सर्व जरी खरें असलें तरी वर्गांत भोंगळपणा असतां कामा नये. त्याचा पण परिणाम वर्गावर चांगला होत नाहीं. वर्गाच्या कामामध्यें रेखीवपणा असावा, शिस्त असावी, कार्यकर्त्यानें पूर्वतयारी करून वर्गाला जावें. काय बोलायचें, काय शिकवायचें त्याचें टांचण करून तें बरोबर न्यावें. ह्या सर्व गोष्टींचा वर्गावर फार चांगला उपयोग होतो. सर्वसाधारणपणें वर्गाचें काम पुढीलप्रमाणें चालवावें.

१. **प्रार्थना** :– वर्गाची सुरुवात रोज एकाद्या प्रार्थनेनें करावी. प्रार्थनेची गरज काय ? असा प्रश्न विचारला जाईल. ह्या बाबतींत अनुभव असा आहे कीं, खेड्यांतील रात्रीचे वर्ग अनियमितपणें भरतात. लोक ८ पासून वर्गांत येऊं लागतात. शेवटचा मनुष्य साडेदहा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

लक्षणें कार्यकर्त्यांनीं समजावून सांगावींत. आजार बरा कसा झाला तें विचारावें व त्यानंतर शक्य असल्यास उपाय योजना सांगावी. हा आजार होऊं नये म्हणून काय करतां येईल; त्याबाबत चर्चा करावी व कार्यकर्त्यांनें वेळोवेळीं वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या सूचनांच्या मदतीनें मार्गदर्शन करावें.

अशाप्रकारें रोज वर्तमानपत्रांतील बातम्या ऐकण्यासाठीं, त्यांच्या गांवांतील कांहीं अडीअडचणींचा विचार करण्यासाठीं, लोकांना एकत्र जमविण्यांत यावें. पहिले कांहीं दिवस पाटी, पुस्तक, फळा, खडू ह्यांना ह्या वर्गांत आणूच नये. लोक जमायला लागले कीं, हळू हळू शिक्षणामुळें जीवन कसें समृद्ध व सुखी होऊं शकतें ह्या विषयीं त्यांच्याशीं चर्चा करावी. शिक्षणाच्या जोरावर डेन्मार्कसारख्या लहानशा देशानें आपली केवढी प्रगति करून घेतली, शिक्षणामुळें तेथील शेतकरी जोडधंदे कोणते व कसे करितो, त्यामुळें त्याला किती पैसे मिळतात, सहकारी तत्त्वावर हे धंदे केल्यामुळें त्याला कसा फायदा होतो, ह्या सर्व गोष्टी प्रौढांना ह्यावेळीं समजून द्याव्यात. अशा प्रकारें हळू हळू वर्गासाठीं योग्य असें वातावरण तयार करावें. ह्या काळांत वर्गांत येणाऱ्या प्रौढांशीं जितका परिचय अधिक घडेल तितका चांगला. या परिचयांतूनच आपणास प्रौढांचीच चांगली ओळख होणार आहे. तसेच आपलीही ओळख प्रौढास होईल. एकमेकांचे स्वभाव विशेष समजल्यानें परस्परांत आकर्षण निर्माण करतां येईल.

कधीं कधीं वर्गाला सुरुवात एखाद्या कामापासून करावी लागते. लोकांना एकत्र केल्यावर कार्यकर्त्याला त्यांची निकटची गरज समजून घ्यावी लागते. शिकण्यासाठीं ते एकत्र यायला तयार नसतात; पण गांवाला हव्या असलेल्या विहिरीबाबत जर कांहीं विचार होणार असेल तर ते सभेला यायला तयार होतात. अशा वेळीं विहीर खणण्याची योजना आंखावी. ही योजना लोकांनाच कशी राबवितां येईल ह्याचा त्यांच्याच मदतीनें विचार व्हावा. लोक जर श्रमदान करायला तयार झाले तर विहिरीच्या कामाचा प्रारंभ करावा. त्यासाठीं सरकारी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मदत मिळविण्याचा प्रयत्न करावा. हें सर्व काम लोकांकरवीं करवून घ्यावें. कार्यकर्त्यानें मार्गदर्शन करावें, पुढारी होऊं नये. ह्या कामानिमित्त लोक एके ठिकाणीं रोज जमतील व इथूनच लोकशिक्षणाच्या कामाला सुरुवात होऊं शकेल.

प्रौढांच्या वर्गांत रोजचा कार्यक्रम कसा असावा ?

प्रौढांचा वर्ग हा मुलांच्या वर्गाप्रमाणें समजूं नये. त्याला शक्यतों वर्ग न म्हणतां, 'मित्र मंडळ', 'क्लब' असें नांव द्यावें. ह्या वर्गाच्या वेळापत्रकांत भरपूर लवचिकपणा असावा. शाळेंतील यांत्रिकपणा येथें टाळला जावा. वर्गांत येणारे प्रौढ हे दिवसभर राबणारे असतात. कधीं कधीं त्यांना खूप कष्टाचें काम उपसावें लागतें. सुगीच्यासारख्या दिवसांत तर त्यांना अधिकच कष्ट करावे लागतात. अशावेळीं वर्गांतील काम हलकें पण अधिक आकर्षक असावें. त्यामुळें त्यांचा थकवा कमी होऊन, त्यांच्यामध्यें तरतरीतपणा येईल. एकाद्यावेळीं जर प्रौढ खूप कंटाळलेले असले अथवा थकलेले असले तर त्या दिवशीं रोजच्या कार्यक्रमांत बदल केला जावा. अशावेळीं गोष्टी, गाणीं, भजनें इत्यादि कार्यक्रमांवर विशेष भर दिला जावा. सारांश कार्यकर्त्यानें वेळ पाहून आपल्या वेळापत्रकांत बदल करावा.

हें सर्व जरी खरें असलें तरी वर्गांत भोंगळपणा असतां कामा नये. त्याचा पण परिणाम वर्गावर चांगला होत नाहीं. वर्गाच्या कामामध्यें रेखीवपणा असावा, शिस्त असावी, कार्यकर्त्यानें पूर्वतयारी करून वर्गाला जावें. काय बोलायचें, काय शिकवायचें त्याचें टांचण करून तें बरोबर न्यावें. ह्या सर्व गोष्टींचा वर्गावर फार चांगला उपयोग होतो. सर्वसाधारणपणें वर्गाचें काम पुढीलप्रमाणें चालवावें.

१. **प्रार्थना** :– वर्गाची सुरुवात रोज एकाद्या प्रार्थनेनें करावी. प्रार्थनेची गरज काय ? असा प्रश्न विचारला जाईल. ह्या बाबतींत अनुभव असा आहे कीं, खेड्यांतील रात्रीचे वर्ग अनियमितपणें भरतात. लोक ८ पासून वर्गांत येऊं लागतात. शेवटचा मनुष्य साडेदहा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

अकरापर्यंत येतो. लोकांना वेळेवर वर्गांत येण्याची शिस्त लावायला हवी. तोंडी सांगून हें काम होत नाहीं. लोकांजवळ घड्याळें नसतात. त्यांना वेळेचें भान नसतें. ह्यासाठीं वर्ग सुरू करण्यापूर्वीं एक मोठी घंटा द्यावी. घंटा झाली कीं लोकांना वर्गाची वेळ झाल्याचें समजतें. वर्गांत आधीं प्रार्थना घेतात हें समजलें कीं, 'देवाचें नांव कानीं पडावें,' म्हणून लोक वेळेवर येतात. आपल्या विभागांतील प्रौढ श्रद्धाशील अंतःकरणाचे असतात. प्रार्थनेला सुरुवात होण्यापूर्वीं ते तोंडांतील तंबाखू थुंकून टाकतात व हातांतील विडीचें थोटूक फेकून देतात. ह्यामुळें योग्य वातावरणांत वर्गाला सुरुवात होते. ह्या प्रार्थनेला गांवांतील इतर लोक पण हळूहळू येऊं लागतात. प्रार्थना शोधतांना कार्यकर्त्यानें विचार करावा. पुष्कळ ठिकाणीं संस्कृत प्रार्थना निवडली जाते. त्या प्रार्थनेंत वर्गांतील प्रौढांना भाग घेतां येत नाहीं. ते नुसतेच डोळे बंद करून उभे राहतात. हें चांगलें नाहीं. सर्वांना म्हणतां येईल अशी सोपी, सुटसुटीत पण तालबद्ध प्रार्थना असावी. ती म्हणतांनाच तिचा अर्थ प्रौढांना सहज कळावा.

२. **ताजी बातमी :–** प्रार्थनेनंतर रोजची ताजी बातमी वर्गांत सांगितली जावी. ह्या बातम्या सांगतांना कार्यकर्त्यानें काळजी घ्यावी. ज्या बातम्या प्रौढांच्या डोक्यावरून जातील, त्यांना समजणार नाहींत, त्यांना ज्यामध्यें रस वाटणार नाहीं, ज्यामुळें त्यांना चांगलें वळण लागणार नाहीं, गुन्हेगारी प्रवृत्ति त्यांच्यामध्यें बळावेल, अशा बातम्या सांगितल्या जाऊं नयेत. उदाहरणार्थ :– 'ट्रिग्वेले माउंट्से टुंगला भेटायला गेला'; किंवा 'डॅग् हॅमर्शील्ड नाझरला भेटला'; ह्या बातम्या राजकारणांत रस असणाऱ्यांना महत्त्वाच्या वाटतील, पण ग्रामीण भागांतील प्रौढांना ह्या बातम्या कशाला सांगायच्या ? पण कार्यकर्ते त्या सांगतात; कारण वर्तमानपत्रांत त्या ठळक टाईपांत येतात; तसेंच 'नवऱ्यानें बायकोचें नाक कापलें' ही बातमी पण कार्यकर्ते सांगतात. ह्यासाठीं वरील इषारा दिला आहे.

बातम्या सांगण्यापूर्वीं कार्यकर्त्यांनीं त्यांची काळजीपूर्वक निवड करावी. स्थानिक महत्त्वाच्या बातम्या, बाजारभाव, हवामानाचे अंदाज,

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सांथीच्या रोगांची चढाई इत्यादि बाबतच्या बातम्या लोकांना जरूर सांगाव्यात. त्याचप्रमाणें विकासयोजनेचीं देशांत चाललेलीं कामें, त्यांची प्रगति, आपल्या जिल्ह्यांत व तालुक्यांत ह्याबाबत होणारें कार्य, सरकारच्या विविध योजना, त्यासाठीं मिळणारी मदत ह्या बाबतची माहिती देणाऱ्या बातम्या जरूर सांगाव्यात. ज्यामुळें सहकार्य स्वावलंबना, संघटना यांचे महत्त्व पटेल अशा सुसंस्कार करणाऱ्या बातम्या निवडून सांगाव्यात. बातम्या सांगतांना कार्यकर्त्यानें त्यावर भाष्य करूं नये. लोकांनीं शंका विचारल्या तर उत्तरें द्यावींत. प्रौढांचे वर्ग चालविणाऱ्या कार्यकर्त्याची भूमिका मित्राची असावी; पक्षप्रचारकाची केव्हांही असतां कामा नये.

३. **खाजगी संभाषण :–** बातमी सांगून झाल्यावर कार्यकर्त्यानें प्रौढांशीं थोडा वेळ खाजगी बातचीत करावी. प्रौढ वर्गातील शिक्षक हा वर्गातील प्रौढांचा मित्र व नायक बनला पाहिजे. प्रौढांना विश्वासांत घेऊन त्यांच्याशीं गप्पा मारल्या तर त्यांच्या अडीअडचणींची, त्यांच्या जीवनाची कल्पना येते व त्याप्रमाणें त्यांना जें शिकवायचें त्यामध्यें बदल करतां येतो. ह्याखेरीज त्यांना हवी ती मदत करून त्यांच्याशीं जिव्हाळ्याचें नातें निर्माण करतां येतें. ह्या सर्वांचा आपल्या कामांत खूप उपयोग होतो. ह्या संभाषणाच्या वेळीं बैल घेण्यासाठीं धडपडणाऱ्या महादू बाळाला तगाईसाठीं अर्ज करण्याचा सल्ला देतां येईल. नातीला डांग्या खोकला झाल्यामुळें वर्गाला न येऊं शकणाऱ्या म्हाळसाबाईला एकादें चांगलें घरगुती औषध सुचवितां येईल. ह्या संभाषणासाठीं खर्चलेला वेळ वर्गामध्यें चांगलें स्नेहाचें व सलोख्याचें नातें उत्पन्न करायला मदत-रूप ठरतो.

४.. **कालच्या पाठाची उजळणी :–** वर्गामध्यें वाचनलेखन सुरू झाल्यावर रोज आधीं झालेल्या पाठाची उजळणी करण्यांत कांहीं वेळ जरूर घालवावा. प्रौढ लौकर शिकतो. तसा तो लौकर विसरण्याचा पण संभव असतो. ह्यासाठीं मागील पाठाची उजळणी झाल्यानंतरच नवा पाठ घ्यावा. ह्या ठिकाणीं आणखी एक सूचना करावीशी वाटते.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रौढांच्या वर्गांत आधीं वाचन शिकवावें व नंतर लेखन शिकवावें. अनुभव उलट येतो. सर्व अक्षरें व बाराखडचा प्रौढाला लिहितां येईपर्यंत त्याला वाचन शिकविलें जात नाहीं. आधीं वाचन शिकविलें कीं अक्षरांचा परिचय नीट होतो व नंतर लेखन शिकविणें सोपें जातें.

५. **नवा पाठ** :– रोज नित्यनेमानें प्रौढांना कांहीं तरी नवें शिकविणें जरूर असतें. आपण वर्गांत रोज कांहीं तरी नवीन शिकतों, ही जाणीव जर त्याला झाली तर तो वर्गांत यायचें टाळत नाहीं. आपणाला रोज येथें कांहीं तरी नवें नवें मिळतें हा अनुभव त्याला येऊं लागणें जरूर असतें. आपण रोज नवें नवें, जास्त जास्त शिकत आहोंत ह्या जाणीवेनें त्याचा आत्मविश्वास वाढीला लागतो.

६. **सामान्य माहिती** :– ह्यानंतर रोज कांहीं तरी नवी नवी माहिती प्रौढांना दिली गेली पाहिजे. लोकशिक्षण म्हणजे केवळ साक्षरताप्रसार नव्हे. केवळ लिहायला व वाचायला शिकविण्यासाठीं हा वर्ग आपण चालवीत नाहीं. प्रौढांचें जीवन अधिक सुखी व समृद्ध बन-विण्यासाठीं आपण त्याला शिक्षण देणार. ह्यासाठीं तो ज्या क्षेत्रांत काम करीत असेल, त्या क्षेत्रांत त्याला आजच्यापेक्षां उद्यां अधिक चांगलें काम करतां आलें पाहिजे. ह्यासाठीं त्याला त्याच्या व्यवसाया-विषयक माहिती द्यावी लागेल. तो जर शेतकरी असेल तर त्याला शेती-विषयक माहिती द्यावी लागेल. पशुपालनाबद्दल, कोंबडयांच्या पैदासीबद्दल अशी अनेक प्रकारची माहिती त्याला द्यावी लागेल. त्याचप्रमाणें त्याला त्याच्या स्वतःच्या आरोग्याबद्दल, व गांवच्या आरोग्याबद्दल पण माहिती द्यावी लागेल. प्रौढ हा ग्रामपंचायतीचा व देशाचा नागरिक आहे, ह्या दृष्टीनें त्याला कांहीं हक्क मिळाले आहेत. कांहीं जबाबदाऱ्या त्याच्यावर पडल्या आहेत. ह्या सर्वांची कल्पना त्याला द्यावयाची आहे. अभ्यास-क्रमांत हे सर्व विषय घातले आहेत. त्यांपैकीं एकेका विषयावर रोज १० मिनिटांत माहिती सांगितली जावी. असे विषय व त्यावर माहिती सांगणारे मुद्दे स्पष्ट करणारी ‘मार्गदर्शिका’ नांवाची एक पुस्तिका

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

महाराष्ट्र प्रादेशिक लोकशिक्षण समितीनें तयार केली आहे. ती मिळवून तिचा वापर करावा.

७. गोष्ट सांगणें :– एवढा कार्यक्रम झाला कीं रोज एकादी गोष्ट सांगावी. प्रौढांना गोष्टी आवडतात. ह्या गोष्टी नीट निवडाव्यात. ह्या गोष्टींमधून माणुसकीची शिकवण दिली जावी. जीवनामध्यें आपण ज्यांना चांगली मूल्यें मानतों त्या मूल्यांची जोपासना व्हावी ह्या हेतूनें गोष्टी सांगितल्या जाव्यात. उगाच पाल्हाळिक व अर्थहीन गोष्टी सांगूं नयेत. साधारणपणें त्या गोष्टी कोणत्या स्वरूपाच्या असाव्यात ह्याची कल्पना यावी म्हणून नमुन्यादाखल कांहीं गोष्टी ह्या पुस्तकांत स्वतंत्र विभागांत आम्हीं घातल्या आहेत.

८. गाणीं म्हणणें :– वर्गाची सुरुवात प्रार्थनेनें व शेवट गाण्यानें व्हावा. वर्गांत येणाऱ्या प्रत्येक प्रौढाला कांहीं गाणीं म्हणतां आलीं पाहिजेत. ह्यासाठीं कार्यकर्त्यांनीं कांहीं गाणीं गोळा करावींत. अभंग, ओव्या, पाळणें, भजनें, पोवाडे ह्यांच्या जोडीला साक्षरताप्रसाराची, मद्यपानबंदी प्रचाराचीं इत्यादि गाणीं शिकवावींत. 'झाला महार पंढरीनाथ', 'हातीं नाहीं बळा दारी नाहीं आड', विठू माझा लेकूरवाळा, असलीं लोकप्रिय पदें व 'गांधीबाबाची शपथ हायरं। दारू कुणी बी पियाची नायर' अथवा 'घरधनी ऐका मी सांगत्यें तुम्हाला, माझ्या बाळाला हो शाळेंत घाला' अशीं गाणीं शिकवावींत. नमुना म्हणून कांहीं गाणीं पण ह्या पुस्तकांत शेवटीं दिलीं आहेत.

रोज ह्याप्रमाणें वर्गाचें काम चालविलें तर वर्गांतील 'तोच तो पणा' व रुक्षपणा जाऊन, प्रौढांना वर्गांत कंटाळा येणार नाहीं, वर्ग आकर्षक होईल. प्रौढांना आपल्या पदरांत रोज कांहीं तरी नवें, चांगलें पडतें ह्याची खात्री होईल व त्यामुळें वर्ग चांगला चालेल.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

५. लोकशिक्षणाच्या पद्धति

कोणत्याही शिक्षणाच्या पद्धतींचा विचार करतांना शिकविणारा शिक्षक, शिकणारा प्रौढ व शिकविला जाणारा विषय या तीन विभागांचा विचार करावा लागणार. कुशल शिक्षक, विश्वासू विद्यार्थी व आवडीचा विषय यांतील कोणतीही एक बाब अनुकूल असेल व इतर बाबी प्रतिकूल नसतील तरी शिक्षणाचें काम सोपें होईल. परंतु हे तीनही विभाग अनुकूल असतील तर शिक्षण अतिशयच सहज होईल. तरीपण शिक्षण देण्याच्या किंवा शिक्षण घेण्याच्या ज्या निरनिराळ्या पद्धति आहेत त्यांचा विचार करणें जरूर आहे. या पद्धति लोकशिक्षणाच्या आहेत. त्या केवळ साक्षारताप्रसाराच्या नाहींत एवढी गोष्ट मात्र लक्षांत ठेवणें जरूर आहे.

लोकशिक्षणाच्या पद्धति पुढीलप्रमाणें आहेत–(१) उमेदवारी (२) प्रयोगशाळा (३) कारखाना (Work-shop) (४) व्याख्यान (५) चर्चा (६) परिसंवाद (७) वाचनालय (८) सेमिनार (९) योजना (Project).

१. उमेदवारी पद्धतीनें शिकणें ही सर्वांत जुनी पद्धत आहे. एकाद्या निष्णात कारागिराजवळ जाऊन आपणास पाहिजे ती कला शिकतां येईल. शिकविणाऱ्याच्या मर्जीप्रमाणें तो उमेदवाराला शिकवील. शिकणाऱ्यांची योग्यता व इच्छा पाहून तो शिकवील व शिक्षणाचें कार्य चालू राहील. आजच्या या धकाधकीच्या व व्यवहारी होत चाललेल्या जगांत उमेदवारीनें शिकणें कितपत शक्य आहे याची शंका आहे. तरी पण कांहीं ठिकाणीं या पद्धतीचा अवलंब करणें शक्य असेल तर त्याचा जरूर उपयोग करावा. या शिक्षणासाठीं शिकणाऱ्यास अधिक कष्ट पडतील परंतु शिक्षकाच्या योग्यतेप्रमाणें विद्यार्थ्यांचा कस वाढेल यांत शंका नाहीं. कारण त्याला प्रत्यक्ष कृतींतून शिक्षण मिळेल. तें व्यवहाराशीं व जीवनाशीं विसंगत असणार नाहीं. एकदां विद्या हस्तगत झाली कीं, तिचा तात्काळ उपयोग करतां येईल. या पद्धतीनें

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मिळालेलें शिक्षण अधिक भरीव असतें. कारण तें प्रात्यक्षिकांतूनच मिळालेलें असतें. तांत्रिक शिक्षणासाठीं आजही या पद्धतीचा वापर अनेक ठिकाणीं विशेषतः गिरण्या व कारखान्यांतून चालू आहे.

२. शास्त्राचा अभ्यास करावयास प्रयोगशाळा चांगली. कारण सर्वच गोष्टी केवळ उमेदवारीनें शिकतां येणार नाहींत. विशेष करून जी विद्या, जो विषय प्रत्यक्ष रोजच्या रोज व्यवहारांत उपयोगांत आणावयाचा असा गरजेचा आहे. त्यांतील अधिक प्रगतीसाठीं त्याच्या शास्त्रीय अभ्यासाची गरज आहे. त्याला प्रयोगशाळेचा उपयोग करून शिकणें चांगलें. उदाहरणार्थ—खतांतील घटकांचा अभ्यास करायचा असेल तर प्रयोगशाळेंत त्याचें ज्ञान करून घेणें सोपें होईल. एकदां त्याचें ज्ञान प्रयोगशाळेंत झालें म्हणजे तें ज्ञान पाहिजे तेव्हां प्रत्यक्ष उपयोगांत आणतां येईल. प्रयोगशाळेंत मिळविलेलें ज्ञान आपणास लोककल्याणासाठीं उपयोगांत आणावयाचें आहे एवढी गोष्ट शिकणाऱ्यानें ध्यानांत ठेवली पाहिजे. या नव्या प्रयोगाचे चांगले निर्णय व्यवहारांत वापरण्याची प्रवृत्ति जनतेंत लोकशिक्षणानें वाढवावयाची आहे. त्यामुळें शास्त्रीय संशोधनावरील श्रद्धा वाढेल. ती वाढविण्यास ही पद्धति उपयुक्त आहे.

३. कारखान्यांत प्रवेश करूनही माणसाला शिकतां येतें. कांहीं कारखान्यांत शिकणाऱ्या लोकांची विशेष सोय केलेली असते. प्रयोगशाळेंत थोडाफार तात्विक अभ्यास होतो. परंतु कारखान्यांत प्रत्यक्ष व्यवहारावर भर दिलेला असतो. प्रयोगशाळेंत संशोधनास जागा असते, पण कारखान्यांत त्या संशोधनाचा प्रत्यक्ष उपयोग केलेला असतो. साखर कारखान्यांत काम करून साखरेसंबंधीं सर्व माहिती घेतां येईल. कापडाच्या गिरणींत काम करून कापड धंद्यासंबंधीं माहिती मिळेल. नमुनेदार शेतीवर काम करून शेतीचें ज्ञान मिळेल. आज भारतांत कारखाने व उद्योगधंदे यांची जी वाढ होत आहे त्यामुळें ते कारखाने किंवा धंदे उभारतांना त्यांच्याशीं संबंध आलेल्या लोकांना कितीतरी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

तांत्रिक आणि नवीन ज्ञान मिळत आहे. कारखान्यांच्या वाढीनें मिळणारें हें लोकशिक्षणच आहे.

४. व्याख्यान पद्धत ही सर्वांत जुनी पद्धत आहे. तुम्हाला जें सांगायचें आहे तें चार लोक जमवून त्यांना सांगा, पटवून द्या व ज्ञानाचा प्रसार करा. ज्यावेळीं जगांत पुस्तकें नव्हतीं, लिहिण्याचीं साधनें नव्हतीं, छापण्याची कला नव्हती त्यावेळीं लोकांनीं ऐकूनच ज्ञान मिळविलें. वक्ता जर प्रभावी असेल तर श्रोत्याचें मन फुलून जाईल. त्याला नवीन विचार कळतील. त्याच्या ज्ञानांत भर पडेल. प्रवचन, पुराण, व्याख्यान, ह्या तीनही गोष्टींमुळें समाजानें आपली संस्कृति जिवंत ठेवली आहे. माणसाच्या सर्व कृतींचें उगमस्थान विचारच आहेत. नव विचारांतूनच नवीन आचार जन्माला येतात. तेजस्वी विचारामुळेंच लोक सुधारणेच्या मार्गाला लागलेले आहेत. निरनिराळया धर्मांचा प्रसार व तत्त्वज्ञानांचा प्रचार केवळ व्याख्यानांमुळें झाला. अनेक देशांत राज्यक्रांत्या झाल्या त्याही या व्याख्यानामुळेंच. पू. विनोबाजी भावे यांनी "श्रवण शाळां"ना लोक शिक्षणाचें प्रधान अंग म्हणून फारच महत्त्व दिलें आहे. निरक्षरांना ज्ञान देण्यासाठीं 'श्रवण शाळा' सारखें दुसरे प्रभावी साधन नाहीं. शिवाय श्रवण शाळांसाठीं खर्च फारसा येत नाहीं. बोलणारा व ऐकणारा हे एकत्र झाले कीं श्रवण शाळा सुरू होते. लोकशिक्षण वर्गांतही व्याख्यानांचा उपयोग करून घ्यावा असें वारंवार सांगितलें जातें. परंतु हीं व्याख्यानें रटाळ, कंटाळवाणी व निरस न होतील याची काळजी घेतली पाहिजे. त्यासाठीं व्याख्यानाचे विषय शक्यतों जीवनाशीं निगडित असावेत. भाषा व मांडणी म्हणजे व्याख्यानाची पातळी ऐकणारांना झेपेल इतपत राखली जावी. अशी व्याख्यानें शिक्षणाला उपयुक्त होतील. परंतु केवळ व्याख्यानानेंच शिक्षण होईल असें म्हणणें धाडसाचें होईल.

५. चर्चा कुणाला आवडत नाहीं? सर्वजण चर्चा करीत असतातच. कोणत्याही नवीन गोष्टीवर चर्चा झाली नाहीं असें होत नाहीं. परंतु या चर्चांना पद्धतशीर स्वरूप देणें जरूर आहे. आजकाल कोणत्याही विषयावर पद्धतशीर चर्चा होत नाहींत.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ज्या विषयावर चर्चा करायची त्या विषयाची अभ्यासू नेत्याच्या नेतृत्वाखालीं चर्चा चालणें जरूर आहे. चर्चेमुळें लोकांच्या शंका–समाधानास वाव मिळतो. प्रत्येकाचें समाधान होतें व प्रत्येकाच्या ज्ञानांत अनेकांच्या अनुभवाची भर पडते. मात्र चर्चा चालू असतांना मुख्य विषय सोडून लोक भलतीकडे भकणार नाहींत याची काळजी घेतली पाहिजे. अनेक वेळीं चर्चा चालू असतांना लोक मुद्दा सोडून भलतीकडे वाहात जातात. त्यांना पुन्हा आपल्या मूळ पदावर आणण्याचें काम चर्चेचें नेतृत्व करणाऱ्या नेत्यास करावें लागतें. कित्येक वेळीं व्याख्यान व चर्चा या दोन्ही गोष्टींचा अवलंब करावा लागतो. एकाद्या विषयावर व्याख्यान देऊन शेवटीं चर्चा केल्यास तो कार्यक्रम शैक्षणिकदृष्टचा मोलाचा होतो. चर्चा–पद्धतींत अनेकांना भाग घेण्यास वाव मिळत असल्यानें ही पद्धति लोकशिक्षणाला हितावह आहे. निरनिराळ्या गटां–कढून गटवार एकाद्या विषयावर चर्चा करवून घेतली तर अनेकांना अधिक वावही या पद्धतीनें मिळूं शकतो.

६. परिसंवादाचे दोन भाग करतां येतील. ज्या विषयावर परिसंवाद घडवावयाचा असेल त्या विषयांतील तज्ज्ञ लोकांचीं व्याख्यानें किंवा चर्चा पहिल्या भागांत होतात. या व्याख्यानांत त्या विषयावरील विविध मतें प्रकट केलीं जातात. नंतर दुसऱ्या विभागांत श्रोतेलोक आपलीं मतें मांडतात. तज्ज्ञ लोकांच्या उद्‌बोधक व्याख्यानानें सामान्य माणसांची विचारशक्ति जागृत होते व त्यामुळें परिसंवादांत ते लोकही मोलाची भर टाकतात. कित्येक वेळीं रेडिओवर असे परिसंवादाचे कांहीं कार्यक्रम होतात. तें ऐकण्यासाठीं ग्रामीण विभागांतील लोक एकत्र येतात. कार्यक्रम झाल्यानंतर लोक चर्चा करतात व आपल्या शंका रेडिओ केंद्राला कळवितात. रेडिओ केंद्र त्यावर उत्तरें पाठवितें. " नभोवाणी शेतकरी मंडळ " या नांवाखालीं ऑल इंडिया रेडिओनें ही योजना राबविली आहे. या योजनेमुळें झालेल्या कामाची पाहणीही करण्यांत आली. लोकशिक्षणाचें उत्कृष्ट कार्य या नभोवाणी शेतकरी मंडळानें साधल्याचें या पाहणींत लक्षांत आलेलें आहे.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

परीसंवादांत तज्ज्ञांच्या व्याख्यानाइतकेंच महत्त्व श्रोत्यांची चर्चा, शंका व त्यांचें समाधान याला देतात.

७. वाचन करतां आलें कीं, वाचनालयाचा स्वतंत्रपणें उपयोग करून ज्ञान मिळवितां येतें. शेतीविषयाचीं पुस्तकें वाचून शेतीविषयाच्या अडचणी सोडवून घेतां येतात. जगांतील विविध विषयांचें ज्ञान घर बसल्या मिळण्याची सोय आजकाल पुस्तकामुळें झाली आहे. ग्रामीण विभागांत स्थिर व फिरती वाचनालयें चालूं करतां येतील. लोक ज्ञान घेण्यासाठीं स्थिर वाचनालयांत येतील परंतु लोकांच्या वाड्यावस्त्या-पर्यंत ज्ञान पोहोंचविण्याचें काम फिरती वाचनालयेंच करूं शकतील. आजकाल सर्व विषयांवर पुस्तकें मिळूं शकतात. ज्याला जें वाचावयाचें असेल तें त्याला वाचायला मिळूं शकेल. मात्र जो मजकूर वाचला असेल तो समजून घेऊन आपल्या विचाराशीं त्याची सांगड घालून जीवनाच्या समृद्धीसाठीं त्याचा उपयोग करण्याची वृत्ति वाचकांत निर्माण केली पाहिजे. वाचनालयांचें कार्य प्रभावीपणानें चालवून लोकशिक्षणासाठीं त्याचा कसा जास्तींत जास्त उपयोग करावा याबद्दल पुढें स्वतंत्रपणें चर्चा केली आहे.

८. सेमिनार. एखाद्या विषयाच्या निरनिराळ्या विभागवार स्वतंत्र अभ्यास करून त्या विषयाच्या सर्व अंगांवर पुनः सर्वांनीं एकत्र विचार करणें ही सेमिनार पद्धति होय. सेमिनार पद्धति आपणांकडे नवीनच आहे. सेमिनारमध्यें भाग घेणारे सर्व लोक अभ्यासू व तज्ज्ञ असतात. सेमिनारसाठीं आलेल्या सर्व लोकांचे गट करून प्रत्येक गटास ज्या विषयाचा अभ्यास करावयाचा त्याच्या एका अंगावर चर्चा करण्यास सांगितलें जातें. गटाच्या चर्चेचा वृत्तांत सर्वसाधारण सभेंत सांगितला जातो व तेथें सर्व विभागावर पुन्हा एकत्रित चर्चा होते. सेमिनारमध्यें घेतलेले निर्णय सर्वांच्या विचारानें घेतलेले असतात. त्यामुळें विषयाचा परिपूर्ण विचार सेमिनार पद्धतीनें होतो. सेमिनारमधील चांगल्या विचारांचा व निर्णयांचा पुढील कामाला चांगला उपयोग होतो.

९. योजना पद्धतींत शिकणारा प्रौढ प्रत्यक्ष कार्यांतून शिक्षण घेतो. ज्याची अत्यंत निकड आहे असें एखादें काम हातीं घेऊन जसजशा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

अडचणी येतील तसतशा त्या सोडविण्यास मदत केली असतां लोक शिकतात असा अनुभव आहे. गांवांत पाण्याची अडचण असेल तर विहीर खोदण्याचें काम हातीं घायचें व त्यासाठीं योग्य अधिकाऱ्याकडे अर्ज करायचा, विहिरीची जागा ठरवायची, साहित्य गोळा करायचें, लोकांचे गट करायचे, कामाची विभागणी करायची, विहीर बांधून घेण्याची योजना आंखायची, विहीर चांगल्या अवस्थेंत ठेवायची इत्यादि कामें करीत असतांना अनेक विषय समजून देतां येतील. योजना पद्धतींत लोक प्रत्यक्ष काम करीत असतांनाच शिकतात व ज्यावेळीं ज्या विषयाची अत्यंत गरज भासते त्यावेळीं त्या विषयाची माहिती घेतात. परदेशांत समाज शिक्षणासाठीं योजना पद्धतीचा प्रत्यक्ष उपयोग कसा करतात याचें उदाहरण, " न्यूझिलंडमधील मावरी लोकांची लांकडाची गिरणी " हा विषय या पुस्तकांत पुढें दिला आहे.

या सर्व पद्धतींचा विचार केल्यानंतर ही गोष्ट सहज लक्षांत येईल कीं, लोकशिक्षणाच्या कार्यास केवळ कोणतीही एकच पद्धत उपयोगांत आणतां येईल असें नव्हे. वर नमूद केलेल्या अनेक पद्धतींचें मिश्रण करणें जरूर पडेल. अट्टाहासानें कोणत्याही एकाच पद्धतीला चिकटून बसणें बरोबर होणार नाहीं. यासाठीं ज्या वेळीं जी पद्धत उपयोगी पडेल त्याचा वापर जरूर करावा. परंतु प्रौढ शिक्षण विशेष प्रभावी करण्यासाठीं प्रौढांच्या आवडीनिवडीचा विचार करावा. चर्चा, व्याख्यानें, ग्रामसुधारणेचीं कामें यांवर अधिक भर द्यावा. कारण प्रौढांना भाग घ्यायला जास्त वाव त्यांमध्यें असतो. आपणांकडे चालू असलेल्या विकास योजनेच्या निरनिराळ्या कामांत लोकशिक्षण मिळण्यास भरपूर वाव आहे. लोकशिक्षणाचे दृष्टीनें या योजनांचा उपयोग मात्र करून घेतला पाहिजे.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

६. वाचनाचा आरंभ

पद्धति

वाचन हा ज्ञान मिळविण्याचा सोपा मार्ग आहे. म्हणून नवशिक्या प्रौढांच्या शिक्षणांत वाचनाचें महत्त्व फार आहे. स्वतंत्र भारतांतील लोकशाही कारभारास लोकशिक्षणाची गरज आहे. म्हणून लोकशिक्षणाच्या व्यापक कार्यक्रमांत वाचनास म्हणजेच साक्षरतेला मानाचें स्थान प्राप्त झालें आहे. ही साक्षरता ज्या प्रौढांना द्यावयाची त्यांच्याबद्दलची परिस्थिति पाहिली तर ते प्रौढ शिकायला नाराज आहेत. शिकायला नाराज असलेल्या प्रौढांना राजी करून त्यांना शिक्षण द्यावयाचें अवघड काम लोकशिक्षण कार्यकर्त्याला करावें लागतें. हें अवघड काम सोपें करण्यासाठीं शिक्षणाच्या पद्धतीचें ज्ञान आवश्यक आहे. लोकशिक्षण वर्गांतील नवशिक्या प्रौढांना वाचन कसें शिकवावें यावर शास्त्रीय दृष्टीनें चर्चा होत आली आहे. **डॉ. लॉबाक**सारख्या शिक्षण तज्ज्ञानें या विषयावरील आपल्या विचारांचा व्याख्यानद्वारें प्रचार केला आहे.

नवशिक्या प्रौढांना वाचन शिकविणें हें शाळेंतील मुलांना वाचन शिकविण्याच्या कामाहून अगदीं निराळ्या पद्धतीचें काम आहे; असें लक्षांत घ्यावें लागतें. कारण लहान मुलांची भाषा, शब्दसंपत्ति, अनुभव, आवडीचे विषय, मनाची प्रवृत्ति व शिक्षणाला अनुकूल अशी परिस्थिति असते. प्रौढांची परिस्थिति पाहिली तर त्यांची भाषा व शब्दसंपत्ति आणि अनुभव वाढलेले असतात. त्यांच्या आवडीचे विषय त्यांच्या संसारांतील गरजांचे असतात. दिवसभर कष्ट करून कामानें शिणलेला प्रौढ शिक्षणासारख्या कार्याला उत्साह दाखवूं शकत नाहीं. त्याच्या मनाची प्रवृत्ति आणि त्याची परिस्थिति हीं शिक्षणाला प्रतिकूल आहेत असें दिसतें. म्हणून प्रौढशिक्षणांत लोकरंजनांतून लोकशिक्षणाकडे जाण्याचा मार्ग जसा सुलभ आहे; तसाच जीवनांतील गरजांना धरून शिकवणेंही आवश्यक आहे. म्हणून प्रौढांना वाचन शिकविण्याच्या पद्धतीचा विचार करतांना '**जीवनांतील गरज**' आणि '**रंजन**' यांना त्या पद्धतींत किती अवसर मिळाला आहे हें पाहावें लागतें.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

बालशिक्षण पद्धतीचा विचार केला तर–ऋषिकालीन धूळाक्षर पद्धति म्हणजे श्रीगणेशापासून अ, आ इत्यादि स्वर 'क, ख' हीं व्यंजनें शिकविणारी मूळाक्षर पद्धति; त्यानंतरचीं लेखन सुलभ 'ग म भ न' ची गट पद्धति. याच पद्धतींना धरून प्रौढ वर्गांत मूळाक्षरांची अर्थहीन घोकंपट्टी 'ग, ग, गवताचा' करून घेतली जाते. सुटचा अक्षरांचें हें अर्थहीन पाठांतर प्रौढांना नीरस आणि कंटाळवाणें वाटतें. त्यानंतर बाराखडींतील सारखवटपणामुळें अक्षरांतील भिन्नता प्रौढांना लक्षांत ठेवणें कठीण जातें. म्हणून मूळाक्षरें व त्यानंतर बाराखड्या या पद्धतीनें प्रौढांना वाचन शिकविणें योग्य नाहीं.

वाचन शिकविण्यासाठीं मराठींत शब्दपद्धति, वाक्यपद्धति, प्रसंग–पद्धति, गोष्टपद्धति रूढ आहेत. या पद्धतींमधील चांगल्या तत्त्वांचा उपयोग प्रौढांना वाचन शिकवितांना करून घेतां येतो.

शब्द–पद्धति :– मूळक्षरयुक्त शब्द निवडून घ्यावा. शब्दाला स्वतंत्र अर्थ असल्यानें शब्द–वाचन हें काम नीरस होत नाहीं. ह्या शब्दाला एकाद्या जानपद गीताची, अभंगाची, ओवीची किंवा गोष्टीची बैठक द्यावी. त्या गोष्टींत किंवा गीतांत त्या शब्दाचा वापर अनेकवार झाला असल्यानें शब्दाला जिवंतपणा येतो. उदा०–"राम राम" ही कविता–"या बसा पाहुणे राम राम घ्या", "वड"–"कुरणावरती वडाखालती", "समई" रावांच्या ओसरीला। बैठक बसली थोरांची। समई जळते मोराची. गोष्ट–वडासाठीं "वटसावित्री"; "कमळ" साठीं "गजेंद्रमोक्ष". या पद्धतीवर आधारलेलीं सध्यांचीं प्रौढांचीं क्रमिक पुस्तकें लोकांच्या वापरांत आहेत. शब्द पद्धतीच्या वाचन पुस्तकांत सर्व मूळा-क्षरें शिकवितां येतील अशी रचना असते. त्यामुळें वरील पद्धतीनें क्रमवार पुस्तकांतील पाठ शिकविले तर मूळाक्षरें शिकविण्यांत येणारा कंटाळा दूर होतो व प्रौढांच्या जीवन विषयाला धरून शब्दपद्धतीचे पाठ घेतां येतात. उदा०–श्रमदानानें सडक करणें; धरण बांधणें; गांव–सफाई करणें या विषयावरून 'सडक', 'धरण', 'सफाई' शब्द शिकवितां येतात. या शब्दांनाच योग्य क्रियापदांची जोड देऊन पूर्ण अर्थाचीं वाक्यें रचूनही वाचन शिकवितां येतें. मात्र आरंभींच्या कांहीं पाठांत मूळाक्षर-युक्त वाक्यरचना असल्यानें कृत्रिम वाक्यरचनेचा लहानसा दोष येतो.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

वाक्य-पद्धति व प्रसंग-पद्धति :– जीवनावर आधारलेला एखादा प्रसंग निवडून, त्या प्रसंगांतून छोटीं व सोपी वाक्यें निवडून या पद्धतीनें वाचन शिकवितां येतें. उदा०–आई दळण दळ. सई दळण दळ. बाई दळण दळ. यांतील " दळण दळणें " प्रसंगावरून वरील तीन वाक्यें " दळण ", " दळ " अशासारखे पुनरावृत्तिपूर्ण शब्द आणि त्यामुळें द, ळ, ण, ई अशा अक्षरांचें शिक्षण देतां येतें.

या पद्धतीच्या पाठांमध्यें प्रसंगांत येणारा वाक्यांचा समूह, प्रत्येक वाक्याची स्वतंत्र पट्टी, स्वतंत्र शब्द, स्वतंत्र अक्षरांचे पत्ते इत्यादि शिक्षण साहित्य करावें लागतें. साहित्यद्वारां जीवनाला धरून प्रसंग निवडून शिकविण्याला या पद्धतींत भरपूर वाव आहे. हे पाठ चांगले यशस्वी होतात. पण नित्य वापरासाठीं भरपूर साहित्य करण्यास लागणारा वेळ, साहित्य यांच्या अडचणी व कार्यकर्त्यांत शास्त्रोक्त पद्धतीच्या कामाची आवड कमी असल्यानें या पद्धतीचा वापर सर्वत्र झालेला दिसत नाहीं.

गोष्ट पध्दति—गोष्ट ही रंजनाला व शिक्षणाला उपयुक्त असल्यानें ही पद्धति तत्त्वतः लोकशिक्षणाला जास्त सोयीची आहे. गोष्ट पद्धतीच्या पाठांत ' गजेंद्रमोक्ष ' गोष्टींतून " कमळ " शब्द; " वट सावित्री " वरून " वड " शद्ब; रामायणांतील गोष्टींतून " राम, भरत, वर, रथ " असे शब्द शिकवितां येतात. या पद्धतीचें क्रमिक पुस्तक लोकांच्या वाचनांत आहे. पण गोष्ट पद्धतीच्या नांवाखालीं; " एका गांवांत एक श्रीमंत माणूस राहात होता. त्याचें नांव **श्री** म्हणजे **श्रीमंत** असें लक्षांत ठेवूं. त्या श्रीमंताच्या देवडीचा हा कमानी दरवाजा, त्याला ही शिडी आणि हा श्रीमंताचा वाडा म्हणून **श्री**चा असा आकार. अशा कृत्रिम गोष्टींच्या द्वारें अक्षरें शिकवणें शिक्षण–पद्धतीला सोडून आहे. म्हणून अशा कृत्रिम गोष्टी अक्षरांच्या आकाराच्या घोटाळ्यावर बसविल्या आहेत, त्या सांगणें टाळावें.

लॉबाक – पध्दति—या नांवाचीं प्रौढांना वाचन शिकविणारीं क्रमिक पुस्तकें पूर्वीं वापरांत असत. तीं चित्रयुक्त वाक्य–पद्धतीवर आधारलेलीं होतीं. त्यांतील वाक्यांची रचना सुसंगत नसे. प्रत्येक वाक्य

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

स्वतंत्र शिकवावें लागे. याशिवाय लॉबाकचे पद्धतींत अक्षराचे वळणाचा त्याच्या चित्राशीं संबंध जोडला जातो. उदा.– लसूण चित्रावरून 'ल' अक्षर, नळ चित्रावरून 'न' अक्षर. पण मराठींत साधर्म्यदर्शक पुरेशीं अक्षरें सांपडत नाहींत. त्यामुळें अक्षराकरितां ओढाताण करावी लागल्यानें मराठी वाचन या पद्धतीनें शिकविण्यांत कृत्रिमतेचा मोठा दोष येतो.

जीवनशिक्षण–पद्धति—या पद्धतीनें शिकवितांना माणसाच्या जीवनाला आधारभूत अशा वस्तूंचीं नांवें, त्यांचीं वाक्यें, त्यांचे प्रसंग रचून शिकवितां येतें. उदा.–(१) औत बघ. औत धर. औत हाक. (२) खत आण. खत धर. खत भर. खत घाल. शेतकरी जीवनांतील नित्यकामांतील परिचित वाक्यें वाचण्यास मिळाल्यानें या वाचनांत अधिक गोडी लागते. परिचित वाक्यांच्या पुनरावृत्तीनें वाचन व शिक्षण सुलभ होतें. असे प्रसंग निवडून वाचन शिकविणें प्रौढ वर्गांत फार चांगलें आकर्षण ठरतें. हे पाठ फार आकर्षक होतात.

पाठांतर–पध्दति––त्याच त्याच शब्दांची पुनरावृत्ति असलेले अभंग पाठांतरास निवडून ते अभंग पाठ करून घ्यावेत. पाठ झालेले अभंग वाचनास दिले तर समजून वाचन होईल. अभंगांतील शब्दांच्या पुनरावृत्तीमुळें वाचन शिकण्यास मदत होईल. उदा.–

घेई घेई माझे वाचे, गोड नाम विठोबाचें
घेई घेई माझे वाचे, गोड नाम केशवाचें
घेई घेई माझे वाचे, गोड नाम या देशाचें
देव देशाला मानावा, देशासाठीं धडा घ्याया.

या अभंगांतील "घेई, घेई, माझे, वाचे, गोड, नाम" या सहा शब्दांची पुनरावृत्ति झालेली आहे. या शब्दांचें वाचन तयार होईल. तुकाराममहाराजांच्या गाथ्यांतून असे अनेक अभंग निवडून अथवा स्वतंत्र रचून या पद्धतीनें वाचन शिकवितां येईल.

ॲटम बॉंब–पद्धति :–निरक्षरतेचे झटपट ४५ मिनिटांत उच्चाटन करण्यासाठीं व अगदीं अल्पावधींत निरक्षर मनुष्य साक्षर करण्यासाठीं ही पद्धति अहमदनगर येथील श्री. मुळे यांनीं बसविली. त्यासाठीं त्यांनीं

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

'गुराख्याचें स्वप्न' ही गोष्ट सांगितली आहे. स्वप्नांत येणाऱ्या वस्तूच्या आकाराचें अक्षराशीं साधर्म्य जोडून अक्षरओळख करून देण्याचा हा प्रयत्न आहे. या पद्धतीनें मनुष्याला फक्त थोड्या अक्षरांची ओळख लवकर होऊं शकते; पण पुढें सराव आणि घटविणें याला अवसर नसल्यानें शिकलेलीं अक्षरें लवकर विसरून जातात आणि पदरांत कांहीं पडत नाहीं, असा अनेकांचा अनुभव आहे.

सारांश :– प्रौढांना वाचन शिकवितांना खालील गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत.

(१) आधीं वाचन आणि नंतर लेखन शिकवावें. शब्दांची आणि वाक्यांची चांगली ओळख होऊन वाचतां येऊं लागल्याशिवाय लेखन शिकवूं नये.

(२) प्रौढांना वाचन शिकवितांना ज्यांना अर्थ आहे असे शब्द, वाक्य किंवा प्रसंग यांची निवड करून, अर्थपूर्ण शब्दांचें अथवा वाक्यांचें वाचन शिकवावें. त्यासाठीं आरंभीं गाणें, भजन, अभंग, जानपदगीत अथवा गोष्ट अशी रंजनात्मक बैठक वाचन पाठाला द्यावी.

(३) जीवनाला आधारित प्रसंगावर वाचन पाठ घ्यावेत.

(४) केवळ निरर्थक मूळाक्षरें किंवा बाराखड्या यांची कंटाळ-वाणी घोकंपट्टी करावयास लावणारी पद्धति उपयोगांत आणूं नये. सर्व अक्षरें एकदम शिकविण्याचा अट्टाहास धरूं नये.

(५) प्रत्यक्ष वाचन पाठाचा वेळ १५।२० मिनिटांपेक्षां जास्त नसावा.

(६) गोष्ट, गाणें, चित्र यांचें साहचर्य आणि परिचित शब्दांची पुनरावृत्ति वाचन पाठांत घेतली जावी.

(७) दररोज नवा पाठ घेण्यापूर्वीं आधीं शिकवून झालेल्या शब्दांचें वाचन घेण्याचा, नवे शब्द ओळखून घेण्याचा परिपाठ ठेवावा.

(८) मूळाक्षर–पद्धतीपेक्षां प्रौढांच्या नेमलेल्या क्रमिक वाचन पुस्तिकाला धरून नित्य नवे पाठ घेत पुढें जावें; म्हणजे वाचनांत प्रगति होईल. मूळ निरक्षरासाठीं वाचनाच्या आरंभाचा पहिला पाठ.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

वाचन पाठ

विषय	पद्धति
I **प्रस्तावना**–भारताची धान्याची गरज शेतीनेंच भागणार आहे. शेतीचें उत्पन्न वाढण्यास पाणी पाहिजे. त्यासाठीं विकास योजनेंप्रमाणें देशभर धरणें बांधतात. आपल्याकडे भाटघर, भंडारदरा, खडकवासलें हीं जुनीं धरणें आहेत. गंगापूर, घोडबंधारा हीं **नवीन धरणें** बांधलीं आहेत. (नवीन माहिती सांगणें) गांवोगांव ओढे, नाले आडवून छोटीं धरणें लोक बांधतात.	श्रमदान. आपला मुख्य धंदा कोणता ? (शेती). शेतीचें उत्पन्न वाढण्यासाठीं कशाची गरज आहे ? शेतीला ठराविक वेळीं पाणी पुरवठा करण्यासाठीं उपाय काय ? आपल्याकडे जुनीं धरणें कोणतीं आहेत ? त्यांचा उपयोग काय होतो ? नवीन माहिती सांगणें–भंडारदरा धरणाच्या पाण्यावरच नगर जिल्ह्यांतील शेतीचें उत्पन्न, उंसाचें पीक काढतात. त्या उंसावर तिकडे साखर कारखाने काढले आहेत. नवीन धरणें–माहिती देणें.
II **हेतुकथन**–धरणाचें चित्र दाखवून–चित्रवाचन करणें, वाक्यवाचन करणें.	गांवची शेती सुधारण्यासाठीं कापूर ओढा अडवूं या. धरण बांधूं. हें धरणाचें चित्र पाहा. चित्रांत काय दाखविलें ? (धरण). हें धरणाचें चित्र बघा. आतां आपण ते शब्द वाचूं. या चित्रांतील माणूस शेतकऱ्याला काय सांगतो ?

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

विषय	पद्धति
III **विषय स्पष्टीकरण**– चित्रावरून वाक्य काढून घेणें. धरण बघ. फळ्यावर वाक्य लिहून दाखविणें.	(धरण बघ.) मी तुम्हाला चित्रांत काय बघा म्हणतों ? तेच शब्द मी फळ्यावर लिहितों. फळ्यावर – **धरण बघ** लिहिणें.
IV **वाचन – १. वाक्याची ओळख**–शिक्षकाचें सावकाश व स्पष्ट वाचन– शिक्षकाचें पुन: एकदां सावकाश वाचन– शब्दाची ओळख सांगणें. आपल्यामागें प्रौढांना वाचणी देणें (तीन वेळां)	वाक्य वाचून दाखविणें– **धरण बघ.** **धरण बघ.** **धरण बघ.** **धरण बघ.** तीन वाक्यें सरळ ३ वेळ वाचून घेणें.
२. वाक्याचे पुनः वाचन–	
३. वाचन घटविणें – उभ्या शब्दांचें वाचन. वरून खालीं वाचणी खालून वर वाचणी	**धरण** | **बघ.** **धरण** | **बघ.** **धरण** | **बघ.**
४. **आकृति**–कृति व खेळ– शब्दांचे पत्ते–	शब्दांचे पत्ते ओळखून घेणें. शब्दांचे पत्ते जुळवून घेणें.
५ फळ्यावर वाक्य वाचून घेणें.	शब्दांचे पत्ते उलट, सुलट लावून वाचून घेणें.
V **उपसंहार**–गांवच्या गरजेवर चर्चा–	आज आपण काय वाचायला शिकलों ? तर मग आपल्या कापूर ओढ्याला कधीं धरण बांधावयाचें ? कसें ? दगड कोण आणणार ?

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

७. साक्षरता कशी टिकवावी

प्रौढ शिक्षणाच्या कार्यक्रमाबाबत पुष्कळ लोकांना मुळींच जिव्हाळा वाटत नाहीं. त्यांना वाटतें कीं प्रौढांची साक्षरता मुळींच टिकत नाहीं. तेव्हां त्यांना साक्षर करण्यासाठीं पैसा खर्च करणें म्हणजे पैशाची उधळपट्टी करणें होय. नवसाक्षर प्रौढ फार लवकर पुन्हां निरक्षर होतात ही गोष्ट खरी आहे. ह्याचा अर्थ त्यांना साक्षर करूं नये असा करणें चुकीचें आहे. त्यांची साक्षरता टिकविण्याचे प्रयत्न जोरानें केले पाहिजेत. वनमहोत्सवांत लावलेलीं झाडें पुढें टिकत नाहींत म्हणून झाडें लावूं नका हें सांगणें योग्य नाहीं. तीं झाडें टिकविण्यासाठीं काय करितां येईल ह्याचा विचार होणें जरूरीचें आहे. नवसाक्षर प्रौढांची साक्षरता टिकाऊ कशी होऊं शकेल व पुनः ते निरक्षर बनणार नाहींत ह्यासाठीं काय करावें ह्याचा पुढील लेखांत विचार करणार आहोंत.

खेडेगावांत राहणाऱ्या नवसाक्षर प्रौढाला आपली साक्षरता वापरण्याची संधि मिळूं शकत नाहीं. हाच प्रौढ जर शहरांत असला तर त्याच्या डोळ्यासमोर दुकानांच्या पाट्या येतात. त्याच्या हातांत निरनिरनिराळ्या हस्तपत्रिका पडतात. भिंतीवर सिनेमाच्या मोठ्या जाहिराती असतात. ह्यामुळें त्याला आपली साक्षरता वापरण्याची–वाचण्याची संधि मिळते. अशी संधि खेड्यांतील प्रौढांना मिळूं शकत नाहीं. ह्यासाठीं निरनिराळे उपाय आपणांला योजावे लागतील.

एके ठिकाणीं कार्यकर्त्यानें साक्षरता टिकाऊ करण्यासाठीं पुढील प्रयोग केला. प्रत्येक नवसाक्षर प्रौढाच्या घरांत जाऊन त्या घरांतील प्रत्येक वस्तूवर व त्या वस्तू ठेवण्याच्या गाडग्यामडक्यांवर चुन्यांनीं त्या वस्तूंचीं नांवें लिहिलीं. उदाहरणार्थ– मीठ, तिखट, चिंच, हंडा, कळशी, पितळी वगैरे ह्या सर्व वस्तूंचीं नावें पुढें प्रौढ वाचूं शकले व अक्षरें पण त्यांच्या पूर्ण परिचयाचीं झालीं.

दुसऱ्या एके ठिकाणीं कार्यकर्त्यानें घरांत राहणाऱ्या सर्व व्यक्तींचीं पहिलीं नावें घराच्या दरवाजावर लिहिलीं. उदाहरणार्थ– रामराव,

डा. डिल्ली रमण रेग्मी
कल्याणी रेग्मी स्मारक
पुस्तकालय
5435

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

काशीताई, गोपाळ वगैरे. ह्याप्रमाणें वर्गांत येणाऱ्या प्रत्येक प्रौढाच्या घराच्या दारावर नांवें लिहिण्यांत आली. साहजिकच थोड्याच दिवसांत त्या प्रौढांना ती सर्व नांवें वाचतां आलीं व अक्षरें सारखीं डोळ्यासमोर राहिल्यामुळें ते तीं विसरूं शकले नाहींत.

ह्या दृष्टीनें फार उपयुक्त कार्य गांवांतील भिंतीच्या मदतीनें करितां येईल. ज्ञानदेवानें भिंत चालविली; आपण भिंतींना बोलायला लावलें पाहिजे. गांवांतील सार्वजनिक इमारतीच्या भिंतींवर चांगला सोप्या भाषेंत मजकूर लिहावा. जातां येतां हा मजकूर लोक वाचतील व त्यायोगें त्यांची साक्षरता टिकूं शकेल.

साक्षरता टिकविण्याच्या कामीं भिंती पत्रकांची (Wall News-papers) ची फार मदत होईल. प्रत्येक गांवांत भिंतीवर चांगले सिमेंटचे फळे तयार करावेत. हें शक्य न झालें तर भिंतीला चांगला चुना फासून त्यावर काळ्या रंगानें मजकूर लिहिण्याजी व्यवस्था करावी. ह्या भिंतीवर लिहिण्यांत येणारा मजकूर मोठ्या अक्षरांत व सोप्या भाषेंत लिहिला जावा. हा भिंतीवर लिहिला जाणार मजकूर तीन प्रकारचा असावा.

१ ला फळा, रोज बदलला जाणारा—ह्यावरील मजकूर ताज्या बातम्यांच्या स्वरुपाचा असावा.

२ रा फळा— आठवड्यांतून एकदां बाजराच्या दिवशीं बदलला जाणारा—ह्यावरील मजकूर लोकांना सामान्य माहिती देणारा असावा. ही माहिती आठवडाभर त्यांच्या नजरेसमोर राहणारी असल्यामुळें त्यांच्या जीवनाच्या दृष्टीनें उपयुक्त असा मजकूर येथें लिहिला जावा.

३ रा फळा— अमावास्या पौर्णिमेला अथवा दर एकादशीला बदल-णारा :— ह्या फळ्यावर चांगले श्लोक अथवा अभंग लिहिले जावेत. जीवनमूल्यांचें जतन लोकांनीं करावें ह्यासाठीं उययुक्त असा मजकूर ह्या फळ्यावर लिहिला जावा.

ह्याखेरीज वाचनीय असा मजकूर प्रौढांना उपलब्ध करून द्यावा. 'साक्षारता दीप', 'लोकशिक्षण' ह्यासारखीं नियतकालिकें प्रौढांना

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मिळवून द्यावींत. त्यामधून नवसाक्षर प्रौढांना वाचतां येईल असा मजकूर छापला जातो.

नवसाक्षर प्रौढांना उपयोगी पडतील अशीं पुस्तकें महाराष्ट्र प्रादेशिक लोकशिक्षण समितीनें मंजूर केलेलीं आहेत. हीं पुस्तकें लिहितांना नवसाक्षर प्रौढांच्या गरजा, आवडीनिवडी, त्यांची शब्दसंपत्ति इत्यादि गोष्टी लक्षांत घेतल्या गेल्या आहेत. ह्या सर्व पुस्तकांची यादी स्वतंत्र छापलेली आहे. ती समितीकडे मिळूं शकेल.

नवसाक्षर प्रौढांसाठीं वाङमय कसें तयार करावें, ह्याचें शिक्षण लेखकांना देण्यासाठीं भोर येथें गेल्या वर्षीं, भारत सरकारच्या मदतीनें एक खास शिबीर चालविण्यांत आलें होतें. ह्या शिबीरांतील लेखकांनीं तयार केलेलें साहित्य आज उपलब्ध आहे. ह्या पुस्तकांची यादी वर उल्लेखिलेल्या यादींत समाविष्ट करण्यांत आली आहे. हीं पुस्तकें तयार करितांना प्रौढांच्या वाचन शक्तीच्या मर्यादापण लक्षांत घेतल्या गेल्या. प्रौढांना एकदम एकादें मोठें पुस्तक हाताळणें कठीण जातें; म्हणून ह्या पुस्तकांची आंखणी करितांना एक तंत्र लक्षांत घेतलें गेलें. आधीं एक पत्रिका वाचायला द्यावी. म्हणून अशा वाचनपत्रिकाही छापल्या आहेत.

(१) वाचन पत्रिका:–ह्या पत्रिकेंत लिहिलेला मजकूर फक्त १०० ते १२५ शब्दांत घातला आहे.

(२) १ ल्या श्रेणीचें पुस्तक:–या पुस्तकांत ५०० शब्दांत मजकूर घातला आहे.

(३) २ ऱ्या श्रेणीचें पुस्तक:–या पुस्तकांत १००० शब्दांत मजकूर घातला आहे.

(४) ३ ऱ्या श्रेणीचें पुस्तक:–या पुस्तकात २५०० शब्दांत मजकूर घातला आहे.

हीं पुस्तकें बाजारांत आल्याबरोबर इतर खाजगी प्रकाशकांनीं पण ह्या धर्तीवर पुस्तकें तयार केलीं आहेत. आज नवसाक्षर प्रौढांच्या हातीं देण्यासारखीं कांहीं चांगलीं पुस्तकें उपलब्ध आहेत. हीं व इतर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पुस्तकें ग्रामीण वाचनालयें व लोकशिक्षण वर्ग ह्यांचें साहचर्य जितकें जास्त घडवून आणतां येईल तितकी साक्षरता अधिक टिकेल. कार्यकर्त्यांनें वाचूं शकणारा प्रौढ वाचनालयाकडे कसा वळेल ह्याकडे लक्ष दिलें पाहिजे. जेथें वाचनालय नसेल तिथें तें काढलें गेलें पाहिजे. ह्यासाठीं वाचनालयाचे नियम व माहिती ह्या पुस्तकांत आम्हीं स्वतंत्र छापली आहे.

---

८. लोकरंजनांतून लोकशिक्षण

कोणतेंही शिक्षणाचें कार्य रंजनाशिवाय पूर्ण होऊं शकत नाहीं. पूर्वप्राथमिक शिक्षण असो, प्राथमिक शिक्षण असो, माध्यमिक शिक्षण असो किंवा उच्च शिक्षण असो सर्व क्षेत्रांत करमणुकीला स्थान आहेच. विशेष करून लोकशिक्षणाला लोकरंजनाची जरूरी जास्त आहे. लोकांच्या जीवनांत रस निर्माण करून जीवनाचा आनंद उपभोगण्याची प्रवृत्ति जनतेंत निर्माण करणें ही आजच्या काळांतील गरज आहे. मात्र ही रंजनाची गरज पुरी करीत असतां त्या रंजनालाही शिक्षणाची जोड देणें अगत्याचें आहे. ज्याप्रमाणें रंजनाशिवाय शिक्षणांत निरसता निर्माण होईल त्याचप्रमाणें शिक्षणाची जोड नसेल तर रंजनाचे कार्यक्रम उच्च पातळीवर राहणार नाहींत व जनतेची अभिरुची घडविण्याचें कार्य तोकडे पडेल. यासाठीं रंजनाच्या कार्यास शिक्षणाची जोड पाहिजे व शिक्षणास रंजनाची जोड पाहिजे. **लोकशिक्षण व लोकरंजन या दोन्हीही गोष्टी एकमेकांस पूरक आहेत.** या एकमेकांच्या हातांत हात घालून प्रवास करतील तर त्यांचा प्रवास सुखाचा होईल. पण या दोहोंत भांडण होऊन त्यांच्यांत फुटाफूट झाली तर दोघांचाही प्रवास दुःखाचा, निरस व कंटाळवाणा झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

लोकशिक्षणाचीं प्रमुख अंगें तीन आहेत.

(१) लेखन-वाचनद्वारां जगांतील ज्ञानाची ओळख करून आपलें जीवन समृद्ध करणें.

(२) मनोरंजनाद्वारें आपलें जीवन आनंदमय करणें.

(३) आपल्या सभोंवतीच्या निसर्गाचा स्वतःच्या सुखासाठीं व व समाजाच्या हितासाठीं वापर करणें. थोडक्यांत शिक्षण, रंजन व रचना या तीन गोष्टी लोकशिक्षणांत अंतर्भूत झालेल्या आहेत. विशेष करून मनोरंजनासंबंधीं आतां आपण विचार करणार आहोंत.

लोकशिक्षणाची जीं उद्दिष्टें आहेत त्यांत लोकांचा फावला वेळ योग्य प्रकारें घालविण्याचें शिक्षण देणें हें एक उद्दिष्ट आहे. लोक-रंजनाचा संबंध या उद्दिष्टाशीं फार घनिष्ट आहे. कारण मनोरंजन किंवा करमणूक ही फुरसतीच्या वेळीं केलेली कामगिरी होते असें मानलें जातें. बहुतेक मनोरंजनाचें सर्वत्र कार्य फावल्या वेळीं केलें जातें. आपलें काम बाजूला सारून मनोरंजनाचें कार्य करावें असें कोण म्हणणार ? जीं विचारीं माणसें असतात. तीं बहुधा काम टाकून करमणूक करीत बसत नाहींत. फावला वेळ योग्य प्रकारें घालवावा हीच मनोरंजनाची भूमिका आहे.

मनोरंजनाचे कार्यक्रम करीत असतां खालील गोष्टी विशेष ध्यानांत ठेवाव्यात.

१. वर नमूद केल्याप्रमाणें ते कार्यक्रम **फावल्या वेळांतच केले जावेत**. आपल्या रोजच्या जीवनांत फुरसतीचा वेळ फुष्कळच असतो. दैनंदिन जीवनांतील कांहीं वेळ शरीररक्षणासाठीं नैसर्गिक क्रिया करण्यांत जातो. कांहीं वेळ पोटापाण्याचा धंदा करण्यांत जातो. कांहीं वेळ कांहींही न करण्यांत म्हणजेच केवळ आळसांत जातो. परंतु कांहीं वेळ स्वच्छंदाचीं कार्यें करण्यांत जातो. फावल्या वेळांत स्वच्छंदाचीं कार्यें करणें म्हणजेच मनोरंजन करणें होय.

२. लोकरंजनाचे कार्यक्रम दुसऱ्यांनीं लादलेले असूं नयेत. लोकांना जें पाहिजे तें करूं द्यावें. हे कार्यक्रम लोकांनीं स्वेच्छेनें अंगावर घेऊन

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पार पाडले पाहिजेत. रंजनाचें कार्यक्रम दुसऱ्यानें लादले तर त्यांतील गंमत नाहीशीं होण्याची शक्यता आहे. कार्यक्रम करणाऱ्या लोकांनाच असें वाटलें पाहिजे कीं, हे कार्यक्रम आपणच करीत आहोंत. यांचे नियते आपणच आहोंत. आपणासाठींच हें सर्व चालू आहे.

३. लोकरंजनाचें कार्यक्रम समाजास हितकारक असावेत. या कार्यक्रमांतून लोकांच्या मनावर चांगले परिणाम होऊन लोक चांगल्या विचारानें भारले जाऊन सत्कार्याला प्रवृत्त व्हावेत. लोकांच्या अभिरुचीला चांगलें वळण लावणारे कार्यक्रम असावेत.

४. हे कार्यक्रम कलात्मक असावेत. केवळ पक्षीय प्रचारी थाटाचे कार्यक्रम हे खरे लोकरंजनाचे कार्यक्रम नव्हेत. उपयुक्ततेबरोबरच वाङ्मयमूल्यें ज्यांत संभाळलीं आहेत त्या कार्यक्रमांची निवड करावी.

५. ज्या कार्यक्रमांत जास्तींत जास्त लोकांना सहभागी होतां येईल असें कार्यक्रम निवडणें जास्त चांगलें. कार्यक्रम करणारे व पहाणारे या दोघांनाही या कार्यक्रमापासून आनंद व्हावा. जितके जास्ती लोक कार्यक्रमांत भाग घेतील तितका आनंद जास्त श्रेणीचा आहे असें मानावयास हरकत नाहीं.

६. या कार्यक्रमामुळें लोकांची "समाजविषयक क्रियाशीलता जागी व्हावी."

मनोरंजनाच्या आवश्यकतेसंबंधीं थोडा तात्विक विचार करावयाचा असेल तर पुढील गोष्टी लक्षांत घ्याव्यात.

१. मनोरंजन ही एक शारीरिक गरज आहे. आपल्या नित्य कामांत शरिरांतील सर्व शक्तींचा उपयोग होत नाहीं. उपयोगांत न आणलेल्या शक्ति कमकुवत होत जाऊन नष्ट होण्याची शक्यता असते किंवा विघातक कार्य करण्याची शक्यता आहे. म्हणून मनोरंजनाच्या कार्यक्रमाद्वारें शिल्लक राहिलेल्या शक्तींना वाव द्यावा.

२. शारीरिक शक्तींच्या वापरासंबंधीं जी गोष्ट तीच मानसिक शक्तींच्या वापराबद्दलही खरी आहे. आपल्या सर्वच्या सर्व मानसिक

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शक्ति आपल्या नित्य कामांत खर्चीं पडत नाहींत. म्हणून शिलकी मानसिक शक्ति मनोरंजनाच्या कार्यांत कारणी लागाव्यात.

३. मनोरंजनाच्या कार्यक्रमामुळें लोकांची गेलेली उत्साह–शक्ति परत येते. लोकांना पुन्हा काम करायला तरतरी येते. दुप्पट उत्साहानें लोक कामाला लागतात. म्हणून गेलेला उत्साह परत मिळविण्यासाठीं व उदासीनता नष्ट होण्यासाठीं लोकरंजनाचें कार्य आवश्यक आहे.

४. रंजनाच्या कार्यक्रमापासून लोक पुढील जीवनाची तयारी करीत असतात. तालमींत जोर मारणारे लोक जीवनांतील संकटाला तोंड द्यायची तयारीच करतात. लहानपणीं मुलें खेळतात, तीं पुढील जीवनाची लहानशी नक्कल आपल्यापुढें उभी करून त्यांत यशस्वी होण्यासाठीं धडपडत असतात. हुतूतू खेळणारीं माणसें जीवनाच्या स्पर्धेत यशस्वी होण्याची रंगीत तालीमच करीत असतात. रंजनाचे कार्यक्रम म्हणजे जीवनाची छोटीशी रंगीत तालीम म्हणावयास हरकत नाहीं.

५. रंजनाच्या कार्यक्रमामुळें लोकांच्या मनांतील दबलेल्या मनोविकारांना मोकळीक मिळते व त्यांचीं मनें उल्हसित होतात. लोकांच्या मनावरचा ताण नाहींसा होण्यासाठीं या कार्यक्रमांची अत्यंत जरुरी असते. गांवांत असलेलें भांडण, तंटे, वैर अनेक वेळां या कार्यक्रमामुळें नाहींसे होतात.

६. रंजन ही एक सहज प्रवृत्ती आहे. या प्रवृत्तीला वैयक्तिक व सामाजिक अशा दोनही बाजू आहेत. मनोरंजनाच्या कार्यक्रमामुळें व्यक्तीचा वैय्यक्तिक फायदा होतोच परंतु त्याला समाजाभिमुख करण्याचे कामही साधलें जातें.

लोकरंजनाचे कोणते कार्यक्रम करावेत ?

लोकरंजनाचे कार्यक्रम नित्य व नैमित्यिक असे दोन प्रकारचे असावेत. लोकशिक्षण वर्गांत वातावरण प्रसन्न रहाण्यासाठीं गाणीं

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

म्हणणें गोष्टी सांगणें, गोष्टी वाचणें, भजन करणें इत्यादि नित्य कार्यक्रम करावेत. गाणीं म्हणण्याचा कार्यक्रम तीन प्रकारांनीं करतां येतो. एकटयानें गाणें म्हणणें, सामुदायिक गीतें म्हणणें व केवळ धृपद सर्वांनीं म्हणणें पण उरलेला भाग व्यक्तीनें म्हणणें. या गीतांच्या चाली सोप्या असाव्यात; तीं गीतें सर्वांना म्हणतां यावींत. अशीं कांहीं गीतें शेवटीं दिलीं आहेत. आठवडयांतून एखादा भजनाचा किंवा कीर्तनाचा कार्यक्रम घ्यावा. दर दोन तीन महिन्यांतून एखादें नाटक-नाटिका बसवावी. दर महिन्यास ढोल लेझमीचा कार्यक्रम करावा. मुलांच्या कलापथकांचे कार्यक्रम घडवून आणावेत. हल्लीं ग्रामीण विभागासाठीं सायंकाळीं रेडिओवर कार्यक्रम असतात. त्यांचा उपयोग केल्यास लोकांना अद्यावत् माहिती मिळेल व विविध तऱ्हेचे रंजनाचे कार्यक्रम ऐकायला मिळतील. नाटयवाचनाचा प्रयोग करून पहाण्यासारखा आहे. लोकांना नाटयवाचनही आवडतें असें दिसून आलें आहे. सहली काढण्याचे कार्यक्रमही हितकारक असतात. विशेष करून जत्रा व यात्रा असतील त्यावेळीं कांहीं कार्यक्रम करावेत. गांवानें नव्या पद्धतीचे तमाशे किंवा नाटकें बसवून जत्रेंत करावींत. नाटयमंडळ स्थापून त्यांच्यातर्फे असे कार्यक्रम करणें फारच चांगलें. गांवांत एखादें कलापथक तयार करून त्याच्यातर्फें सभोंवतीच्या गांवीं कार्यक्रम घडवून आणावेत. भारतीय खेळांच्या स्पर्धा लावाव्यात. गांवांत उत्सव साजरे करावेत. तसेंच धार्मिक व इतर संस्कार प्रसंगीं सर्व गांवाला बोलावून त्यांच्यासाठीं कार्यक्रम ठेवावेत. लोकनृत्यांचा कार्यक्रम लोकांना आवडतो तो करावा. निरनिराळ्या कला शिकण्यास मदत करावी. सिनेमांचाही उपयोग आजकाल करमणुकीसाठीं होतो. गांवांत मोकळ्या जागीं एखादा ओटा बांधल्यास त्या जागीं हे सर्व कार्यक्रम घेतां येतील. लोक मोकळेपणानें कार्यक्रम पहातील व त्यांचा इष्ट परिणाम दिसून येईल.

सहभोजन, सामुदायिक सत्यनारायण, निरनिराळ्या जयंत्या साजऱ्या करणें हे कार्यक्रम लोकशिक्षणाला पोषक असतात.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

कांहीं मनोरंजनाचे कार्यक्रम वैयक्तिक असतात. एकादें पुस्तक वाचणें, फिरायला जाणें, गाणें गुणगुणणें यासाठीं इतर कोणाची फारशी जरूरी असत नाहीं. परंतु कांहीं कार्यक्रमास अधिक लोकांची जरूर असते. उदाहरणार्थ, नाटक पहाण्यासाठीं पुष्कळ लोक लागतात. सभा व्याख्यानाला लोक जमले नाहींत तर व्याख्यानाला रंग कसा चढणार? लोकशिक्षणासाठीं लोकरंजनाच्या कार्यक्रमाची निवड करतांना वैयक्तिक व सामुदायिक रंजनाचा विचार करून कार्यक्रम निवडावेत.

कांहीं कार्यक्रमांना पैशाची जरुरी असते. तर कांहीं कार्यक्रम एक दिडकीही खर्च न करतां होऊं शकतात. सर्व भारताची सहल करण्यामुळें मनोरंजन होईल. पण त्याला पैसा कितीतरी खर्च होईल. परंतु गाणीं म्हणणें, गोष्टी सांगणें, आवडत्या विषयांवर चर्चा करणें या कार्यक्रमांना एक पैही खर्च येत नाहीं. लोकशिक्षण वर्गांतील करमणूक शक्य तितकी विना खर्चाची असावी. थोडासा खर्च करण्याची पाळी आलीच तर त्यासाठीं प्रत्येकानें वर्गणी देऊन कार्यक्रम घडवावा.

---

९. नित्य कामाचें टांचण

लोकशिक्षण वर्गांत साक्षरतेचा वाचनाचा पाठ कसा घ्यावा हें मागील पाठाच्या टांचणावरून लक्षांत येईल. साक्षरतेबरोबरच सामान्य-ज्ञानाचाही विचार नित्य शिक्षणांत झाला पाहिजे अशी अपेक्षा आहे. हें सामान्यज्ञान लोकांच्या नित्याच्या जीवनाला धरून दिलें तर तें शिक्षण लोकांना रुचतें आणि उपयोगीही पडतें. म्हणून लोकशिक्षण वर्गांतील एक दिवसाच्या कामाची रूपरेषा—आराखडा स्पष्ट करण्यासाठीं पुढील टांचण दिलें आहे.

वर्गाच्या नित्य कामांत येणारे विषय—१. सफाई, प्रार्थना. २. ताजी बातमी. ३. घरगुती संभाषण. ४. कालच्या वाचनपाठाची उजळणी. ५. नवा पाठ. ६. सामान्य माहिती. ७. गोष्ट. ८. गाणें ९. राष्ट्रगीत. हा सर्व भाग सामान्यतः १ तासांत उरकला जावा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दिवसभर काम करणारांचा १ तासापेक्षां जास्त वेळ घेणें इष्ट नाहीं. तसेंच हे वरील ९ प्रकार याच क्रमानें रोज झालेच पाहिजेत असें नाहीं. प्रौढांच्या मनाची स्थिति व स्थानिक परिस्थिति लक्षांत घेऊन ज्यांत प्रौढ रमतील त्या भागावर एकाद्या दिवशीं जास्त वेळ मोडणें योग्य होईल. यांतील एखादा भाग गाळावाही लागेल. याबाबत पृष्ठ २३ ते २७ वरील " **प्रौढांच्या वर्गांत रोजचा कार्यक्रम कसा असावा ?** " ह्यासंबंधीं केलेली चर्चा लक्षांत घेऊन नित्य काम चालवावें. या टांचणाचाही त्या धोरणानेंच उपयोग करावा. वरील ९ मुद्दे लक्षांत घ्यावेत. त्या मुद्यांवर संक्षिप्त टांचण काढून दररोजचें शिक्षण असें पूर्व विचाराचें टिपण तयार करून द्यावें. त्यामुळें थोडया वेळांत भरपूर काम होईल. तसेंच प्रौढांचा व कार्यकर्त्यांचा शैक्षणिक उत्साहही वाढेल. म्हणून पद्धतशीर टांचणाचा आराखडा दिला आहे.

लोकशिक्षण वर्गांतील नित्य कामाचें टांचण

(साक्षरतेबरोबरच लोकरंजन आणि सामान्यज्ञान असा विषय घेतला आहे.)

विषय	पद्धति
१. (अ) **सफाई व प्रार्थना**—— नित्य सफाईची पाहणी व चौकशी करणें. हजेरीची विचारपूस.	१. (अ) काय विनायकराव, घंटा दिलीत काय ? आज आपली बैठकीची जागा झाडण्याची पाळी कोणी केली ? सदोबा, तुमची पाळी होती ना ? वा ! सफाई कशी छान केलीत बुवा ? सगळेजण आलेत ना ? अजून कोण कोण आले नाहींत ? स्वच्छता म्हणजेच प्रसन्नता. प्रसन्नता हेंच देवाचें रूप आहे. म्हणूनच महात्मा गांधी नेहमीं सांगत कीं, **स्वच्छता हाच परमेश्वर.**

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

विषय	पद्धति
(ब) **प्रार्थना**—— सामुदायिक प्रार्थना. "या भारतांत बंधुभाव नित्य वसूं दे."	(ब) चला, आतां देवाची **प्रार्थना** करूं या. सगळेजण एका सुरांत, गोड आवाजांत, शांतपणानें प्रार्थना म्हणूं – संत तुकडोजी महाराजांचें पद "या भारतांत बंधुभाव नित्य वसूं दे." हें म्हणूं या.
२. (अ) **ताजी बातमी**——कुसेगांवच्या विठ्ठलसिंग जालीमसिंग परदेशी यांनीं, १९५६-५७ सालांत, एकरीं १३६ बंगाली मण जपानी पद्धतीनें भात पिकवून, पीक स्पर्धेत बक्षीस मिळविलें.	२. (अ) **अधिक धान्य पिकवावें** म्हणजे आपल्या धान्याची गरज भागेल. त्यासाठीं कोणत्या पद्धतीनें भातशेतींत जास्त पीक येतें ? या जपानी पद्धतीच्या भातशेतीनें जास्त पीक आल्याची ही बातमी ऐका. पुणें जिल्ह्यांतील मावळ तालुका भातशेतीचा आहे. त्या तालुक्यांत कुसेगांव आहे. तेथील शेतकरी विठ्ठलसिंग परदेशी यांची (विषय सदरांतील ताजी बातमी सांगणें.)
(ब) शेतकी कॉलेजची जनावरांच्या फिरत्या दवाखान्याची मोटार भोर भागांत फिरून गुरांच्या आजारावर उपचार करते.	(ब) भोर तालुक्यांतील कांहीं गांवांत विकास योजनेचीं कामें शेतकी कॉलेजमार्फत चालतात. (विषय सदरांतील जनावरांच्या फिरत्या दवाखान्याची बातमी सांगणें.)

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

विषय	पद्धति
३. **खाजगी संभाषण**——वाटाणा भरसीझनमध्यें उशिरा विक्रीला आला तर भाव कमी येतो. म्हणून वाटाण्याची लागण जरा आधीं करून श्रावणाच्या २ ऱ्या आठवड्यांत वाटाणा विक्रीला आला तर भाव चांगला येतो.	३. काय सदोबा, आज काय कामें केलीं? गणपतराव, तुम्ही काल कां आला नाहींत आपल्या वर्गाला? "वाटाण्याच्या शेंगा नेल्या होत्या मंडईला". ठीक! काय भाव होता? रुपयाला चार शेर. बाजार अगदीं पडला. त्यासाठीं माल पहिल्या तोंडी श्रावणांत हातीं आला तर बरें होईल.
मुलाच्या आजारीपणाला औषध द्यावें. भूतबाधा खोटी गोष्ट. औषध उत्तम. अंगारा धुपारा नको.	काय नाना? पोरीला भूतबाधा झाली म्हणतां? आजाराला औषध द्या.
४. **वाचनपाठ—— मागील उजळणी**—— काल शिकविलेल्या कान्याच्या पाठाची उजळणी—समोर दिल्याप्रमाणें.	४. **काका या बसा. राम राम.** **मामा या बसा. राम राम.** **दादा या बसा. राम राम.**
५. **नवा पाठ**——वेलांटी शिकविणें. ी – काकी आली. मामी आली. नानी आली. **काकी आली.** **मामी आली.** **नानी आली.** वरील वाक्यांचें सरळ आडव्या ओळींत वाचन. उभ्या शब्दांचें वाचन. न वेलांटी **नी.** ी. ल ी **ली** शिकविणें.	५. काल काका आले. मामा आले. पण काकांच्या काकी घरीं राहिल्या. आज त्यापण आल्या पहा. **काका आला काकी आली** काकाच्या डोक्यावर हा असा पदर दिला कीं, ही बघा काकी झाली— **का** हा पदर ी **की. मी. ली.** वाचा—— **काकी. काकी. काकी.** **मामा मामी. मामी. मामी.** **क वेलांटी ी की. म ी मी.**

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

विषय	पद्धति
६. **सामान्य माहिती**— गांव, तालुका, जिल्हा, प्रांत, राज्य व त्यावरील अधिकारी. गांव–पाटील. तालुका – मामलेदार. जिल्हा – कलेक्टर. प्रांत – मुख्यप्रधान – अधिकाऱ्यांचीं कामें सांगणें.	६. आपला गांव– वडापुरी– तालुका कोणता ? **इंदापूर.** जिल्हा कोणता ? **पुणें.** कोणत्या प्रांतांत पुणें जिल्हा आहे ? **मुंबई प्रांत.** मामलेदार, कलेक्टर, यांचीं कामें सांगणें.
७. **गोष्ट सांगणें**— "भारत जहाज" गोष्ट.	७. शेवटीं दिलेल्या गोष्टींच्या संग्रहांतील **'भारत जहाज'** गोष्ट सांगणें. तीवर चर्चा करणें.
८. **गाणें**—"घरधनी ऐका. मी सांगतें तुम्हाला। माझ्या बाळाला हो शाळेंत घाला."	८. "घरधनी ऐका" हें गाणें सामुदायिक म्हणणें.
९. **राष्ट्रगीत**—वंदेमातरम्	९. "वंदेमातरम्" हें राष्ट्रगीत म्हणून काम संपविणें.

१०. विकास योजना व लोकशिक्षण

आपल्या देशांतील जनतेचें दारिद्र्य, अज्ञान व रोगराई नाहींशी करण्यासाठीं व लोकांचें जीवनमान सुधारण्यासाठीं देशाचें उत्पादन वाढविणें जरूर आहे. हें उत्पादन वाढविण्यासाठीं आपल्या देशांतील नैसर्गिक संपत्ति व लोकांची कष्ट करण्याची शक्ति ह्यांचा मेळ घालावा लागेल. हें उत्पादन वाढविण्यासाठीं लोकांना जास्तींत जास्त प्रयत्न करावे लागतील. अशा प्रकारें देशाचें उत्पादन वाढविल्यावांचून देशाचा विकास किंवा प्रगति होणार नाहीं. लोकशिक्षणामार्फत आपणाला देशाचा विकासच साधावयाचा आहे. लोकशिक्षणाचें खरें उद्दिष्ट लोकांच्या प्रयत्नांमार्फत लोकांची प्रगति घडवून आणणें हेंच आहे. ज्या शिक्षणामुळें लोकांचा समाजाचा–विकास होईल तेंच खरें लोकशिक्षण.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ह्या सबंध समाजाचा विकास घडवून आणण्यासाठीं सबंध समाजाची शक्ति कामाला लावणें, हें खरें लोकशिक्षणाचें कार्य आहे. ह्या कार्यक्रमासाठीं बाहेरून मदत मिळाली, तर तिचा फायदा घेतला जाईल. पण ही बाहेरून येणारी मदत समाजाकडून होणाऱ्या प्रयत्नांना पुरवणीरूप झाली पाहिजे. केवळ बाहेरच्या मदतीवरच आपण अवलंबून राहिलों तर आपल्या समाजाची कधींच प्रगति होणार नाहीं. बाहेरील मदतीवर अवलंबून राहण्याची संवय जर समाजाला लागली तर स्वतःच्या विकासासाठीं प्रयत्न करण्याच्या बाबतींत जनता उदासीन राहील. **जनतेला स्वतःच्या उन्नतीसाठीं कार्यक्षम बनविणें हेंच विकास योजनेचें ध्येय आहे.** जनता जागी झाली व आपली जबाबदारी समजून कामाला लागली, तर आपणाजवळ जी तुटपुंजी साधनसामुग्री आहे, तिच्या आधारावर सुद्धां आपणांस चांगलें काम करितां येईल. जनतेचे प्रयत्न जर थंडावले तर मात्र विकास योजना यशस्वी होणें अशक्य आहे.

आपल्या प्रगतीसाठीं आपण प्रयत्न केले पाहिजेत, ही भावना लोकांच्या मनांत रुजविणें हें लोकशिक्षण कार्यकर्त्यांचें काम आहे. ज्या देशांतील ८० टक्के लोक अगदीं पूर्ण निरक्षर आहेत, त्या देशांतील लोकांमध्यें ही भावना निर्माण करणें फार कठीण काम आहे. त्यासाठीं लोकांना शिक्षण देणें अत्यंत जरूर आहे ही गोष्ट लक्षांत घेऊनच, विकास योजनेच्या कार्यक्रमांत लोकशिक्षणाला महत्त्वाचें स्थान दिलें आहे. विकास योजनेची इमारत लोकशिक्षणाच्या पायावर उभारली गेली तरच ती टिकाऊ होऊं शकेल, ह्याची जाणीव आतां विचारवंत लोकांना होऊं लागली आहे.

लोकशिक्षणाच्या कोणत्या बाबींकडे प्रथम लक्ष देणें आज जरूर आहे, हें आपण निश्चित केलें पाहिजे. पण तें करितांना राष्ट्रीय नियोजनांत कोणत्या गोष्टींना प्राधान्य द्यावयाचें हें ठरवावें लागतें. कोणत्या मार्गानें गेलों तर आपणाला आपल्या कामासाठीं सबंध देशांतील लोकांचा उत्साह व पाठींबा मिळवितां येईल, हें पाहिलें पाहिजे. त्यासाठीं योग्य ते कार्यक्रम आपण हातीं घेतले पाहिजेत. ह्या कार्यक्रमांमार्फतच आपणांस

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Cooperative Societies Village Reform Society Co-operative farming

लोकांमध्यें जागृति उत्पन्न करितां येईल व विकासाच्या ज्या ज्या योजना आंखल्या जातील, त्या त्या योजना उचलून धरण्यासाठीं लोकांना तयार करितां येईल.

सहकारी सोसायटचा, ग्रामसुधारणा मंडळें, सामुदायिक शेती, जोडधंद्यांची वाढ, ह्या सर्व गोष्टींना पंचवार्षिक योजनेंत विशेष महत्त्वाचें स्थान मिळालें आहे. ह्या सर्व योजना सरकारच्या वेगवेगळचा खात्यांमार्फत आंखल्या जात आहेत; परंतु विकास योजनेच्या क्षेत्रांत जे जे अधिकारी काम करीत असतील, त्या सर्व अधिकाऱ्यांनीं एक गोष्ट लक्षांत ठेवायला हवी. आपणाला सबंध समाजाचा सर्वांगीण विकास साधावयाचा आहे, ह्यासाठीं सर्व खात्याच्या अधिकाऱ्यांनीं एकत्र येऊन एकमेकांच्या हातांत हात घालून काम करावयाचें आहे. आपली योजना ही ठराविक मुदतींत पार पाडावयाची असल्यामुळें, आपल्या कामांत दिरंगाई किंवा चालढकल होणार नाहीं ह्याची काळजी घ्यायला पाहिजे. आज ज्या ज्या ठिकाणीं विकास योजना लागू झालेली आहे त्या त्या ठिकाणीं नेमलेल्या प्रकल्पाधिकाऱ्याचें अथवा उपप्रकल्पाधिकाऱ्याचें हेंच महत्त्वाचें काम आहे. त्यानें आपल्या विभागांत काम करणाऱ्या भिन्न भिन्न खात्याच्या अधिकाऱ्यांमध्यें जास्तींत जास्त सहकार्य घडवून आणावयाचें आहे व आपल्या कामांत जास्तींत जास्त एकसूत्रता साधावयाची आहे.

लोकशिक्षणाच्या क्षेत्रांत काम करणाऱ्या आपल्या कार्यकर्त्यांचा अनुभव हाच आहे. आजपर्यंत ह्या कार्यकर्त्यांना इतर खात्यांतील लोकांचें सहकार्य मिळत नसे. त्यामुळें बिचारा एकांडेपणानें काम करी व त्या कामांत त्याला इतरांची व्हावी तशी मदत होत नसे. ह्यामुळें त्याच्या श्रमांचें योग्य माप त्याच्या पदरांत पडत नसे. आतां ज्या ज्या ठिकाणीं विकास योजना लागू झाली आहे, त्या त्या ठिकाणीं लोकशिक्षण कार्यकर्त्यांना हें सहकार्य मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहेच; पण ह्या क्षेत्राच्या बाहेर आतां अधिक प्रमाणांत, कार्यकर्त्याला असें सहकार्य मिळूं शकेल, कारण लोकशिक्षणाचें महत्त्व लोकांना दिवसें-दिवस वाढत्या प्रमाणांत पटूं लागलें आहे.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आपणासारख्या कार्यकर्त्यांना हें सहकार्य मागितल्याशिवाय मिळूं शकेल, अशी परिस्थिति अद्यापि निर्माण व्हावयाची आहे. ह्यासाठीं कार्यकर्त्याला थोडी धडपड करावी लागेल. त्याला सहकार्य इतरांजवळ मागावें लागेल; पण मागितल्यावर तें मिळूं शकेल. ह्या कामीं लोकशिक्षण कार्यकर्त्यांना ग्रामसेवक व सेविका ह्यांचें सहकार्य मिळवावें लागेल. लोकशिक्षण संघटक व शाळा खात्यांतील भागशिक्षणाधिकारी, ह्यांनीं वेळोवेळीं आपल्या विभागांतील लोकशिक्षण कार्यकर्ते व ग्रामसेवक व सेविका ह्यांच्या संयुक्त बैठकी घ्याव्यात; शिबिरें घ्यावींत व परस्परांचें काम एकमेकांना कसें पूरक आहे, ह्याची त्यांना कल्पना द्यावी. वेगवेगळ्या खात्याचे प्रमुख नेहमींच एकमेकांना भेटूं शकतात वं परस्परांना सहकार्य देण्याचें कबूल करूं शकतात. जोंपर्यंत आपण खालून पाया नीट बांधूं शकत नाहीं तोंपर्यंत वरच्या थरावर केले जाणारे प्रयत्न यशस्वी होणार नाहींत. लोकशिक्षण कार्यकर्ते व ग्रामसेवक आणि सेविका ह्यांच्यामध्यें जास्तींत जास्त सहकार्यानें काम करण्याची भावना निर्माण झाली पाहिजे.

---

११. ग्रामपहाणी

कोणतेंही काम करावयाचें तें योजना आंखून केलें तर चांगलें व लवकर होतें. योजना न आंखतां काम हातीं घेतलें तर तें काम कितीसें यशस्वी होईल याची शंकाच आहे. चांगली योजना पहाणीवर आधारणें जरूर आहे. गांव सुधारण्याचें काम हातीं घ्यावयाचें असेल तर गांवच्या परिस्थितीची पहाणी करणें जरूर आहे. लोकशिक्षणाचें मुख्य ध्येय गांवची व लोकांची सुधारणा घडवून आणणें हें आहे. त्यासाठीं गांवांतील अनुकूल व प्रतिकूल गोष्टींची मोजदाद करायला पाहिजे. ही मोजंदाद एकांगी असतां उपयोगी नाहीं. सर्वांगीण असावयास पाहिजे.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

योग्य पहाणी केल्यापासून खालील फायदे होतात.--

(१) केवळ अनुमान धपक्यानें ठरविलेल्या बाबी खोटया ठरण्याचा संभव असतो. (२) सर्व गोष्टी आकडयांत मांडून दाखवितां येतात. (३) खोटे संभ्रम दूर होतात. (४) आपल्या कामाकडे व जीवनाकडे शास्त्रीय दृष्टिकोनांतून पहाण्याची संवय लागते. (५) अनेक दुर्लक्षित गोष्टींकडे लक्ष जातें. (६) अगदीं लहानसहान गोष्टींतसुद्धां पुष्कळ अर्थ भरलेला असतो याचा उलगडा होतो. (७) कामाची रूप-रेषा व टप्पे निश्चित करतां येतात. किती प्रगति झाली हें सांगतां येतें. (८) कामास लागणारा वेळ व माणसांचे कष्ट यांचें नियोजन होऊन कोणतीही गोष्ट फुकट जात नाहीं.

लोकशिक्षणाचें काम एकाद्या गांवीं हातीं घ्यावयाचें असेल तर त्या गांवची सर्वांगीण पहाणी करावी लागेल. आजकाल लोकशिक्षणाचें काम साक्षरता पसरविण्याचें काम नसून लोकांचें जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठीं लोकांना कार्यप्रवण करणें व त्यांना उन्नतीचा रस्ता दाखवून पुढें जाण्यास मदत करणें हें आहे. यासाठीं ज्या गावांत लोक-शिक्षणाचें काम करावयाचें आहे, त्या गांवांतील खालील बाबींची सविस्तर माहिती घ्यावी लागेल.

(१) भौगोलिक परिस्थिति, (२) लोकसंख्या--वाढ व घट--कुटुंबियांची संख्या, (३) आर्थिक दर्जा, (४) धंदे, (५) सांस्कृतिक प्रगति, (६) प्राथमिक शिक्षणांतील यश, (७) गांवची अवस्था.

या विभागांतील प्रत्येकाचा लोकांच्या जीवनावर परिणाम होतो म्हणून लोकशिक्षणाच्या कामासाठीं याची पहाणी करणें जरूर आहे.

(१) **भौगोलिक परिस्थितिः**--गांवाच्या भौगोलिक परिस्थितीवर गांवचें जीवन अवलंबून आहे. गांवचें क्षेत्रफळ, डोंगर, नद्या, हवामान, पाऊस, जमिनीचा प्रकार व मगदूर, जमिनीस व गांवास पाण्याची सोय या सर्वांचा तेथील लोकांच्या राहणीवर परिणाम होतो. तसेंच तेथें होणारीं पिकेंही भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून असतात व त्यांचा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

परिणाम लोकांचें खाणेंपिणें यावर होतो. कोंकणांत तांदूळ खातात; देशावर ज्वारी, बाजरी खातात; खानदेशांत गहूं खातात. गांव–पहाणी करीत असतां या सर्व बाबींची माहिती गोळा करणें जरूर आहे. भौगोलिक परिस्थितीचा माणसाच्या भल्यासाठीं जास्तींत जास्त उपयोग करून घेण्यासाठीं पहाणी करावी. निसर्गानें दिलेल्या सर्व गोष्टी बदलतां येणार नाहींत. परंतु माणूस निसर्गावर बेताबेतानें चढाई करीत आहे. जगण्यासाठीं तें करावें लागणार आहेच. परंतु खेडेगांवांत राहणाऱ्या लोकांना या गोष्टीची जाणीव करून देणें जरूर आहे. ओढे, नद्या आडवून तें पाणी शेतीला उपयोगांत आणलें पाहिजे. डोंगरावरील जंगलाचा नाश न करतां त्याची पद्धतशीर तोड करणें जरूर आहे. चराऊ रान असेल तर दुभत्याचा धंदा करणें सोईचें आहे. या साऱ्या गोष्टी भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून आहेत. त्याची योग्य पाहणी झाली तर लोकांचें जीवन सुधारतां येईल.

(२) **लोकसंख्या** :– लोकसंख्येचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. कांहीं देशांत लोकसंख्या वाढविण्याची जरूर असते तर कांहीं देशांत त्याचें नियोजन करणें अगत्याचें असतें. शिवाय जीवनाचा सारा खटाटोप लोकांच्या सुखासाठीं आहे. त्या लोकांच्या संख्येचा विचार न करतां योजना आंखली तर ती सफल होणें कठीण आहे. अनेक वेळीं जन्ममृत्युचाही विचार करावा लागतो. ज्या ठिकाणीं जन्म जास्त त्या ठिकाणीं मृत्युसंख्याही जास्त, हा निसर्गाचा नियम आहे. आपल्या देशांतील बालमृत्यूचें प्रमाण फारच मोठें आहे. तसेंच आपली जीवन मर्यादाही फारशी लांब मुदतीची नाहीं. या साऱ्या बाबींची मोजदाद गांव पाहणीच्या वेळीं करणें जरूर आहे.

वयवारीच्या कोणत्या गटांत लोकसंख्या जास्त दाटलेली आहे यावरही त्या गांवची योजना आंखणें अवलंबून आहे. तसेंच ही लोकसंख्या शहर, गांव, वाडी, वस्ती, पडळी किंवा स्वतंत्र शेतावरील घरें यांत जी विभागली गेली आहे यावरही त्याच्या उन्नतीचे मार्ग अवलंबून आहेत. जर एकादें खेडेगांव शहराजवळ असेल तर तेथील उद्योगधंदे,

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

संस्कृति, लोकांची राहणी शहरापासून दूर असलेल्या खेड्यापेक्षां निराळी असते.

कुटुंबांत माणसें कमी असतील तर तें कुटुंब आजच्या काळांत सुखी असतें. घरांत खायला तोंडें जास्त व मिळवणारे हात कमी असले तर त्या कुटुंबांत समाधान नांदत नाहीं. त्यांतील कर्ता मनुष्य स्वाभिमानी होतो तर त्याचे आश्रित दुर्मुखलेले व उदासीन होतात.

(३) **आर्थिक दर्जा :–** माणसी मिळकत व माणसी खर्च यांचा हिशेब लोकशिक्षणाचें कार्य करणाऱ्या माणसाला माहीत असणें फायद्याचें आहे. दर माणसी मिळकत पुरेशी असेल तर त्या लोकांत तत्त्वज्ञानाचा प्रसार लवकर होतो. भरलेलें पोट करमणुकीच्या किंवा व्यसनाच्या मागें लागतें. आजकाल विकास योजना सुरूं झाल्या आहेत. लोकांची आर्थिक परिस्थिति चांगली असेल तर या नवीन कामासाठीं जरूर तो पैसा ते लोक उभारूं शकतील. कोणत्याही प्राथमिक, माध्यमिक किंवा उच्च शाळेंत पाऊल टाका, त्या ठिकाणीं शिकत असलेल्या मुलांपैकीं फार मोठी संख्या सुखवस्तु आईबापांच्या मुलाबाळांचीच असते. म्हणजेच (शिक्षण व विकास कार्य यांचा संबंध गांवच्या आर्थिक परिस्थितीशीं निगडीत आहे ही गोष्ट स्पष्ट आहे.)

(४) **धंदे:–**शेतावर काम करणाऱ्या शेतकऱ्याचें, गिरणींत यंत्राबरोबर काम करणाऱ्या मजुराचें, स्वतंत्र व्यापार करणाऱ्या दुकानदाराचें जीवन स्वतंत्र आहे. त्यांचे संस्कार निरनिराळे. त्यामुळें त्यांच्या कल्पना स्वतंत्र असणार. शेतकरी बहुसंख्य असलेल्या गांवांतील लोकशिक्षणाचें कार्य व मजूर बहुसंख्य असलेल्या गांवांतील लोकशिक्षणाचें कार्य निराळें आहे. दोन्हीही प्रकरच्या लोकांच्या कामाच्या व विश्रांतीच्या वेळां स्वतंत्र आहेत. म्हणून गांव पहाणी करीत असतां तेथील लोकांचे मुख्य धंदे व जोडधंदे यांचा विचार करावा. नवीन नवीन जोडधंदे लोकांना मिळवून दिल्यास लोक प्रयत्न करतील व त्यांचें उत्पन्नही वाढेल.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

(५) **सांस्कृतिक प्रगति :–** लोकांच्या धार्मिक समजुती, त्यांचे सण, समारंभ, उत्सव, त्यांचें तत्त्वज्ञान, त्यांचे आचार–विचार, त्यांची आवड–निवड यांचाही अभ्यास जरूर करावा. केवळ बाहेरील बाबींकडे लक्ष न देतां लोकांच्या मनाचा ठाव घेऊन तेथें दडून बसलेल्या गोष्टी बाहेर काढल्या पाहिजेत. गांवांत नवीन सुधारणा आणतांना त्या बेता-बेतानें आणाव्या लागतील. परंतु जर एकादा गांव नव्याच्या नाविन्यानें भारला असेल तर तेथें सुधारणा चटकन् आणतां येईल. लोकशिक्षणांत खरा बदल मनाचा होणें जरूर आहे. यासाठीं लोकांच्या अंतरंगांतील कल्पनांची व समजुतींचीही मोजदाद गांव पहाणीच्या वेळीं करावी.

(६) **प्राथमिक शिक्षणांतील यश :–** आज सक्ति योजना मोठ्या प्रमाणावर लागू झाली आहे. कित्येक देशांत सुमारें शंभर वर्षें सक्ति योजना लागू आहे. त्यामुळें त्या देशांतील साक्षरतेचा प्रश्न सुटला आहे. पण जेथें सक्ति योजना नुकतीच चालू झाली आहे, ज्यांची लोकसंख्या तुडुंब आहे व जे गरिबीनें गांजले आहेत तेथें साक्षरताप्रसाराचें व इतर जीवनाला योग्य शिक्षण देण्याचें काम फारच मोठें आहे. आपण ज्या गांवची पाहणी करणार तेथें चालू असलेल्या सक्ति योजनेंतील प्राथमिक शिक्षणाकडे किंवा प्रौढ वर्गांत मिळालेल्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. साक्षर निरक्षरांची मोजदाद जरूर करावी. साक्षर लोकांचें जीवन अधिक विचारशील व प्रगत असतें असा अनेकांचा अनुभव आहे.

७ **गांवची अवस्था :–** गांवांतील घरें, गोठे, मोऱ्या, रस्ते, जोड रस्ते, पाणोठे, देवळें, पार, धर्मशाळा या सर्वांची गणती करणें जरूर आहे. गलिच्छ खेड्याची सुधारणा करीत असतां खेड्याचें बहिरंग पूर्ण बदललें पाहिजे. खेडीं जर सुखी झालीं नाहींत तर तेथील लोक शहराकडे धांव घेतील. शहरांत मिळणाऱ्या सुखसोई खेड्यांत मिळूं लागल्या तर तेथील लोक सुखी होतील व खोट्या आशेनें शहराकडे धांवणार नाहींत. पोटभर अन्न, चांगलीं घरें, स्वच्छ पाणी, रात्रीं दिवाबत्ती, चांगले रस्ते, मनोरंजनाचीं साधनें या गोष्टी खेड्यांत मिळाल्या तर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शहरांत खेड्यांतील लोक कशाला येतील ? गांव पहाणींत या सर्वांचा विचार करून लोकशिक्षणाच्या कामाला सुरुवात करावी.

खेड्यांतील लोकांच्या अंतरंगाची पारख करण्यासाठीं त्यांच्यांतील गटांच्या संबंधाचाही अभ्यास करावा लागतो. कांहीं गांवें एकीनें गुण्यागोविंदानें नांदत असतात, तर कांहीं गांवें दुहीनें पोखरून निघालेलीं असतात. कांहीं गांवांत तर दोन गटांत अगदीं हाडवैर असतें. या सर्वांची माहिती असावी लागते. लोकशिक्षण कार्यकर्त्यानें तेथील गटांची माहिती करून घ्यावी. परंतु कोणत्याही गटाला आपण मिळूं नये. गांवच्या भांडणांत न पडतां एकोप्यानें कार्य पार पाडणें हें महत्त्वाचें आहे.

विविध अंगांनीं गांव पाहणी करण्याचे नमुने पुढें दिले आहेत. त्याप्रमाणें पाहणी केली तर त्यामुळें लोकशिक्षणाच्या कामाचा उठाव होईल व जनतेच्या गरजांचा विचार करून जर काम हातीं घेतलें तर खात्रीनें यश पदरांत पडेल.

ग्रामपहाणी

(१) गांवाचें नांव   तालुका   जिल्हा
(२) ग्रामपाहणीचे दिनांक   ते
(३) गांवाचें क्षेत्रफळ   चौ. मैल
(४) शहरापासून अंतर   मैल (१) शहराशीं नित्य संबंधित
(२) ,, नैमित्तिक ,,
(३) शहरापासून पूर्ण दूर
(५) गांवची वस्ती—(१) गावांत   पुरुष स्त्रिया एकूण
(२) पडळीवर
(३) वाडीवर
(४) शेतांत
(६) हवामान—जाने. फे. मा. ए. मे. जून जुलै ऑ. सप्टें.
कमाल
किमान

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

(७) पाऊस–जाने. फेब्रु. मा. ए. मे जून जुलै ऑ. सप्टें. आक्टोबर नोव्हेंबर डिसेंबर एकूण

(८) **शेती–जमिनींचे प्रकार**

(१) पिकावू:–एक पीक देणारी, दोन पिकें देणारी, चराऊ रान फळझाडासाठीं, जंगल एकूण

(२) पडिक:– लागवडीस आणतां येणारी } एकूण
,, न आणतां येणारी }

पिकें–मुख्य पिकें, उप पिकें पिकाखालील क्षेत्र एकरीं उत्पन्न, गतसालची आणेवारी

एकदल धान्यें:–

(तांदूळ, गहूं, ज्वारी, बाजरी
नाचणी, मका, राळे, वरी)

द्विदल धान्यें:–

(तूर, हरभरा, उडीद, वाटाणा,
मूग, हुलगा, मसूर इतर)

गळिताचीं धान्यें:–

(शेंग, करडी, एरंडी)

ऊंस, गूळ, साखर

फळफळावळ

भाजीपाला

कापूस, ताग

तंबाखू

गवत

पाणी पुरवठा–सरकारी कालवे, खाजगी कालवे, विहिरी, तळीं, ओढें, नद्या

क्षेत्र–

जिराईत

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जनावरें	तीन वर्षांवरील	तीन वर्षांखालील
बैल (वळू, शेतीच्या उपयोगी, इतर)		
रेडे (पैदाशीचे, शेतीस उपयोगी, इतर)		
गाई (दुधाळ, खाटचा, न व्यालेल्या, इतर)		
म्हशी (दुधाळ, खाटचा, न व्यालेल्या, इतर)		

इतर जनावरें	१ वर्षाखालील	१ ते ३ वर्षांचीं	तीन वर्षांवर
(शेळचा, बोकड, मेंढचा, मेंढे, घोडे, गाढवे, उंट, खेंचरें, डुकरें)			

पक्षी	कोंबडचा वदकें	नर	माद्या	पिलें	एकूण

शेतीचीं अवजारें	नांगर	गाडचा	चरक	इंजिनें	ट्रॅक्टर	इतर

बीं-बियाणें	कोणतें बीं वापरतात	सुधारलेलें	जुनें

खतें	कंपोस्ट खड्डे	शेणखत खड्डे	सोनखत खड्डे	मूत्रखत खड्डे

गांवचा सारा

गांवांत तगाई किती आणली (गेल्या पांच वर्षांतील आंकडे)

सरासरी एका माणसास जमीन

कुटुंबांतील लोक	एकूण बागाईत जमीन	एकूण जिराईत	इतर जमीन	आकार	खंड

वार्षिक मिळकत—(१) घरची शेती (२) खंडाची शेती (३) जोड धंदा (४) मजुरी (५) गाडी भाडें (६) दूध (७) कोंबडचा (८) इतर.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

(९) **धंदे**--(१) शेतकरी (२) सावकार (३) जमीनदार (४) व्यापारी (५) कलावंत (६) बलुतेदार (७) दलाल (८) मजूर (९) गांवगुंड (१०) अधिकारी नोकर (११) कारभारी.

समुद्राजवळ-- मच्छीमारीचें उत्पन्न.
मीठागाराचें उत्पन्न.

(१०) **सहकार**	सभासद	भांडवल
शेती सोसायटचा		
लँड मॉर्गेज		
शेतकरी संघ		
धंदेवाईक संघ		
औद्योगिक सहकारी संघ		

(१) सोसायटी स्थापून किती दिवस झाले.
(२) भांडवलाची वाढ, सभासदांची वाढ.
(३) तोटा झाला असल्यास कारणें.
(४) लोकमत अनुकूल कीं प्रतिकूल.

(११) **मृत्यु**:– गेल्या पांच (कांही) वर्षांत झालेले मृत्यु १. कॉलरा, २. देवी, ३. प्लेग, ४. मलेरिया, ५. इन्फ्लुएंझा, ६. आमांश किंवा हगवण, ७. फुफ्पुसाचे रोग, ८. हृदयाचे रोग ९. अपघात.
चालू वर्षी चालूं आजाराचीं नांवें.
वयवार मृत्यूचें प्रमाण प्रत्येक वर्षीचे किंवा
गेल्या पांच वर्षांतील

१ आठवडापर्यंत	
१ आठवडा ते १ महिना	१५ ते २०
१ महिना ते ६ महिने	२० ते ३०
६ महिने ते १२ महिने	३० ते ४०
१ वर्ष ते ५ वर्षे	४० ते ५०
५ ते १०	५० ते ६०
१० ते १५	६० वर्षांवर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दुकानें किराणा भुसार, पिठाच्या गिरण्या, हॉटेल, न्हाव्याचीं दुकानें, शिंपी.

ग्रामपंचायत १. वसूल झालेला. २. न झालेला. ३. एकूण.

लोक उत्साहानें भाग घेतात काय ?

किती खटले गेल्या वर्षीं चालविले ?

किती खर्च केला.

शिल्लक किती.

दावे दिवाणी. फौजदारी.

गुन्हे १. व्यक्तिगत, २. दोन गटामध्यें, ३. खून, ४. चोरी, दरवडे ५. घरफोडी, ६. शेतांवरून. ७. बायका पळविणेंवरून, ८. इतर.

आरोग्य

किती घरांत खिडक्या पाडल्या आहेत?

,, ,, गोठे निराळे आहेत?

,, ,, चराचे संडास ,, ?

,, ,, शोष खड्डे ,, ?

,, ,, कंपोस्ट ,, ,, ?

,, ,, मोरीचें पाणी योग्यप्रकारें उपयोगांत आणलें जातें?

,, ,, पाणी गाळून पितात ?

दवाखाना–आरोग्य केंद्र, सूतिकागृह, संतति–नियोजन केंद्र, आरोग्य पथक यांपैकीं गांवांत काय काय आहे ?

लोक त्यांचा कितीसा उपयोग करून घेतात ?

गांवसफाई वर्षातून किती वेळां केली जाते ?

गांवापासून डॉक्टर किती अंतरावर ?

गांवांत शारीरिक व्यंग असलेले पुरुष स्त्रिया एकूण

,, ,, ,, नसलेले ,, ,, ,,

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

गांवच्या पाणी पुरवठ्याची योजना

लोकांचा पेहराव.

गांवचें दळणवळण

एकूण **वहानें** किती ? १. रेल्वे गाड्या २. एस्. टी. ३. बग्या ४. टांगे ५. छकडे ६. बैलगाड्या ७. हातगाड्या ८. मोटारी ९. मालट्रक १०. इतर.

टपालखातें–पोष्टाचा प्रकार, एकूण नोकर, किती मैलांतील लोकांना फायदा मिळतो.

रेडिओ–गांवांत किती रेडिओ आहेत ?

वर्तमानपत्रें–कोणतीं वर्तमानपत्रें येतात ?

वाचकांची संख्या किती ?

गांवाला जोड रस्ता आहे काय ? किती लांबीचा आहे ?

पावसाळ्यांत चालू असतो काय ?

समुद्रकांठ असल्यास– जहाजें– पडाव किती ?

बाजाराच्या गांवचें अंतर किती ?

यात्रेचा दिवस– जमणाऱ्या लोकांची संख्या.

शैक्षणिक माहिती

१. पूर्व प्राथमिक शाळा– बालवाडी, मॉंटेसरी, क्रीडासंस्था,
२. प्राथमिक शाळा– किती इयत्तेपर्यंत, कोणत्या प्रकारची ?

(१) मूलोद्योग, (२) बेसिक, (३) साधी.

३. शिक्षकांची संख्या.

४. सरासरी पट, सरासरी हजेरी, गैरहजरीचीं कारणें.

५. माध्यमिक विद्यालयांत किती मुलें जातात ?

६. कॉलेजांत किती मुलें जातात ?

७. शाळागृह चांगलें आहे काय ?

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

८. प्रौढ शिक्षणाचे वर्ग किती आहेत ?

९. गेल्या दहा वर्षांत वर्गांतून किती प्रौढ साक्षर झाले ?

१०. वाचनालय व ग्रंथालय आहे काय ? वाचकांची संख्या.

११. सण उत्सव कोणते साजरे केले जातात ?

वयवारी—साक्षर निरक्षर

	१ ते ६ पु. स्त्रि.	६ ते १४ पु. स्त्रि.	१४–२५ पु. स्त्रि.	२५ते५० पु. स्त्रि.	५०ते६० पु. स्त्रि.	६० चे वर पु. स्त्रि.
साक्षर निरक्षर						
उद्योगी निरुद्योगी						
शेतकरी बलुतेदार						
मजूर कारागीर						
गांवांतील शहरांत गेले						

निरक्षरांचीं नांवें, साक्षरांचीं नांवें, साक्षरतेचें प्रमाण.

गांवची इतर माहिती

धर्मशाळा किती ? देवळें

व्यायाम शाळा (तालमी) भजनी मंडळें

ढोल, लेझीम खेळणारे गट महिला मंडळें

करमणुकीसाठीं संस्था तरुण मंडळें

लोकांचे पारावरील अड्डे व त्यांतील अंदाजे लोक.

हंगामांचे दिवस,

मोकळे दिवस.

जोडधंदे.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मोकळ्या दिवसांतील कामें— पुरुषांचीं, स्त्रियांचीं.
ग्रामसुधारणेचीं कोणतीं कामें करतां येतील ?
आर्थिक सहाय्य कसें मिळवितां येईल ?
गांवांतील लोकांच्या मुख्य गरजा काय आहेत ?
गेल्या निवडणुकींत किती टक्के लोकांनीं मतें दिलीं ?
हरिजनांना पाणी भरण्यास मुभा— मंदीर प्रवेश—
हरिजनांना जमिनी आहेत काय ? त्यांचा मुख्य धंदा ?

---

१२. महिला मंडळें

कोणत्याही देशाची प्रगति मोजण्याचें खरें माप म्हणजे त्या देशांतील स्त्रियांचा समाजांतील दर्जा हेंच मानलें जातें. सुधारलेल्या देशांत स्त्रियांचें स्थान श्रेष्ठ असतें. त्याचप्रमाणें श्रेष्ठ दर्जाच्या स्त्रिया समाजसुधारण्यास मदत करतात. गेल्या कांहीं वर्षांत आपल्या देशांत जे क्रांतिकारक बदल झाले आहेत त्यामुळें आपल्या समाजांतील स्त्रियांचें स्थान उंचावत चाललें आहे असें दिसून येईल. कोणत्याही स्त्रीच्या व्यक्तित्वाचा पूर्ण विकास होणें जरूर आहे. त्यासाठीं अनुकूलता मिळण्याची आवश्यकता आहे. गांवोगांवीं महिला मंडळांची स्थापना झाली तर स्त्रियांच्या उन्नतीस फार मोठी मदत होणार आहे.

या महिला मंडळांत कोणत्या गोष्टींचा समावेश व्हावा, या मंडळामार्फत कोणते कार्यक्रम घ्यावेत याचा विचार अनेकवेळीं झालेला आहे. विशेष करून खालीं नमूद केलेले कार्यक्रम महिला मंडळा-तर्फे घ्यावेत.

१. निरक्षर प्रौढभगिनींचा साक्षरतेचा वर्ग चालविणें.
२. शिवण वर्ग उघडून स्त्रियांचे आणि मुलांचे कपडे बेतणें, कापणें व मशीन शिलाई शिकविणें.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

३. गरोदर स्त्रियांसाठीं प्रसूतिपूर्वीं घ्यावयाच्या काळजीबद्दल मार्गदर्शन करणें आणि सुलभ प्रसूतिसाठीं दायीची मदत देणें. साधनें पुरविणें.

४. भरतकाम वर्ग, विणकाम वर्ग उघडून कलाशिक्षण देणें.

५. सणावाराचे दिवशीं सांस्कृतिक हळदीकुंकवाचे खेळांचे व करमणुकीचे कार्यक्रम घडवून आणून संघटना व प्रचार-कार्य वाढविणें.

६. रंजन कार्यक्रमासाठीं विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम बसवून कलापथकासारखें प्रचारसाधन चालविणें.

७. जवळपासच्या सहली काढणें.

८. राष्ट्रीय दिन आणि विशेष कार्यक्रम साधून रांगोळी, भरत-काम इत्यादींचीं प्रदर्शनें भरविणें व चढाओढी घेऊन बक्षिसें देणें.

९. महिलांसाठीं वाचनालय चालविणें. व्याख्यानमाला चालविणें.

१०. बालसंगोपन, गृहजीवन, पाकशास्त्र, घरगुती औषधें प्रथमोपचार अशा जीवनाला आवश्यक विषयांचे थोडया मुदतीचे स्वतंत्र वर्ग चालवून स्त्रियांचें सामान्यज्ञान वाढ-विणें. हे किंवा अशा प्रकारचे स्त्रियांचे आणि मुलांच्या उन्नतीचे कार्यक्रम आंखून पार पाडणें.

११. कोंबडया पाळणें, पापड, लोणचीं, मसाले, खेळणीं, पिशव्या अशा सारखे घरगुती धंदे वाढविणें. तसेंच महिला मंडळा-मार्फत खास मुलांचे करितांही खालील कार्यक्रम घेतां येतील.

१. लहान मुलांच्या खेळण्याची व्यवस्था करावी. त्यासाठीं गांवांतील एकादी सोईची जागा पाहून त्याजागीं लहान मुलांना खेळण्यासाठीं उपयुक्त साहित्य आणावें. गांवांतील मुलांना सोईची वेळ ठरवून जास्तींत जास्त मुलांना तेथें जमवावें. बालक्रीडा केंद्र निघाल्या-

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मुळें मुलांची खेळण्याची सोय होईल व मुलें खेळीमेळीनें वागायला शिकतील.

२. मुलांच्या सहली काढाव्यात. तसेंच मुलांचे सहभोजनाचे कार्यक्रम घडवून आणावेत. यामुळें मुलांच्या निरीक्षण शक्तीस वाव मिळेल व निसर्गाच्या सान्निध्यामुळें त्यांना नवा आनंद उपभोगायला मिळेल.

३. मुलांच्या स्वच्छतेकडे व आरोग्याकडे लक्ष देण्यासाठीं विशेष कार्यक्रम व्हावेत.

४. मुलांच्या अंगीं असलेले विविध गुण वाढण्यासाठीं "बालसभा" भरवाव्यात.

५. लहान मुलांचीं वाचनालयें काढावींत, मुलांना आवडतील अशीं पुस्तकें जमवून तीं मुलांना वाचायला द्यावींत. ज्या मुलांना वाचतां येत नसेल त्यांना तीं पुस्तकें वाचून दाखवावींत.

६. मुलांसाठीं "छंदवर्ग" सुरू करावेत. प्रत्येक मुलाची आवड निराळी असते. "छंदवर्गा"च्या सोयीमुळें त्यांच्या आवडीच्या कर्तृत्वास वाव मिळतो व तीं उद्योगांत रममाण होतात.

७. जीं मुलें शाळेंत जात नाहींत त्यांच्यासाठीं व ज्या स्त्रिया निरक्षर आहेत त्यांना शिकविण्यासाठीं साक्षरताप्रसाराचे वर्ग काढावेत.

८. गरीब मुलांना दूध देण्याची व्यवस्था करावी.

९. जीं मुलें शाळेंत जातात त्यांना समाजकार्य करावयास प्रवृत्त करावें. त्यांच्याकडून श्रमदानाचें कार्य करून घ्यावें व गांवच्या कल्याणाचें काम करावयास मुलांना प्रोत्साहन द्यावें.

१०. जी मुलें फारच लहान असतील त्यांच्यासाठीं बालवाडी स्थापन करावी.

सारांश स्त्रियांना विशेष आवडणारे हळदीकुंकवाचे कार्यक्रम घडवून आणतां येतील. स्त्रियांना घरगुती औषधांची माहिती देणें,

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

स्वयंपाकगृहांत सुधारणा करणें, अन्नधान्य टिकविणें, मुलांचें संगोपन करणें, इत्यादि गोष्टीही समजून देतां येतील. महिला मंडळातर्फे केवळ स्त्रियांचीं शिबिरें भरवून त्यांच्या जिव्हाळयाच्या प्रश्नावर चर्चा घडवून आणण्याचें कार्यही करतां येईल.

आजकाल महिला मंडळांची स्थापना खेडयापाडयांतही होऊं लागली आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. परंतु ही महिला मंडळें सातत्यानें चाललीं पाहिजेत व त्यांच्या कार्यास खंड न पडतां स्त्रियांच्या व बालकांच्या उन्नतीसाठीं त्यांनीं सतत कार्यक्षम राहणें जरूर आहे.

---

१३. वाचनालयें

वाचन हा ज्ञानप्राप्तीचा सुलभ उपाय आहे, म्हणून नवसाक्षर प्रौढ ज्ञान संपादनाचे कार्यांत स्वावलंबी होण्यासाठीं त्याला वाचनाची अभिरुचि लागली पाहिजे. वाचनाची गोडी ही वाचनाला मिळणाऱ्या पुस्तकांतील विषय, मांडणी, भाषा, यांवर अवलंबून आहे. त्यासाठीं सरकार आणि जनता भारताची आजची गरज लक्षांत घेऊन नवसाक्षरांचें वाङमय तयार करीत आहे. हें तयार होणारें वाङमय विशेषतः खेडयांतील नवसाक्षर शेतकरी आणि मजूर व शहरांतील नवसाक्षर कामगार यांच्या पुढें येण्याचा एकच उपाय म्हणजे वाचनालयें होत. त्यासाठीं सरकारनें ग्रामीण वाचनालयें काढून तीं लोकप्रिय करण्याची योजना आज कित्येक वर्षें राबविण्याचें काम चालविलें आहे. पण हीं वाचनालयें लोकप्रिय होत नाहींत. कारण त्यामध्यें अतिशय तुटपुंजा पुस्तक संग्रह असतो. त्यांत असतील तीं सर्वच पुस्तकें लोकांच्या जीवनाला आवश्यक विषयावरील असतीलच असें नाहीं. त्यामुळें वाचनाची गोडी वाढविल्याशिवाय वाचनालयें कार्यक्षम होणार नाहींत असा कयास जाणत्या मंडळींनीं काढला.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

वाचनाची गोडी लागावी म्हणून वाचन कार्डांचा वापर करणें, प्रथम, द्वितीय, तृतीय श्रेणीच्या स्वरूपांत पुस्तकें पुरवणें हें शास्त्रीय उपाय, वाङ्मय शिबिरांतून आलें. आतां त्यापुढची कामगिरी म्हणजे या पुस्तकांच्या वाचनाची आवड उत्पन्न करण्याचे प्रयत्न करणें. त्यासाठीं खालील उपाय उपयुक्त ठरतील असें अनुभवावरून लक्षांत आलें आहे.

(१) भरपूर वाचनकार्डे फेरून वाचण्यास पुरविणें.

(२) दुसऱ्या कसोटीचे किंवा नवसाक्षरांचे खास वाचन वर्ग उघडून तेथें एकाच छोटया पुस्तकांच्या अनेक प्रति ठेवून आरंभीं संथा पद्धतीनें तीं पुस्तकें वाचून घेणें.

(३) पुस्तकांचें सामुदायिक वाचन करणें.

(४) या वाचनांतील महत्त्वाचा भाग भिंती फलकांवर लिहिणें.

(५) प्रौढ वर्ग वाचनालय म्हणून **वर्गांतच** ५।२५ पुस्तकें ठेवून वाचनालय चालविणें.

(६) शेंसव्वाशें पुस्तकांचें **फिरतें पिशवी वाचनालय** १०।२० खेडयांच्या केंद्रांत चालविणें. फिरत्या पिशवी वाचनालयाची योजना पुणें जिल्ह्यांत लोकप्रिय झाली आहे.

(७) ग्रामीण वाचनालय चालविणें. ग्रामीण वाचनालय चालविण्यासाठीं कोणते नियम अस्तित्वांत आहेत तें स्पष्टपणें कळावें म्हणून ग्रामीण वाचनालयाची सरकारी घटना, योजना व नियम पुढें दिलेले आहेत.

ग्रामीण वाचनालयाचे सरकारी नियम

तारीख २२ माहे फेब्रुवारी सन १९५५चा शिक्षण खात्याचा सरकारी ठराव नंबर एस्इएम् २४५४ याची जोड पुरवणी

मदतीदाखल आर्थिक सहाय्य देण्यासाठीं ग्रामीण वाचनालयांची नोंद करण्याचे नियम

१. **उद्देश**—ग्रामीण वाचनालयांना मान्यता देण्यांत व त्यांना मदत करण्यांत जे हेतु आहेत ते असे:—

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

(अ) ग्रामीण प्रदेशांतील जनतेंत वाचनाची संवय निर्माण करणें.

(ब) नवीन पुस्तकें व अद्ययावत् नियतकालिकें त्यांना वाचावयास मिळावींत अशी व्यवस्था करणें.

(क) नवीनच साक्षर झालेलें इसम पुन्हां निरक्षर होऊं नयेत म्हणून त्यांना वाचनासाठीं योग्य साहित्य मिळेल अशी तरतूद करणें.

२. **स्थान**——ग्रामीण प्रदेशांत, म्हणजे बरो अथवा शहर नगरपालिकांच्या हद्दीबाहेर अथवा तालुक्याच्या गांवाच्या किंवा मान्यता मिळालेलीं तालुका वाचनालयें असलेल्या गांवाच्या हद्दीबाहेर अशा वाचनालयांना मान्यता दिली जाईल. सामान्यतः ज्यांत एका गांवाचा अथवा एक मैलाच्या परिसरांत एकमेकांस जोडून वसलेल्या अशा गांवाच्या गटाचा समावेश होईल व ज्यांत एखादी प्राथमिक शाळा असेल अशा प्रत्येक स्थानिक प्रदेशांत फक्त एका वाचनालयास मान्यता देण्यांत येईल. खास स्त्रियांसाठीं अथवा बालकांसाठीं असलेल्या वाचनालयांचा देखील मान्यता देण्यासाठीं विचार करण्यांत येईल.

३. **व्यवस्था**——स्थानिक अधिकारी, ग्रामपंचायत, ग्रामसुधार सभा, सहकारी संस्था अथवा या कारणासाठीं स्थापन करण्यांत आलेली स्थानिक इसमांची अथवा वर्गणीदारांची समिति अथवा मंडळचांची नोंद करण्याविषयींच्या अधिनियमान्वयें नोंदणी करण्यांत आलेली एखादी मंडळी अथवा नोंदणी करण्यांत आलेला सार्वजनिक ट्रस्ट यासारख्या एखाद्या स्थानिक संस्थेच्या अथवा संघटनेच्या हातांत सदरहू वाचनालयाची व्यवस्था असली पाहिजे.

४. **नोंदणीसाठीं करावयाचा अर्ज**——व्यवस्थापक मंडळानें जुलै महिन्याच्या पहिल्या तारखेपूर्वी डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर यांजकडे ठरविलेल्या नमुन्यांत वाचनालयाच्या नोंदणीसाठीं अर्ज केला पाहिजे. त्या तारखेनंतर आलेले अर्ज त्या वर्षांत करावयाच्या नोंदणीसाठीं विचारांत घेतले जातील अशी शक्यता नाहीं.

५. **व्यवस्थापक मंडळानें ठेवावयाचें रेकॉर्ड**——व्यवस्थापक मंडळानें पुढील रेकॉर्ड ठेवलें पाहिजेः——

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

(अ) मिळालेल्या व दिलेल्या रकमांचा हिशेब, तसेंच प्रमाणकांची (व्हौचर) फाइल व पावती पुस्तकें;

(ब) ॲक्सेशन रजिस्टर;

(क) पुस्तकांची एक वर्गीकृत सूची;

(ड) येणाऱ्या वर्तमानपत्रांची व नियतकालिकांची यादी;

(इ) सरकारी मिळकत म्हणून राखण्यांत यावयाच्या अशा देणगीदाखल मिळालेल्या वस्तूंची यादी;

(फ) सभासदांची यादी;

(ग) सभासदांना दिलेल्या पुस्तकांची नोंद करण्याकरितां रजिस्टरें,

(ह) फर्निचर व इतर साहित्याची यादी;

(आय्) पाहुण्यांसाठीं अभिप्राय पुस्तक.

६. **नोंदणी**--डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर हा संबंधित विभागांतील सहाय्यक डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरकडून आवश्यक तो रिपोर्ट मिळाल्यावर आणि त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी करून वाचनालयाची, मान्यता मिळालेलें ग्रामीण वाचनालय म्हणून नोंदणी करील व वाचनालयास मदतीदाखल आर्थिक सहाय्य देईल. कोणत्याही कारणास्तव वाचनालयास मान्यता देतां येणार नाहीं असें डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरास आढळल्यास तो एज्युकेशनल इन्स्पेक्टरकडे एक रिपोर्ट सादर करील व एज्युकेशनल इन्स्पेक्टरचा त्या बाबतींतील निर्णय हा अखेरचा राहील.

७. **वार्षिक अहवाल सादर करणें**--व्यवस्थापक मंडळानें प्रत्येक वर्षीं जून महिन्याच्या १ ल्या तारखेपूर्वीं डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर-कडे आपण केलेल्या कामाचा एक वार्षिक अहवाल संबंधित हिशोबाच्या पत्रकासह सादर केला पाहिजे.

८. **तपासणी**--स्थानिक सहाय्यक डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरकडून किंवा डेप्युटी इज्युकेशनल इन्स्पेक्टर अथवा एज्युकेशनल इन्स्पेक्टर फर्मावितील अशा इतर कोणत्याही अंमलदाराकडून वर्षांतून

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

निदान एकदां तरी वाचनालयाची तपासणी करण्यांत येईल. या नियमित तपासणीशिवाय डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर हे स्वतःदेखील वर्षांतून निदान एकदां वाचनालयास भेट देतील.

९. **मदतीदाखल आर्थिक सहाय्य**--ग्रामीण वाचनालयास अगोदरच्या वर्षीं त्या वाचनालयानें केलेल्या ग्राह्य खर्चाच्या शेंकडा ५० टक्के या दरानें मदतीदाखल आर्थिक सहाय्य दिलें जाईल--मात्र आर्थिक सहाय्य देण्यास फंड उपलब्ध हवा व अशा आर्थिक सहाय्याची कमाल रक्कम ७५ रुपये इतकी असेल. ग्राह्य खर्चाचा हिशोब करतांना पुस्तकें, वृत्तपत्रें व नियतकालिकें यांखेरीज इतर बाबींवर शेंकडा २० टक्यांपेक्षां अधिक खर्च न करण्याबद्दल दक्षता बाळगली पाहिजे, म्हणजे मदतीदाखल आर्थिक सहाय्य देतांना वाचनीय साहित्यावर केलेल्या खर्चाच्या शेंकडा २० टक्यांपेक्षां अधिक असा इतर बाबींवर करण्यांत आलेला सर्व खर्च अग्राह्य समजण्यांत येईल. वाचनीय साहित्यावर करण्यांत येणाऱ्या खर्चापैकीं निदान शेंकडा ५० टक्के खर्च पुस्तकें खरेदी करण्यासाठीं राखून ठेवण्यांत येईल, याचीदेखील दक्षता बाळगण्यांत आली पाहिजे. पहिल्या वर्षी, वाचनालयास त्याच वर्षासाठीं जो खर्च करावा लागला त्या खर्चाच्या शेंकडा ५० टक्के इतकी रक्कम आर्थिक सहाय्य म्हणून देण्यांत येईल. आर्थिक सहाय्याची रोख रक्कम पैशाच्या रूपानें अथवा पुस्तकांच्या व नियतकालिकांच्या स्वरूपानें देतां येईल.

१०. **मान्यतेच्या शर्ती व आर्थिक सहाय्य अदा करणें**

(अ) वाचनालयाची व्यवस्था लायक व विश्वसनीय अशा मंडळाच्या हातीं असली पाहिजे व तिचें काम समाधानकारकरित्या चालविलें गेलें पाहिजे.

(ब) जातपात, धर्म, पुरुष अथवा स्त्री असा कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करितां सदरहू वाचनालय सर्वांना खुलें ठेविलें पाहिजे.

(क) प्रत्येक दिवशीं तें ठरविलेल्या वेळीं निदान एक तास तरी उघडें ठेवलें पाहिजे.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

(ड) वाचनालयानें आवश्यक तीं सर्व रेकॉर्डबुकें ठेवलीं पाहिजेत व त्यांची तपासणी करण्यासाठीं तपासणी अंमलदारासमोर तीं हवीं तेव्हां हजर केलीं पाहिजेत.

११. **वाचनालयाचा चिटणीस**--वाचनालय एखाद्या स्थानिक चिटणीसाच्या ताब्यांत असले पाहिजे व असा चिटणीस स्थानिक शाळेचा मुख्य शिक्षक अथवा शिक्षक अथवा इतर कोणताहि स्थानिक सरकारी अधिकारी अथवा बिनसरकारी सामाजिक कार्यकर्ता असल्यास उत्तम. या चिटणीसाचें नांव व पत्ता नोंदणीसाठीं तपासणी अधिकाऱ्याकडे कळविलें पाहिजे.

१२. सरकारी खात्यांपैकीं कोणत्याही खात्यांकडून मान्यता मिळालेल्या वाचनालयास पुरविण्यांत येतील अशा पुस्तकांच्या, पुस्तिकेच्या आणि इतर साहित्याच्या कोणत्याहि प्रती सरकारी मिळकत म्हणून जतन करणें हें मान्यता मिळालेल्या प्रत्येक वाचनालयाच्या व्यवस्थापक मंडळाचें कर्तव्य होय.

१३. **मान्यता काढून घेणें**--वाचनालयास देण्यांत आलेली मान्यता ही गैरव्यवस्थेच्या अथवा तपासणी अधिकाऱ्यांनीं वेळोवेळीं घालून दिलेल्या नियमांचें व हुकुमांचें पालन करण्यांत कसूर केल्याच्या कारणावरून डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरकडून कोणत्याही वेळीं काढून घेण्यांत येईल.

जेव्हां वाचनालय कायमचें बंद करण्यांत येईल अथवा जेव्हां त्यास मिळालेली मान्यता काढून घेण्यांत येईल तेव्हां सरकारी मिळकत म्हणून वाचनालयांत ठेवण्यांत आलेलीं सर्व पुस्तकें व साहित्य डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर यांजकडे अथवा संबंधित विभागाच्या सहाय्यक डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरकडे परत करण्यांत आलें पाहिजे. हें सर्व साहित्य शक्यतोंवर त्याच गांवांत अथवा सभोंवतालच्या इतर गांवांत मान्यता देण्यांत येईल अशा इतर कोणत्याही वाचनालयाच्या उपयोगासाठीं राखून ठेवण्यांत येईल.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

१४. **वाचनालयाची यादी ठेवणें** — डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरनें या योजनेअन्वयें आपल्या जिल्ह्यांत मान्यता देण्यांत आलेल्या सर्व वाचनालयांची एक अद्ययावत यादी ठेवली पाहिजे.

१५. ग्रामीण वाचनालयाची नोंदणी करण्यासाठीं व त्यास मदतीदाखल आर्थिक सहाय्य मिळण्यासाठीं करावयाच्या अर्जांचा नमुना (नियम ४ पहा).

ग्रामीण वाचनालयाची नोंदणी करण्यासाठीं व त्यास मदतीदाखल आर्थिक सहाय्य मिळण्यासाठीं करावयाच्या अर्जाचा नमुना.

(नियम ४ पहा).

१. वाचनालय स्थापन करण्यांत आलेला स्थानिक प्रदेश (गांव, तालुका, जिल्हा पोस्ट ऑफिस).

२. वाचनालयाची निश्चित जागा ...

३. वाचनालय स्वाधीन असलेल्या इसमाचें, मंडळाचें, अथवा संस्थेचें नांव व पत्ता.

४. खात्याशीं पत्रव्यवहार करण्याचा अधिकार दिलेल्या वाचनालयाच्या चिटणीसाचें नांव.

५. वाचनालयाच्या स्थापनेची तारीख ...

६. वर्षाचें अंदाजी उत्पन्न व खर्च ...

७. स्थानिक मदतीचें स्वरूप व व्याप्ति ...

८. वर्गणीदारांची संख्या ...

९. वाचनालयांतील पुस्तकांची संख्या ...

१०. वाचनालयांत येणाऱ्या वृत्तपत्रांची व नियतकालिकांची संख्या व नांवें.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

११. इतर तपशील कोणताही असल्यास (संबंधित प्रदेशांत इतर कोणतेंही वाचनालय आहे काय ?)

अर्जदाराची सही व हुद्दा.

ठिकाण...............

तारीख...............

जिल्ह्याच्या डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरचा शेरा :—

१. अर्ज मिळाल्याची तारीख

२. नोंदणी करण्यांत आल्याची तारीख

३. नोंदणी करण्याचें नाकारण्यांत आल्यास त्याची करणें.

ठिकाण............... सही.

तारीख...............

---

१४. इतर देशांतील लोकशिक्षण

आपल्या देशांतील लोकशिक्षणाची माहिती आतां जनतेस परिचित होऊं लागली आहे. विशेषतः ग्रामीण लोक 'रातची शाळा' या नांवानें लोकशिक्षणाच्या कामाचा वारंवार उल्लेख करतात. शहरी जनता ही खेड्यापासून इतकी दुरावत चालली आहे कीं, आपल्या देशाच्या कानाकोपऱ्यांत चालू झालेली ही चळवळ तिच्या कानापर्यंत केंव्हां पोहोंचणार हे समतज नाहीं. आपल्या देशांतील लोकशिक्षणाविषयींची जर ही अवस्था तर इतर देशांतील लोकशिक्षणाबद्दल बोलायचें कारणच नाहीं.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ज्या कांहीं लोकांना लोकशिक्षणाची थोडीफार माहिती आहे त्यांची अशी कल्पना आहे कीं, लोकशिक्षण म्हणजे ज्यांना लिहितां वाचतां येत नाहीं त्यांना चार अक्षरें शिकविणें. निव्वळ साक्षरताप्रसार म्हणजेच लोकशिक्षण. परंतु त्यांच्या या कल्पनेला धक्का बसल्याशिवाय रहाणार नाहीं. कारण ज्या देशांत सर्वच्या सर्व लोक साक्षर आहेत तेथेंही लोकशिक्षणाचें कार्य चालू आहे. खरें पाहतां अमेरिका, इंग्लंड, डेन्मार्क, ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड, स्वीडन व जपान या देशांतील साक्षरतेचा प्रश्न आज पूर्णपणें सुटला असला तरी तेथील लोकशिक्षणाचें काम अखंडितपणें चालू आहे. याच्या उलट हिंदुस्थान, चीन, आफ्रिका, थायलंड या देशांतील साक्षरतेचा प्रश्न अजून सुटलेला नाहीं. या ठिकाणीं लोकशिक्षणाची चळवळ साक्षरताप्रसाराभोंवतीच केंद्रित झालेली दिसून येईल.

साक्षरताप्रसाराला लोकशिक्षणांत प्रमुख स्थान आहे. परंतु लोकशिक्षणाचा उद्देश साक्षरताप्रसार नव्हे. लोकशिक्षण हे लोकांनीं, लोकांचें व लोकांसाठीं केलेलें शिक्षण होय. लोकांचें जीवन समृद्ध करून त्यांना सुखाचें, समाधानाचें व शांततेचें आयुष्य देणें हेंच लोकशिक्षणाचें खरें उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टाप्रत जाण्यासाठीं साक्षरता साधन मात्र होय यांत शंका नाहीं. जगांतील अनेक देशांतील लोकशिक्षणाची चळवळ यासाठींच चालू आहे.

शिवाय प्रत्येक देशाचे कांहीं प्रश्न असतात. ते प्रश्न सोडविणें हेंही काम लोकशिक्षणाच्याद्वारें केलें जातें. कांहीं देशांत सामाजिक प्रश्न असतात. कांहीं देशांत राजकीय असतात. तर कांहीं देशांत धार्मिक, आर्थिक प्रश्न असतात. कित्येक देशांत लोकसंख्या वाढविण्याचा प्रश्न असतो. कित्येक देशांत लोकसंख्या नियोजित करण्याचा प्रश्न असतो. कित्येक देशांत जमीन वांटपाचा प्रश्न तर कांहीं देशांत जमिनीच्या एकीकरणाचा प्रश्न असतो. जगांतील विविध देशांत जे विविध प्रश्न असतात ते सोडविण्यास लोकशिक्षणाची फारच मदत होते.

कांहीं आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न यूनेस्कोमार्फत केले जात आहेत. दोन महायुद्धांनीं माणसाला युद्धाचे दुष्परिणाम शिकविले

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आहेत व आज जगांतील राष्ट्रें समान भूमिकेवर येऊन शांततेंत नांदावींत यासाठीं जागतिक राष्ट्रसंघटनेतर्फे जोराचे प्रयत्न चालू आहेत. आज शास्त्रीय शोधामुळें जग लहान होत चाललें आहे. राष्ट्रें जवळ येऊं लागलीं आहेत. एकमेकांचें जीवन एकमेकांवर अवलंबून राहूं लागलें आहे. यावेळीं **माणसानें माणसाबरोबर न भांडतां प्रेमानें रहाव्याचें** ठरविलें तरच माणसें सुखी होतील; हाच लोकशिक्षणाचा संदेश आहे.

यंत्रयुगामुळें लोकांच्या रोजच्या जीवनावर परिणाम झाला आहे. पूर्वीं माणसाला फार वेळ काम करावें लागत होतें. आतां माणसें वाढलीं व कामही वाढलें. लोकांना पूर्वीं फार काम करावें लागत होतें. पण आज यंत्रामुळें इतकें काम करावें लागत नाहीं. कमी माणसांनीं काम केलें तरी चालतें. कमी वेळ काम केलें तरी चालतें. यंत्रामुळें पुष्कळ वेळ मोकळा राहूं लागला. या फावल्यावेळीं काय करायचें हा प्रश्न उभा राहिला. (WLO) वर्ल्ड लेबर आर्गनायझेशन या जागतिक कामगार संघटनेनें याचा विचार करून गिरणींत काम करणाऱ्या मजुरांचा फावला वेळ योग्य प्रकारें घालविण्याची सोय करण्यासाठीं त्यांच्या करमणुकीची व्यवस्था व्हावी, यासाठीं प्रयत्न केले. फावला वेळ योग्य प्रकारें कसा घालवावा याचें शिक्षण लोकांना जर दिलें नाहीं तर लोक व्यसनी बनतात व समाजाचा घात करतात. यासाठीं फुरसतीचा वेळ योग्य प्रकारें घालविण्याचें शिक्षण देणें याचाही विचार लोकशिक्षणानें केला आहे. लोकांच्या करमणुकीची व्यवस्था करणें हेंही काम लोकशिक्षणाचें आहे. फावल्या वेळांत लोकशिक्षणाचें कार्य केलें जातें व फावला वेळ कसा घालवावा याचेंही शिक्षण लोकशिक्षणद्वारां दिलें जातें. जगांतील सर्व देशांत लोकरंजनाचा भाग लोकशिक्षणांत समाविष्ट केला गेला आहे.

शिक्षणामुळें माणसाची संस्कारक्षमता वाढते. सुशिक्षित मनुष्य हा बहुतेक सुधारक असतो व अशिक्षित मनुष्य बहुधा सनातनी प्रवृत्तीचा असतो. जगांतील सुधारणा सुशिक्षित लोकांनींच घडवून आणली आहे. सुशिक्षित मनुष्य हा नाविन्याच्या मागें असतो. तो

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आनंदानें व समाजाच्या विरोधास न जुमानतां धडाडीनें नाविन्य स्वीकारतो. कालांतरानें इतर लोक त्याचें अनुकरण करतात व समाजांत बदल घडून येतो. समाजांत जर शिक्षणाचा प्रसार झाला असेल तर त्यांत नवीन गोष्टी लवकर येतील व लवकर पसरतील. यासाठीं शिक्षणाची थोरवी ओळखून अनेक राष्ट्रांनीं लोकशिक्षण उचलून धरिलें.

समाज हिताच्या तत्त्वज्ञानाची क्रियात्मक बाजू म्हणजेच लोकशिक्षण होय. प्रत्येक देशाचें विशिष्ट तत्त्वज्ञान असतें. अमेरिका, रशिया, जपान इत्यादि देशांतील लोकांनीं ज्या तत्त्वांचा स्वीकार केला त्यांचा प्रसार व्हावा ही त्या देशांतील तत्त्वज्ञान्यांची इच्छा असणारच. लोकशिक्षण ही त्या तत्त्वज्ञानाची क्रियात्मक बाजू आहे. जें व्हावें असें वाटतें तें तत्त्वज्ञान व तसें घडून येणें हेंच शिक्षण होय. लोकहित साधणाऱ्या तत्त्वज्ञानाचा प्रत्यक्ष व्यवहार हेंच लोकशिक्षण आहे. समाज बदलविण्याचें कार्य लोकशिक्षण करतें. हिंदुस्थानांत साधुसंतांनीं लोकशिक्षणाचें कार्य केलें. इतर देशांतील तत्त्ववेत्त्यांनीं आपल्या देशांत आपलें तत्त्वज्ञान प्रसाराचें कार्य केलें. हें तत्त्वज्ञान प्रसाराचें कार्य म्हणजेच लोकशिक्षणाचें कार्य होय. नवे विचार, नवे आचार व नवें तत्त्वज्ञान यांच्या बैठकीवर लोकशिक्षण अधिष्ठित आहे.

“ **देशोदेशीचें लोकशिक्षण** ” या पुस्तकांत अनेक देशांतील लोकशिक्षणाची रूपरेषा दिली आहे. त्यांपैकीं कांहीं देशांतील लोकशिक्षणाची माहिती येथें मुद्दाम दिली आहे.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

१. इंग्लंडमधील लोक-शिक्षण

(मुंबई प्रांताचे माजी पंतप्रधान मा. बाळासाहेब खेर यांनीं खालील पत्र महाराष्ट्र प्रादेशिक लोकशिक्षण समितीचे चेअरमन मा. बाबुरावजी जगताप यांना पाठविलें आहे. ९९ टक्के साक्षर असलेल्या इंग्लंडमध्यें समाज शिक्षणाचे प्रश्न कसे हाताळले जातात याची माहिती खालील पत्रावरून मिळेल.)

भारत भुवन, लंडन, १९ मार्च १९५३

प्रिय श्री. जगताप,

कांहीं दिवसांपूर्वीं मी केंब्रिजशायरचे शिक्षणाधिकारी श्री. हेन्री मॉरिस यांना भेटलों. त्यांनीं मला इंग्लंडमधील ग्रामीण जीवन सुधारण्याचे चालू असलेले प्रयत्न सांगितले. ते प्रयत्न श्री. मॉरिस यांच्या मार्गदर्शनाखालीं चालू आहेत. त्यांच्या सांगण्यांत असें आलें कीं, हिंदुस्थानप्रमाणेंच इंग्लंडमध्यें दिवसानुदिवस शहरांची बेसुमार वाढ होत आहे. शहरांत उद्योगधंदे वाढीला लागले आहेत, त्यामुळें खेड्यांतील नवजवान शहरी जीवनाकडे ओढले गेले आहेत. याचा परिणाम सहजच खेड्यांवर होत आहे. खेडीं ओस पडत चाललीं आहेत व शहरांवर लोकसंख्येचा दाब अधिक वाढत चालला आहे. याला पायबंद घालण्यासाठीं खेड्यांमधून ग्रामीण विद्यापीठें काढणें जरूर आहे, असें त्यांचें म्हणणें पडलें. या विद्यापीठांचा उपयोग दिवसा शाळेंत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं व्हावा व रात्रीं सर्वांसाठीं (Community Centre) समुदाय केंद्र म्हणून व्हावा. त्यांनीं आपली योजना येथील अधिकाऱ्यांपुढें मांडली व तिला संमति मिळाल्यानंतर या भागांत कितीतरी ग्रामीण विद्यापीठें (Village Colleges) सुरू झालीं आहेत व फारच चांगल्या प्रकारें चाललीं आहेत.

मी परवां एका ग्रामीण विद्यापीठाला भेट दिली. तेथील चालू असलेलें काम पाहून मला अत्यंत समाधान वाटलें. हें विद्यापीठ ७–३० ते ९–३० पर्यंत चालू असतें. बरोबर ७–३० वाजतां शेंकडो शेतकरी व कामकरी, पुरुष व स्त्रिया या कॉलेजमध्यें येतात व गटागटानें शिक्षण

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

घेतात. ते लोक सुतारकामाचें, लोहारकामाचें शिक्षण घेतात. स्त्रिया शिवणें, टिपणें, स्वयंपाक करणें व विणणें इत्यादि गोष्टी शिकतात. शिवाय फ्रेंच भाषा व इतर विषय शिकवतात ते निराळेच. या ठिकाणीं शारीरिक शिक्षणाचें शिक्षणही चालू असतें. येथें शिकत असलेल्या लोकांनीं आपण होऊन सांगितलें कीं, आम्हांला हें कॉलेजमधील शिकणें फार फार आवडतें. शिक्षणाचा लोकांवर चांगला परिणाम होत आहे हें मला देखील पटलें.

येथें लोकांच्या करमणुकीचीही सोय आहे. बैठे खेळ खेळण्यास भरपूर जागा आहे. बिलियर्ड, पिंगपांग किवा बॅडमिंग्टन खेळण्यास प्रशस्त सोय आहे. सार्वजनिक हॉलमध्यें त्यांच्या वारंवार बैठकी भरतात. कॉलेजला जोडूनच स्वस्त दराचें हॉटेल आहे.

या विद्यापीठांचा नजरेंत भरणारा भाग म्हणजे "**तरुण शेतकऱ्यांचा संघ**" होय. एका शेतकरी संघाच्या वार्षिक सभेस मी जातीनें हजर होतों. त्या ठिकाणीं गेल्या वर्षी केलेल्या कामाचा आढावा घेतला जात होता. शेतीविषयक प्रश्नावर बराचसा विचार विनिमय चालू होता. संघाच्या नेत्यांनीं मला हिंदुस्थानविषयींची माहिती सांगायला सांगितलें. मी ती आनंदानें सांगितली. ती माहिती ऐकण्यासाठीं उत्सुक झालेले चेहरे अद्याप मला डोळ्यासमोर दिसत आहेत. माझें असें ठाम मत झालें आहे कीं, हे संघ फारच उपयोगी आहेत व हिरिरीनें काम करणारे आहेत.

मी येथील चार पांच कॉलेजांना भेटी दिल्या. सर्व ठिकाणीं काम चांगलें चालू आहे. नॉटिंगॅन येथें चालू असलेल्या कॉलेजला जोडून सुमारें पंचेचाळीस एकर जमीन आहे. त्या ठिकाणीं शेतकरी शेतकीशास्त्र व शेतीस उपयुक्त असे अनेक धंदे शिकतात.

मी स्वतः पत्रासोबत इंपिंग्टन कॉलेजच्या १९५२–५३ सालच्या हिवाळी अधिवेशनाचें माहिती पत्रक पाठविलें आहे. तुम्हीं तें पत्रक पुरें वाचावें व आपल्या राज्यांत व देशांत याच तऱ्हेच्या संस्था स्थापन करतां येतील का याचा अवश्य विचार करावा.

आपला शुभेच्छु
बा. गं. खेर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

२. सोव्हिएट रशियामधील साक्षरतेची मोहीम

भारतामध्यें आज निरक्षरतेचें प्रमाण फार मोठें आहे. रशिया हा देश एकेकाळीं पुष्कळ बाबतींत भारतासारखाच होता. रशियांतसुद्धां झारच्या अमदानींत निरक्षरतेचें प्रमाण फार मोठें होतें. रशियामधील कांहीं भागांतून साक्षरतेचें प्रमाण शेंकडा ५ पेक्षां कमी होतें. १९१७ सालीं रशियामध्यें क्रांति झाली. झारच्या हातून सत्ता लोकांच्या हाती गेली. त्यानंतर साक्षरता प्रसाराची मोहीम जनतेच्या सरकारनें हातीं घेतली.

१९३२ सालीं रशियांतील कांहीं प्रांतांमध्यें ५० वर्षें वयाच्या खालच्या लोकांमध्यें एकही पुरुष किंवा स्त्री, निरक्षर नव्हती. १९४० सालीं सर्व देशांत ५० वर्षाखालीं एकही माणूस निरक्षर राहिला नाहीं. रशियाच्या उत्तरेकडील भागांत त्याचप्रमाणें आशिया खंडांत असणाऱ्या रशियन विभागांतसुद्धां साक्षरतेचें प्रमाण शें. ९५ वर गेले. कझागिस्तान म्हणून रशियांतील सर्वांत मागासलेला जो भाग होता, त्या ठिकाणीं पण साक्षरतेचें प्रमाण खूपच वाढलें. जे कांहीं निरक्षर होते ते ५० पेक्षां जास्त वयाचे होते व त्यांच्यामध्येंसुद्धां साक्षरतेचें प्रमाण शें. ७० वर गेलें.

रशियानें साक्षरताप्रसाराचें काम इतक्या थोडच्या वेळांत, इतक्या चांगल्या रीतीनें केलें कसें ? रशियानें केलेला प्रयोग आपण समजून घेतला पाहिजे. हा प्रयोग रशियानें पुढारलेल्या भागांत कसा केला व मागासलेल्या भागामध्यें कसा केला हें आपण पाहिलें पाहिजे.

रशियामध्यें १९१७ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत क्रांति झाली. १९२० सालीं रशियानें साक्षरताप्रसाराची पहिली मोहीम सुरू केली. त्यावेळीं गिरण्या–कारखान्यांतून साक्षरतेचे वर्ग सुरू झाले. त्यांना लाल कोपरे (Red Corners) म्हणत. ज्याप्रमाणें गिरण्यामधून काम सुरू झालें त्याचप्रमाणें शेतकऱ्यांसाठीं पण वर्ग काढण्यांत आले. कामगार व शेतकरी ह्यांचेच भाईबंद लष्करांत व तुरुंगात असतात; म्हणून ह्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दोन्हीं ठिकाणीं पण साक्षरतेचीं केंद्रें सुरू करण्यांत आलीं. ह्या मोहिमेंत प्रथम जर कोणी खूप मदत केली असेल तर ती रशियांतील तरुण मुलामुलींनीं केली. प्रारंभीच्या ह्या काळात ‘ निरक्षरतेला मूठमाती द्या. ’ ह्या नांवाची एक संस्था काढण्यांत आली. ह्या संस्थेनें साक्षरताप्रसाराच्या कार्याची योजना आंखली. ती योजना अमलांत आणण्याची जबाबदारी पण पत्करली. रशियातील जनतेचा प्यारा पुढारी कॉ. लेनिन ह्यांची पत्नी क्रूपस्काया हिनें आपलें उरलेलें सर्व आयुष्य ह्या कार्याला देण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें ह्या कामाची बरीचशी जबाबदारी तिनें उचलली. ह्या मोहिमेला लढाईचें स्वरूप देण्यांत आलें. मुलांच्या पलटणी तयार करण्यात आल्या. ज्या शिस्तीनें व दृढनिश्चयानें सैनिक आपली लढाई जिंकतात, तीच शिस्त व तोच दृढनिश्चय ह्या छोटया शिपायांमध्यें दिसून येत होता.

ही मोहीम ज्या वेळीं सुरू झाली, त्या वेळीं प्रौढांना शिकायला बसण्यासाठीं सोयीच्या जागा नव्हत्या. त्यांच्या हातांत देतां येतील अशीं क्रमिक पुस्तकें नव्हतीं. त्यावेळीं रशियाची आर्थिक परिस्थिति फारच गंभीर होती. म्हणून साक्षरता प्रसाराच्या कामासाठीं खर्चायला त्यांच्याजवळ पैसा नव्हता. बिन पैशानें त्यांना हें काम करावयाचें होतें. भारतामध्यें ह्या कामासाठीं पुढील दोन तीन वर्षांत दरसाल तीन कोटी रुपये खर्चले जाणार आहेत. रशियाजवळ ह्यावेळीं ह्या कामासाठीं कोणताही खर्च करायला पैसा नव्हता. ह्या सर्व संकटाशीं सामना देऊन आपली मोहीम पुढें रेटण्याचा मुलांनीं निश्चय केला होता. साक्षरतेचे वर्ग शाळांमधून अथवा ग्रामपंचायतीच्या कचेऱ्यांमधून चालवून जागेची अडचण दूर करण्यांत आली. मुलांनीं स्वतः मूळाक्षरें कागदावर कापून तयार केलीं. त्यांनीं स्वतःचीं क्रमिक पुस्तकें बनविलीं. पुस्तकासाठीं व पाटया–पेन्सिलीसाठीं लागणारा पैसा, मुलांनीं आपले मनोरंजनाचे कार्यक्रम बसवून मिळविला. सुरुवातीला ह्या प्रौढांच्या वर्गांत बायकाच खूप आल्या. ह्या बायकांचे वर्ग शाळांमध्यें सुरू करण्यांत आले. ह्याच शाळेंत त्यांचीं मुलेंही शिकत होतीं. ह्या मुलांनीं

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शाळेमध्यें वर्गनायक निवडलेले असत. हेच वर्गनायक, ह्चा प्रौढ वर्गां-तील बायांना शिकवीत होते.

ह्चा सर्व कामाची आंखणी फारच शास्त्रशुद्ध होती. ज्या विभागांत हे वर्ग सुरू व्हायचे असतील त्या विभागाची मुलें आधीं खानेसुमारी करीत. तेथील निरक्षरांचा नक्की आंकडा शोधून काढल्या-वर काम सुरू होई. निरक्षर प्रौढांची यादी तयार झाली कीं प्रौढांचा वर्ग निघे. प्रारंभीं प्रौढ वर्गांत नियमितपणें हजर राहत नसत. ही हजेरी टिकविण्यासाठीं मुलें नाना प्रकारच्या युक्त्या योजीत. कधीं कधीं तर मुलांना प्रौढांच्या घरीं जाऊन शिकवावें लागे. **रशियामध्यें लक्षावधि लोकांना लिहायला वाचायला शिकविण्याचें काम शाळा–कॉलेजांतील मुलामुलींनीं केलें.** शेतकऱ्यांच्या व कामगारांच्या वर्गांतून मुलें रोजच्या बातम्या प्रौढांना मोठ्यानें वाचून दाखवीत. त्याना सोपीं सोपीं पुस्तकें पण वाचून दाखवीत. ह्चा काळामध्यें शिकणाऱ्या, शिकविणाऱ्या मुलांमध्यें व गिरण्या–कारखान्यामध्यें साक्षरतेच्या कामाबाबत चढा-ओढी लागत.

साक्षरतेच्या मोहिमेंतील आघाडीवरील फौज मुलांची होती. हळूहळू ह्या मोहिमेंत स्थानिक शिक्षणाधिकारी भाग घेऊं लागले. ‘निरक्षरतेला मूठमाती द्या;’ ह्या संस्थेनें निरक्षर व अर्धसाक्षर लोकांच्या याद्या तयार केल्या. ह्या संस्थेनें प्रौढांच्या वर्गासाठीं जागा, साहित्य, पैसा व विनावेतन काम करणारे शिक्षक मिळविले. ह्या लोकांनीं साक्षरतेसाठीं जोरानें प्रचार चालविला. तसेंच शिकविणारे शिक्षक व शिकणारे प्रौढ ह्यांनीं नियमितपणें वर्गांत हजर राहावें म्हणून जरूर ते प्रयत्न केले. थोडक्यांत सांगायचें म्हणजे ह्या साक्षरताप्रसा-राच्या मोहिमेसाठीं योग्य असें वातावरण तयार करण्याचें काम ह्या संस्थेनें केलें. स्थानिक शिक्षणाधिकाऱ्यांनीं, शिक्षकांना ट्रेनिंग देण्याचें, पाठ्यपुस्तकें पुरविण्याचें, अभ्यासक्रम तयार करण्याचें व प्रौढांना शिक-विण्यासाठीं पाठ तयार करण्याचें काम केलें. त्यांनीं शिक्षकांना ह्या विषयींचा अभ्यास करण्यासाठीं अभ्यासिका तयार केल्या व आदर्श असे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रौढवर्ग चालविले. गिरण्या, कारखाने, ग्रामपंचायती ह्यांच्या चालकांना भेटून, निरक्षरांना साक्षर करण्यासाठीं व अर्धसाक्षरांना सुशिक्षित करण्यासाठीं त्यांची मदत मिळविली.

ही झाली सर्वसाधारण योजना; परंतु ही योजना आंखली गेली तरी खेडचांतून काम करायला स्वयंसेवक मिळेनात. तेथें स्वयंसेवक मिळाले नाहींत, तेथें पगारी नोकर नेमण्यांत आले. 'निरक्षरतेला मूठ-माती द्या;' ह्या संस्थेनें शिक्षणखात्याच्या व स्थानिक शिक्षणाधिकाऱ्यांच्या मदतीनें ट्रेनिंगचे वर्ग चालविले. ह्या वर्गामध्यें ७ वी पर्यंत शिकलेले लोक घेण्यांत आले. ह्या होतकरू शिक्षकासाठीं सेमिनार भरविण्यांत आल्या. जे लोक ट्रेंड होते त्यांनीं ह्या शिकाऊ शिक्षकांना ह्या सेमिनार मधून मार्गदर्शन केलें. असें इतरांना मार्गदर्शन करणें हें आपलें एक सामाजिक कर्तव्य आहे, असें हे ट्रेण्ड शिक्षक मानीत असत. ह्या सेमिनार मधून प्रौढांना शिकविण्याच्या पद्धति, त्यांच्यासाठीं पाठ तयार करणें, शिकविण्याचें साहित्य निर्माण करणें, इत्यादि बाबत नव्या शिक्षकांना भरपूर माहिती दिली जाई. ह्या सेमिनारमधून शिकविण्याचें काम करणाऱ्या शिक्षकांना पण प्रौढ शिक्षणाबाबत खास ट्रेनिंग दिलें जाई. इतकेंच नव्हे तर प्रौढ शिक्षणाबाबतचें सर्व शिक्षण विषयक साहित्य त्यांना उपलब्ध करून दिलें जाई. वर सांगितलेल्या संस्थेमार्फत वरचेवर प्रौढ-शिक्षण-क्षेत्रांत कार्य करणाऱ्या सर्व लोकांना एकत्र येऊन विचारविनिमय करतां यावा, म्हणून प्रौढशिक्षणाबाबत परिषदा भरविल्या जात.

निरक्षरतेविरुद्ध मोहीम ही सर्वत्र राष्ट्रीय चळवळ मानण्यांत आली. साक्षरतेच्या वर्गांत हजर न राहणें प्रौढांना जवळ जवळ अशक्य वाटूं लागलें. ज्यांनीं साक्षरतेच्या वर्गांत विशेष प्रगति दाखविली त्यांना बक्षिसें देण्यांत आली, ज्यांनीं ह्या वर्गांकडे दुर्लक्ष केलें अथवा वर्गांबाबत बेफिकीरी दाखविली त्यांना शिक्षा करण्यांत आल्या. गिरण्या कारखान्यांतून साक्षरता समित्या स्थापण्यांत आल्या. जे कामगार वर्गांत हजर राहत नसत, त्यांच्यासाठीं कारखान्यांत एक फळा ठेविला जाई.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

त्या फळ्यावर, 'ह्यानें आपल्या तोंडाला काळोखी फासली;' असें लिहिलेलें असे. जे लोक प्रौढांच्या वर्गांत हजर राहत नसत, त्यांचीं नांवें ह्या फळ्यावर लिहिलीं जात. जे लोक नियमितपणें वर्गांत हजर राहत; त्यांचीं नांवें वर्तमानपत्रांतून, इतर पत्रकांमधून छापलीं जात, अथवा तीं ठिकठिकाणीं फळ्यावर लिहिलीं जात. ह्या बाबतींत विशेष कष्ट घेणाऱ्यांना सिनेमाचीं, नाटकाचीं व इतर करमणुकीच्या कार्यक्रमाचीं तिकिटें मोफत दिलीं जात.

ह्या सर्व प्रयत्नाचें फळ रशियाला १९३२ पर्यंत मिळालें. यावर्षी रशियांतील निरक्षरता जवळ जवळ संपूर्णपणें नाहींशी झाली. यानंतर रशियांतील प्रौढ शिक्षण चळवळीनें आपला पवित्रा बदलला. आतां सर्व लोक साक्षर झाल्यामुळें त्यांची साक्षरता टिकविण्यासाठीं त्यांना अधिक शिक्षण देण्याचा कार्यक्रम हातीं घेण्यांत आला. प्राथमिक शाळेंतील दुसऱ्या ते चौथ्या इयत्तेपर्यंत जेवढें शिक्षण मुलांना मिळे, तेवढें शिक्षण प्रौढांना देण्यास सुरुवात झाली. याशिवाय प्रौढांना तांत्रिक शिक्षण देण्याची पण तरतूद करण्यांत आली. या मोहिमेंत पुढील संस्थांचा उपयोग करून घेण्यांत आला : तुरुंग, लष्कर, विश्वविद्यालयें, सर्व क्लब, शेतकऱ्यांच्या संस्था, म्युझियम वगैरे. त्याचप्रमाणें कामगारांच्या संस्था व संघटना, माध्यमिक शाळा ह्यांचा पण उपयोग करून घेण्यांत आला. ह्या संस्थांमार्फत कांहीं शिबिरें भरविण्यांत आलीं. ह्या शिबिरांमधून प्रौढांना, शैक्षणिक व शास्त्रीय माहिती देण्यांत आली. तसेंच त्यांच्यासाठीं नाटकें, गाणी इत्यादि सांस्कृतिक कार्यक्रम करण्यांत आले.

निरक्षता व अज्ञान ह्या विरुद्ध मागासलेल्या विभागांतून रशियानें जी मोहीम चालविली ती तर विशेष प्रशंसनीय होती. या मागासलेल्या लोकांच्या समजुती व कम्युनिस्टांचें तत्त्वज्ञान यामध्यें प्रचंड विरोध होता; परंतु त्यांचें जें सांस्कृतिक वैशिष्टच होतें त्याला राज्यकर्त्यांनीं धक्का लावला नाहीं. त्यांची भाषा व त्यांच्या चालीरूढी सांभाळण्याचा प्रयत्न करण्यांत आला. त्यांना शिक्षणही त्यांच्या प्रादेशिक भाषेंतून देण्यांत आलें.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ह्या मागासलेल्या विभागांत धर्मगुरूंचें व मुल्लांचें प्रस्थ मोठें होतें. ह्या लोकांचा, लोकांना शिक्षण देण्याला विरोध होता. येथें कामाला जी सुरुवात झाली ती अगदीं गरीब लोकांपासून. ह्या लोकांवर धर्म-गुरूंची पकड कमी होती. ह्या लोकांना साक्षर करून ग्रामपंचायती स्थापन करायला लावण्यांत आल्या. जनतेची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठीं सहकारी संस्था व सामुदायिक शेतीचा कार्यक्रम हातीं घेण्यांत आला होता. याप्रकारें शिक्षण व लोकांची आर्थिक सुधारणा याची सांगड घालण्यांत आली होती. शिक्षणामुळें आपली आर्थिक परिस्थिति सुधारेल या जाणीवेमुळें लोक शिकायला येऊं लागले.

बायकांमध्यें काम करणें महाकठीण होतें. सर्वसाधारणपणें स्त्रिया फारच मागासलेल्या होत्या. समाजांत त्यांना मानाचें स्थान पण नव्हतें. बायका पुरुषांना भिऊन राहत. रशियांतील साक्षरतेच्या मोहि-मेचें वैशिष्टच हे कीं, त्या मोहिमेमुळें स्त्रिया केवळ साक्षरच झाल्या नाहींत तर त्यांची भीतिपासून व भोळ्या समजुतीच्या वर्चस्वापासून कायमची मुक्तता झाली. या मागासलेल्या स्त्रियांत लोकशिक्षणाच्या कामाला प्रारंभ केला तरी कसा ? अशा मागासलेल्या विभागांतून जर तुम्हांला बायकांना शिकवायचें असेल तर त्याचें एकच प्रभावी तंत्र आहे. या बायकांच्या मुलांच्या आजारांबद्दल व त्यांच्या प्रकृतीबद्दल तुम्हीं बोलायला लागा. त्याबाबतींत त्यांना थोडी मदत करा. बायका आल्याच तुमच्या ताब्यांत. हेंच तंत्र रशियानें स्वीकारलें. चांगल्या शिकलेल्या रशियन बायांनीं ठिकठिकाणीं आरोग्य केंद्रें काढलीं, त्यांनाच जोडून साक्षरतेचे वर्ग सुरू केले. स्त्रियांमध्यें साक्षरतेचें काम करणाऱ्या बाय-कांना ‘ लोकशिक्षण सैनिक ’ या नांवानें ओळखलें जाई. या स्त्रियांना मागासलेल्या वर्गांतून काम करतांना खूप त्रास झाला, अशिक्षित बाय-कांच्या प्रतिगामी नवऱ्यांनीं त्यांना खूप छळलें, कांहीं बायकांचे खून पडले, परंतु हा विरोध थोडया वेळानें मंदावला व बायका साक्षरतेच्या वर्गांत येऊन शिकूं लागल्या.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

१९४० सालीं, वीस वर्षांच्या वर सांगितलेल्या प्रयत्नामुळें रशियांतील मागासलेल्या विभागांतील साक्षरता शें. ९५ वर आली. या बायका नुसत्याच साक्षर होऊन थांबल्या नाहींत, त्यांचें शिक्षण पुढें वाढीला लागलें, ज्या ठिकाणीं पूर्वीं शाळा नव्हत्या, त्या भागांत तांत्रिक शिक्षण पण मिळण्याची सोय झाली, त्या ठिकाणीं निरनिराळ्या शिक्षण संस्था जन्माला आल्या. या सर्व संस्थांचा उपयोग करून घेऊन रशियांतील प्रौढ स्त्रीपुरुषांनीं आपला शैक्षणिक दर्जा आज खूपच वाढविला.

रशियांतील हा प्रयोग भारतांतील लोकशिक्षण कार्यकर्त्यांनीं समजून घेतला पाहिजे. जें इतर देशांनीं केलें तें आपणांला करतां येईल, या प्रश्नाला इतर देशांनीं जें महत्त्वाचें स्थान दिलें तें आपण दिलें आहे का ?

ऑस्ट्रेलियाचें पत्र २

ता. १५–२–५२

आर्नाडस् गेस्ट हाऊस,
९९ पार्क स्ट्रीट,
साऊथईरॉ, मेलबोर्न, ऑस्ट्रेलिया.

सप्रेम नमस्कार वि. वि.——

येथील प्रौढशिक्षणाच्या प्रांतिक कचेरीला भेट दिली. सकाळीं ९ वाजल्यापासून १२ वाजेपर्यंत त्यांचे कार्यक्रम पाहिले व जरूर ती सर्व माहिती गोळा केली. आपण ज्याप्रमाणें प्रौढ येत नाहींत अशी तक्रार करतों त्याप्रमाणें हे लोक पण तक्रार करतात. ज्यांना खरोखर प्रौढ शिक्षणाची गरज आहे ते कामगार व तशा दर्जाचे लोक वर्गांना यायला फार नाखूष असतात. ते विचारतात, शिकलों तर आम्हांला त्यापासून काय मिळणार? संध्याकाळच्या वेळेला वर्गांत येऊन बसण्यापेक्षां इतर गोष्टी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

करणें त्यांना जास्त बरें वाटतें. त्यामुळें ह्या लोकांना शिक्षण देण्याचा सरकारनें नवीनच मार्ग शोधून काढला आहे. लोकांना करमणूक हवी व म्हणून करमणुकीच्या मार्फत शिक्षण देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. यांना निरनिराळे बोलपट दाखविण्यांत येतात. त्याकरितां एक स्वतंत्र खातेंच आहे. तेथें पण आम्हीं एक दिवस घालविला. चांगल्या फिल्मस् लोक पाहतात. पण लोकांना फिल्मस्पेक्षां नाटकें फार आवडतात. म्हणून येथील समिति चांगल्या चांगल्या नाटक कंपन्यांशीं करार करून त्यांचे खेळ ठिकठिकाणीं करविते. हीं नाटकें कधीं ऐतिहासिक, कधीं सामाजिक असतात. अशीं चांगल्या प्रकारचीं एक दोन नाटकें लोकांना दाखवलीं म्हणजे त्या लोकांना त्यांचें स्वतःचें नाटचमंडळ स्थापन करायला उत्तेजन देण्यांत येतें. आपल्या गांवांत नाटक करायचें आहे. तें आपणाला करायचें आहे असें लोकांना एकदां पटवून दिलें कीं, लोक नाटकाच्या पाठीमागें लागतात. एक नाटचमंडळ ते स्थापन करतात. मग नाटक कोणतें करायचें त्याचा ते विचार करूं लागतात. मग समितीचा ते सल्ला घेतात. समितीमार्फत त्यांना कांहीं नाटकाचीं पुस्तकें पाठविण्यांत येतात व लोक तीं पुस्तकें वाचून काढतात. लोक मागतील तितक्या एका पुस्तकाच्या प्रती ३०–४० पर्यंत त्यांना पाठविण्यांत येतात. कोणाचें पत्र आलें कीं त्यांना सभासदत्वाचा एक फॉर्म पाठविला जातो व मग त्यांना पुस्तकाची पेटी पाठविण्यांत येते. स्थानिक कार्यकर्ता त्यांना याबाबत मार्गदर्शन करतो व मग सर्व मिळून एखादें नाटक करायचें ठरवितात व त्याच्या तालमी सुरू होतात व त्यामुळें गांवांत प्रौढ शिक्षणाचें कार्य होतें. एकदां लोक जमले कीं, त्यांपैकीं नाटकांत ज्यांना काम नाहीं त्यांना वाचायला इतर पुस्तकें हवीं असल्यास तीं मागवून देण्यांत येतात. लोकांना पुस्तकें वाचावयाचीं नसल्यास त्यांना ग्रामोफोनवर गाणीं ऐकविण्यांत येतात. गाण्याच्या रेकॉर्ड पण समितीमार्फत पाठविण्यांत येतात. लायब्ररी म्हणजे पुस्तकें डोळ्यासमोर येतात. पण, येथें फिल्म व रेकॉर्ड यांच्या पण लायब्ऱ्या आहेत. येथील लोकांना गाणीं व नाटकें फार आवडतात. त्यामुळें गाणें

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ऐकायला, गाणें शिकायला पुष्कळ लोक तयार असल्यानें नाटकांना अधिक गर्दी असते. आम्हीं या समितीनें बसविलेल्या एका नाटकाला गेलों होतों. नाटक जरी प्रौढांकरितां होतें तरी पुष्कळ चांगलीं चांगलीं माणसें नाटकाला आलीं होतीं. कारण नाटक फार चांगलें बसविलें होतें व तें फार उत्कृष्ट वठलें. हीं जीं नाटकें केलीं जातात त्या नाटकांत कांहीं विशेष प्रश्न हाताळला गेला पाहिजे अशी मुळींच अपेक्षा नसते. लोकांची करमणूक करणें व करमणुकीच्या निमित्तानें लोकांना एके ठिकाणीं आणणें हा प्रधान हेतु असतो. आम्हांला असें सांगण्यांत आलें कीं, ज्या ठिकाणीं नाटकांचे चांगले कार्यक्रम झाले, त्या ठिकाणीं नाटच-मंडळ स्थापन होऊन स्थानिक लोक नाटकें तर करूं लागलेच; पण त्यापेक्षां त्या ठिकाणीं नाटकाच्या पुस्तकांचें वाचन चांगल्या रीतीनें सुरूं झालें आहे. म्हणजे लोक जास्त प्रमाणांत नाटकाचीं पुस्तकें वाचूं लागले आहेतच, पण त्याच्याही पुढें जाऊन नाटकाच्या पुस्तकावर चर्चा करूं लागले आहेत. त्यामुळें त्या ठिकाणीं चर्चामंडळें सुरू होऊं लागलीं आहेत. खेडयांमध्यें चर्चामंडळ स्थापन व्हायला अडचण पडते. त्याच-प्रमाणें कामगार विभागांत वगैरे लोक प्रारंभीं यायला तयार होत नाहींत. पण वर सांगितल्याप्रमाणें नाटकाचा उपयोग चर्चामंडळ स्थापन करण्याला होऊं शकतो. शिकायला या म्हटलें तर लोक येत नाहींत, पण लोकांना हवें तें जर आपण त्यांना दिलें तर लोक कसे खेचले जातात हें यावरून दिसून येईल. मला वाटतें आपण ह्या नाटकाचा व नाटचप्रवेशांचा कसा उपयोग करून घ्यायचा तें ठरवूं. या व एखाद्या गांवीं नमुन्यादाखल नाटचमंडळ स्थापन करून पाहूं या. प्रौढ शिक्ष-णाच्या येथील इतर कामाबद्दल पुढें लिहूं.

आपला,

वा. ब. कर्णिक

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

डेन्मार्कचें पत्र २ रें

लोकशाळा

इन्टर नॅशनल पीपल्स कॉलेज,
एल्सिनोर, डेन्मार्क
ता. १९–७–१९४५

आज येथें येऊन जवळ जवळ दीड महिना झाला. ह्या दीड महिन्यांत येथील प्रौढ शिक्षणाच्या चळवळीची खूप माहिती मिळविली. डेन्मार्कमध्यें लोक–शाळा (Folk-Schools) व रात्रीच्या शाळा (Evening Schools) ह्यांच्या मार्फत प्रौढांना शिक्षण दिलें जातें. आम्हीं पांच सहा 'लोक–शाळा' पाहिल्या. रात्रीच्या शाळेंत शिकविणाऱ्या शिक्षकांचा एक ट्रेनिंग कोर्स पाहिला. येथील शिक्षकांच्या बरोबर चर्चा केली. त्यांच्याबरोबर जेवलों. आजच्या पत्रांतून ह्या लोकशाळांची तोंड ओळख करून देणार आहें. ह्या विषयावर सविस्तर पुढें लिहीन. डेन्मार्कमध्यें आज प्रगति झाली आहे, त्याचें सारें श्रेय येथील प्रौढशिक्षणाच्या चळवळीला–लोकशाळांना देण्यांत येतें. ही माहिती उपयोगी वाटेल अशी आशा आहे.

ही 'लोकशाळांची' मूळ कल्पना मिस्टर एन्. एफ्. ग्रुंड्ट्विग ह्यांची आहे. हा एक मोठा कवि, साहित्यकार, शिक्षणशास्त्रज्ञ व तत्त्वज्ञानी होता. तो बिशप ग्रुंड्ट्विग ह्या नांवानें प्रसिद्ध होता; परंतु आज त्याला 'लोकशाळांचा जनक' म्हणून ओळखलें जातें. ग्रुंड्ट्विग हा १७८३ मध्यें जन्मला व १८७२ मध्यें मरण पावला.

डेन्मार्कमधील पहिली 'लोकशाळा' १८४४ सालीं स्थापन झाली. ह्यावेळीं डेन्मार्कमधील परिस्थिति फारच चमत्कारिक होती. १८ व्या शतकाच्या शेवटीं शेतकऱ्यांची स्थिति सुधारली होती. जमिनीबाबत कांहीं चांगले कायदे करण्यांत आले होते. शेतकरी गुलामगिरींतून सुटला होता. त्याच्या हातीं दोन पैसे खेळत होते. गुलामगिरी संपली

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

होती; वेठ–बिगार बंद झाली होती. जमीन कसणारे मजूर जमिनीचे मालक झाले होते, लोक आपल्या मगदुराप्रमाणें जमीन कसूं लागले; माल परदेशी जाऊं लागला. मालाला किंमत येऊं लागली. शेतकरी श्रीमंत झाला. सबंध देशाची भरभराट झाली.

युरोपचा इतिहास पाहिला तर १८३० सालीं जुलै महिन्यांत फ्रान्समध्यें राज्यक्रांति झाली. याचा परिणाम साऱ्या युरोपवर झाला. डेन्मार्कचे दिवस फिरले. इंग्लंडनें कोपनहेगनवर स्वारी केली. सात वर्षें लढाई चालली होती. देशाची धूळधाण झाली. आलेल्या संकटांना तोंड देण्यास लोकांमध्यें त्राण राहिला नाहीं. लोक हवालदील झाले. जो तो आळशासारखा स्वस्थ बसूं लागला. पोट भरण्याच्या चिंतेनें सारे व्याकूळ होऊं लागले. युद्धामुळें त्यांचें धैर्य खचलें होतें. कोणत्याही नव्या कामाला हात घालण्याचा उत्साह किंवा हिम्मत त्यांच्याजवळ शिल्लक राहिली नव्हती. जे थोडेबहुत धडपडे लोक होते ते आपला वेळ दारू-बाजींत व चैनींत घालवूं लागले. डेन्मार्कची चिता भडकत असतांना ज्यांना चैन सुचली त्याचा ग्रुंड्ट्विगनें कडक शब्दांत धिक्कार केला.

ह्या दुःखांत आणखी एक भर पडली. चारशें वर्षें डेन्मार्कशीं एकरूप झालेला नॉर्वे देश डेन्मार्कपासून निराळा झाला. त्यामुळें आधींच मंदीच्या खाईंत पडलेल्या डेन्मार्कवर प्रेतकळा पसरली. एकाद्या वादळांत सांपडलेल्या एका मोठ्या महासागरांतील छोट्या बेटासारखी डेन्मार्कची परिस्थिति झाली. आणखी जर एकादें वादळ झालें, तर ह्या उसळणाऱ्या लाटा हें बेट गिळंकृत करून टाकतील, अशी धास्ती वाटूं लागली. आणखी एकादें संकट आलें तर डेन्मार्क जिवंत पण रहाणार नाहीं, अशी लोकांची खात्री झाली. अशा या हीन दीन झालेल्या लोकांना उद्देशून एकाद्या भविष्यवाद्याप्रमाणें ग्रुंड्ट्विगनें पुढील उद्गार काढले. ‘ लोकहो ! आपला शोक आवरा. आनंदी रहा. परमेश्वराचा तुम्हांला हुकूम आहे कीं, तुम्ही आनंदांत राहिलें पाहिजे. ’

ह्यावेळीं ग्रुंड्ट्विगला एक नवा दृष्टांत झाला. ज्या लोकांचें धैर्य खचलें आहे, ज्यांचा जिवंतपणा नाहींसा झाला आहे त्यांच्यामध्यें जर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जागृति करावयाची असेल तर ती पुस्तकानें–लिहिण्यावाचण्यामार्फत होणार नाहीं. ' जिवंत शब्द ' त्यांना खडबडून जागें करतील. त्यांच्या मातृभाषेंतून त्यांच्याशीं बोललें पाहिजे. त्यांच्या वाडवडिलांचे पराक्रम सोप्या भाषेंत त्यांना सांगितले पाहिजेत. कामाला सुरुवात तरुणापासून केली पाहिजे. तरुणच उद्यांचे पुढारी आहेत. लोकांना मनमोकळे करायला वाव दिला पाहिजे. त्यांच्या मातृभाषेंतून त्यांना आपल्या मनांतील भाव व्यक्त करतां येतील. येथूनच लोकशाळांच्या कल्पनेचा जन्म झाला.

पहिली लोकशाळा १८४४ सालीं स्थापन झाली, हें वर सांगितलेंच आहे. ह्यानंतर जसजसे दिवस जाऊं लागले, तसतशी ह्या शाळांची संख्या वाढूं लागली. ह्या शाळांतील विद्यार्थी बहुतेक खेडयांतूनच येतात. दहा ते पंधरा टक्के विद्यार्थी शहरांतील असतात. आज ह्या शाळांतून भाषा, भूगोल, यासारखे शाळांतून शिकविले जाणारे विषय शिकविले जातात, पण खरी भिस्त लोकांना स्वतःचे व देशाचे प्रश्न समजावून देण्यावर असते. कांहीं शाळांतून इतिहास, भाषा हे विषय शिकविले जातात. पुरुषांना शेतीविषयक शिक्षण दिलें जातें. स्त्रियांना त्यांच्या जीवनांत उपयोगी पडणारे विषय शिकविले जातात. व्यायामाच्या शिक्षणावर फारच भर दिला जातो. ह्या शाळांतून बाहेर पडणारीं मुलें व मुली गांवीं गेल्यावर तेथील मुलांचे पुढारी बनतात. मुलांना एके ठिकाणीं आणण्याचें मुख्य साधन म्हणजे खेळ व व्यायाम. ह्या दृष्टीनें लोकशाळांतील विद्यार्थी व्यायामाचें शिक्षण घेतात.

ह्या लोकशाळांत, अठरा वर्षें वयाच्या खालील विद्यार्थ्यांना घेण्यांत येत नाहीं. कारण त्यांच्यामध्यें जबाबदारीची जाणीव पुरेशी झालेली नसते. ज्यांची वाढ पूर्ण झालेली नाहीं अशांना शिक्षण देणें योग्य नाहीं. त्यांच्यासाठीं निराळी व्यवस्था केली पाहिजे असें ग्रुंड्ट्विगचें मत होतें. ह्या शाळा हिवाळयांत पांच महिने चालतात. त्यावेळीं पुरुष शिक्षण घेतात. ह्या काळांत शेतकऱ्यांना शेतीचें काम कमी असतें. उन्हाळयांत शाळा तीन महिने चालतात व त्यावेळीं स्त्रिया शिक्षण घेतात. आज आम्ही उन्हाळयांत डेन्मार्कमध्यें आहोंत म्हणून आम्हाला स्त्रियांच्याच

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शाळा पाहायला मिळतात. ह्या सर्व विद्यार्थ्यांना शाळेंतच रहावें लागतें. एक महिन्याला १४० ते १५० क्रोनर (अंदाजें १०० रुपये) प्रत्येक विद्यार्थ्याला फी द्यावी लागते. या फीखेरीज ह्या शाळांना सरकारी मदत मिळते. ज्या विद्यार्थ्यांना फी देतां येत नाहीं त्यांना सरकार मदत करतें. ह्या शाळांतून विद्यार्थ्यांना शेतीविषयक व सहकारी चळवळीविषयक सर्व माहिती मिळते. डेन्मार्कमध्यें सहकारी चळवळीचें जाळें पसरलेलें आहे. ही माहिती घेऊन शेतकरी बाहेर पडतात व आपल्या शिक्षणाचा ते उपयोग करतात. जीवन व शिक्षण याचें इतकें चांगलें साहचर्य कोठेंच पहावयास मिळणार नाहीं. आज डेन्मार्कमधील एक तृतीयांश लोकानीं कधीं ना कधीं तरी, 'लोकशाळेंत' शिक्षण घेतलेलें आहे. याशिवाय केवळ शेतीचें शिक्षण देणाऱ्या शाळा आहेतच. १९४८ सालीं अशा ५५ लोकशाळा होत्या. त्यांतून ३००० पुरुषानीं व ४३०० स्त्रियांनीं शिक्षण घेतलें. सरकारनें ५३०० विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठीं पैशांची मदत केली. यावर्षीं अशा शाळांना एकूण सरकारी मदत १७,००,००० क्रोनर (११॥ लाख रुपये) देण्यांत आली. आज देखील या शाळांचें काम जोरांत चालू आहे.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

१५. शाळांना समुदायकेंद्र कसें बनवितां येईल ?

सध्यांच्या आपल्या देशाच्या परिस्थितींत, आमच्या देशांतील प्रौढ–शिक्षणाचें ध्येय, 'प्रौढांचें जीवन अधिक सुखी व समृद्ध व्हावें व त्यांनीं उगवत्या लोकशाहीचें शिस्तबद्ध नागरिक व्हावें' हें आहे. हें ध्येय जर साध्य व्हायचें असेल तर आमच्या जनतेचे फार दीर्घ कालीन मित्र – अज्ञान, दारिद्रय व रोगराई – ह्यांची कायमची हकालपट्टी करण्याचा एखादा योजनाबद्ध कार्यक्रम आंखणें जरुरीचें आहे. येथील राबणाऱ्या जनतेची सर्वांगीण सुधारणा घडवून आणण्यासाठींच, सरकारनें पंचवार्षिक योजना आंखायला आरंभ केला आहे.

ह्या बाबतींत असा अनुभव येतो कीं ग्रामीण पुनर्रचनेचा कोणताही कार्यक्रम जर यशस्वी व्हायचा असेल तर त्यासाठीं जनतेचें संपूर्ण सहकार्य मिळणें जरूर आहे. ह्या प्रकारचा कोणताही कार्यक्रम जनतेवर लादणें इष्ट होणार नाहीं. आपल्या वैयक्तिक व सामाजिक उन्नतीसाठीं लोकांनींच प्रयत्न केले पाहिजेत. गेलीं कित्येक वर्षें दुःख सहन करण्याची संवय लोकांच्या हाडींमासीं इतकी खिळून बसली आहे कीं, 'ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें । चित्तीं असो द्यावें समाधान ।' ह्या वृत्तीनें लोक कोणताही प्रतिकार न करतां, दुःख सहन करीत बसले आहेत. लोकांची ही नशिबावर हवाला ठेवून स्वस्थ बसून राहण्याची प्रवृत्ति फार घातुक आहे. आमच्या देशांतील प्रौढ–शिक्षण कार्यकर्त्यांचें पहिलें कर्तव्य, जनतेमध्यें वाढणाऱ्या ह्या निराशापूर्ण प्रवृत्तीला आळा घालणें व लोकांना आपल्या गरजा व उणीवा ह्यांची जाणीव करून देणें व त्या दूर करण्यासाठीं लागणारी ताकद आपल्याजवळ आहे अशी खात्री लोकांमध्यें उत्पन्न करणें हें आहे. आपलें जीवन सुखी व समृद्ध व्हावें अशी उत्कंठा लोकांमध्यें उत्पन्न करणें, हें आजचें महत्त्वाचें काम आहे. आपण प्रयत्न केला तर आपली परिस्थिति आपण बदलूं शकूं असा आत्मविश्वास लोकांमध्यें उत्पन्न झाला पाहिजे. आपणांवर राजकीय गुलामगिरी जेव्हां लादलेली होती, तेव्हां जें कांहीं करावयाचें तें सरकारनें करावयाचें हा

•••७•••

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सिद्धांत आपल्या पचनीं पडला होता. आज स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर सुद्धां ही परावलंबी प्रवृत्ति जनतेमध्यें रेंगाळलेली दिसते. ही प्रवृत्ति नष्ट करून, जर लोकांमध्यें आत्मविश्वास निर्माण करावयाचा असेल, तर त्यासाठीं ग्रामीण पुनर्रचनेचा योजनाबद्ध कार्यक्रम हातीं घेण्याची गरज आहे.

आमच्या देशांतील जनतेच्या उपयोगी पडणारे कार्यक्रम जर यशस्वी व्हायचे असतील, तर त्यासाठीं जनतेचीच मदत मिळवावी लागेल. ह्या बाबतींत खेड्यापाड्यांतून हिंडतांना असा अनुभव येतो कीं, आज सरकारच्या अथवा समाजसेवकांच्या पुढारीपणाखालीं, ग्रामीण पुनर्रचनेच्या ज्या ज्या योजना आंखल्या जात आहेत, त्या योजनांबाबत बहुसंख्य ग्रामीण लोकांना मुळींच आपलेपणा वाटत नाहीं. वैफल्य व निराशावादाच्या पकडींत लोक सांपडलेले आहेत. ते अगदीं हवालदील झाले आहेत, त्यामुळें त्यांच्यामध्यें एकांडेपणा फार मोठ्या प्रमाणांत वाढीला लागलेला आहे. जगांतील निरनिराळ्या देशांतील लोकांमध्यें, ही एकांडेपणाची प्रवृत्ति, दुसऱ्या महायुद्धानंतर तर विशेषच वाढीला लागल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. भांडवलशाही स्पर्धेमुळें उत्पन्न होणाऱ्या युद्धांत, बहुजनसमाज इच्छेविरुद्ध खेंचला जातो. त्यामुळें त्यांच्यामध्यें हीनत्वाची भावना वाढीला लागते. ह्या जगांत आपण क्षुद्र आहोंत असें लोकांना वाटतें. 'जें जग निर्माण करण्यांत माझा कोणताही वांटा नाहीं अशा ह्या अफाट जगांत मी आज एकटा व अगदीं परका आहें,' असें सर्वसाधारण माणसाला वाटूं लागलें आहे.

लोकांमध्यें वाढणाऱ्या ह्या एकांडेपणाच्या प्रवृत्तीला आळा घालण्याचें काम समुदायकेंद्रेंच करूं शकतील. ह्या केंद्रांमुळें लोकांना एके ठिकाणीं येऊन आपला कांहीं काळ योग्य अशा वातावरणांत घालविण्याची संधि मिळेल. ह्यामुळें ग्रामीण जनतेमध्यें ऐक्याची भावना वाढीला लागेल. समुदायकेंद्र हें केवळ लोकांच्या करमणुकीचें स्थान नाहीं. एखादा क्लब अथवा देऊळ ह्यापेक्षां समुदायकेंद्राचें स्वरूप फारच भिन्न आहे. **समुदायकेंद्राचें खरें काम, एका विशिष्ट भौगोलिक परिसरांत**

...

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

राहणाऱ्या लोकांना एकत्र आणून त्यांना समाजाच्या कल्याणासाठीं कार्य करायला प्रवृत्त करणें हें आहे. लोकांनीं रोज ह्या ठिकाणीं जमून आपल्या तात्कालिक गरजा पुऱ्या पाडण्यासाठीं कोणत्या योजना आंखाव्यात; ह्याची चर्चा करावी. त्या योजना यशस्वीपणें पार पाडण्यासाठीं सहकारी पद्धतीनें काम करायला तयार व्हावें. ह्यासाठीं हीं समुदायकेंद्रें चालविलीं गेलीं पाहिजेत.

ह्या केद्रांसाठींच चांगल्या शिक्षकांची गरज भासते. अनुभव असा आहे कीं, बहुसंख्य खेड्यांतून शिक्षक हा एकटाच शिक्षित असतो. सर्व खेड्याला मार्गदर्शन तोच करूं शकतो. खेड्याचा तो पुढारी होऊं शकतो. ग्रामीण जनता व सरकारी अधिकारी ह्यांचे संबंध जुळवून आणणारा महत्त्वाचा दुवा म्हणजे खेड्यांतील शिक्षक. ग्रामीण जनतेला जी जी नवी माहिती लागेल ती ती तिच्यापर्यंत पोहोंचविण्याचें काम खेड्यांतील शाळाच करूं शकतील. ग्रामीण जनतेसाठीं तेथील लोकांनींच चालविलेल्या ग्रामसंघटनेच्या व ग्रामीण पुनर्रचनेच्या सर्व कार्यक्रमांत तेथील शाळांतील शिक्षक व त्यांचे विद्यार्थी फार महत्त्वाचा भाग घेऊं शकतील.

शिक्षणक्षेत्रांत काम करणाऱ्या कांहीं विचारवंतांना मात्र वरील विचारसरणी मान्य नाहीं. त्यांना वाटतें कीं शाळांबाबतच्या आपल्या अपेक्षा आज अवास्तव प्रमाणांत वाढूं लागल्या आहेत. त्यांना प्रामाणिकपणें असें वाटतें कीं ह्या सर्व सामाजिक चळवळींत शाळांनीं गुरफटलें जाऊं नये; त्यांनीं त्यापासून पूर्णपणें अलिप्त रहावें. आपल्या चार भिंतींत येणाऱ्या मुलांना चार विषय शिकविणें एवढेंच शाळांचें काम, असें ह्या लोकांना वाटतें. शाळांनीं राजकारणाच्या बाबतींत नव्हे तर जनतेनें चालविलेल्या कोणत्याही चळवळीबाबत पूर्णत: अलिप्त राहिलें पाहिजे. त्यांच्या मतें सर्वसाधारणपणें लोकांना 'जैसे थे' हें धोरण आवडतें व हें धोरण बदलण्याचा जर शिक्षकानें प्रयत्न केला तर त्याला जनतेचा रोष सहन करावा लागतो. त्यामुळें चाललें आहे तें चालूं द्या ह्या वृत्तीनें जवळजवळ बेपर्वाई वृत्तीनें हे लोक वागतात. शिक्षणक्षेत्रांत

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

असा पण एक वर्ग आढळतो कीं, ज्यांना जनतेच्या चळवळींत लक्ष घालावें असें मनापासून वाटतें. जर त्या चळवळीमुळें लोकांमध्यें फूट पडून त्याचा शाळेवर विपरित परिणाम होणार नसेल तर असल्या चळवळीमध्यें भाग घ्यायला हे लोक तयार असतात.

स्वातंत्र्यपूर्व काळांत मात्र आपल्या बहुसंख्य शाळा 'आपण बरें, आपलें काम बरें,' ह्या वृत्तीनें वागत. जनतेच्या गरजा, त्यांच्या आशा-आकांक्षा ह्यांकडे ह्या शाळांनीं मुळींच लक्ष पुरविलें नाहीं. ह्या शाळांनीं ५०-६० वर्षें ज्या ठिकाणीं काम केलें त्या जागेच्या सभोंवतालीं राहाणारी जनता अज्ञानांधःकारांत खितपत पडली असतांनासुद्धां, ह्या संस्थांचें त्यांच्याकडे मुळींच लक्ष गेलें नाहीं व त्यामुळें त्यांचें अज्ञान दूर करण्याच्या कामीं त्यांचें जरासुद्धां सहाय्य झालें नाहीं. ह्या आपल्या शेजाऱ्यांसाठीं आपण कांहींतरी केलें पाहिजे ही जाणीव येथें कार्य करणाऱ्यांना असल्याचें त्यांनीं दाखविलें नाहीं. भोंवतालची जनता दारिद्र्य व अज्ञान यांत सारखी होरपळली जात होती त्यावेळीं नीरोप्रमाणें हे आपल्याच कामांत गुंग होते. आपल्या संस्थेंत हें ज्ञानाचें मोठें दीप पेटविण्यांत गुंतलें होतें. परंतु भोंवतालच्या झोंपडयांत ज्ञानाची साधी पणती पेटविण्याची ह्यांना कधींसुद्धां गरज वाटली नाहीं.

ह्या सर्व शाळांचें लक्ष मुलांना कांहीं विषय शिकवून त्यांच्या बुद्धीची वाढ करण्याकडे लागलें होतें. मुलांच्या बुद्धीचा विकास साधणें, हेंच त्यावेळीं शिक्षणाचें ध्येय होतें. पुढें शिक्षणाचें ध्येय अधिक अधिक व्यापक झालें. मुलांच्या बुद्धीबरोबर त्यांच्या शरिराचा पण विकास व्हावा, असें ध्येय निश्चित करण्यांत आलें व त्यामुळें शारीरिक शिक्षणासारख्या विषयांचा अभ्यासक्रमांत समावेश करण्यांत आला. शाळांमधून पुढें हस्तव्यवसाय शिकविण्यास सुरुवात झाली व मुलांच्या हातांचा पण विकास झाला पाहिजे, हें तत्त्व मान्य करण्यांत आलें. शिक्षणाची आज जी नवी व्याख्या संमत झाली आहे, त्या व्याख्येनें शिक्षणाचें ध्येय मुलांचें डोकें, हात, हृदय इत्यादींचा विकास करणें, असें ठरलें आहे. शिक्षणाचें ध्येय दिवसेंदिवस जरी व्यापक होत चाललें असलें तरी शिक्षणाचा

head hand heart
health चारपात

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

विचार केला जात असतांना, ज्या वातावरणांत शाळकरी मुलें वावरतात, तें वातावरण बदलण्याचा व शिक्षणाचा कांहीं संबंध आहे ही गोष्ट अजूनसुद्धां फार थोडे लोक लक्षांत घेतात.

गेल्या महायुद्धापासून शिक्षणाबाबतच्या दृष्टिकोनांत फार महत्त्वाचा फेरबदल झाला आहे. मुलांना आपण जें शिक्षण देतों तें केवळ त्यांच्या वैयक्तिक विकासासाठीं देत नाहीं. आज शिक्षणाचें उद्दिष्ट, मुलांना उगवत्या लोकशाहीचे जबाबदार नागरिक बनविणें हें आहे. तें जर सिद्धीस जावयाचें असेल तर शाळांसभोंवतीं वावरणाऱ्या जनतेशीं प्रेमाचे संबंध स्थापले जावेत. त्यासाठीं मुलांच्या पुढें योग्य ते कार्यक्रम ठेवून त्यांना जरूर अशी संधि दिली पाहिजे.

ग्रामीण शाळांच्या ह्या नव्या कार्यक्षेत्रांची व त्यांच्या कार्यक्षमतेची सुस्पष्ट कल्पना, महात्मा गांधीजींना होती. आपली वर्धा शिक्षण योजना जनतेपुढें मांडतांना ते म्हणाले, " खेड्यांतील सर्व चळवळी शाळेभोंवतीं केंद्रित झाल्या पाहिजेत व खेड्यांतील सर्व चळवळीचें स्फूर्तिस्थान, त्या गांवाचा शिक्षक बनला पाहिजे. खेड्यांतील शिक्षक हा त्यांच्या शाळेंतील चार भिंतींत येणाऱ्या मुलांचाच शिक्षक राहतां कामा नये, तर तो त्या गांवांतील सर्व लोकांचा मित्र, मार्गदर्शक व उपदेशक बनला पाहिजे."

गांधीजींची वरील विचारसरणी, आजच्या कांहीं शिक्षणतज्ज्ञांना संपूर्ण मान्य आहे. त्यांच्या मतें आजच्या शिक्षणसंस्था एकांडेपणाच्या आजारानें व्यथित झालेल्या आहेत. ग्रामीण जनतेच्या जीवनांत ह्या शिक्षणसंस्थांना स्थान राहिलेलें नाहीं. ही परिस्थिति अत्यंत घातक आहे. त्यांच्या मतें, आजच्या शिक्षणसंस्थांची जर प्रगति व्हावयाची असेल तर त्यांनीं जनतेचा पूर्ण पाठिंबा व भरपूर सहकार्य मिळविलें पाहिजे. त्यांना असेंही वाटतें कीं, खेड्यांतील जनतेनें ग्रामीण पुनर्रचनेचे कोणतेही कार्यक्रम आंखले तरी स्थानिक शिक्षणसंस्थेला त्या कार्यक्रमांत महत्त्वाचें स्थान दिलें पाहिजे. ह्या शिक्षणसंस्थांना डावलून, हे ग्रामीण पुनर्रचनेचे कार्यक्रम यशस्वी होणार नाहींत.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शाळा व समाज एकमेकांपासून अलग राहूं शकत नाहींत. त्यांचें परस्परावलंबित्व, नव्या काळांतील शिक्षणतज्ज्ञांनीं मान्य केलें आहे. ह्यामुळेंच आजची शाळा ही केवळ शाळाच न राहतां तिचें रूपांतर समुदायकेंद्रामध्यें व्हावें, हें तत्त्व आज सरकारनें पण मान्य केलें आहे. शाळांची ही नवी पण सुप्त ताकद ओळखूनच मध्यवर्ति शिक्षणखात्यानें प्रादेशिक सरकारच्या कांहीं निवडक शाळांची समुदायकेंद्रांत रूपांतर करण्यासाठीं निवड करण्याची सूचना केली आहे. ह्या शाळांच्या नित्य खर्चावर होणाऱ्या खर्चापैकीं ५० टक्के खर्च व नैमित्तिक खर्चापैकीं ५५ टक्के खर्च, मध्यवर्ति सरकारनें सोसण्याचें अभिवचन दिलें आहे. भारत सरकारच्या ह्या मदतीच्या आश्वासनामुळें, कांहीं शाळांचें रूपांतर समुदायकेंद्रांमध्यें करण्याला सुरुवात झाली आहे.

ह्यांपैकीं पुष्कळ संस्थांचें कार्य अपेक्षेप्रमाणें चालत नाहीं असें समजतें. ह्याचें कारण म्हणजे लायक माणसांचा अभाव. ह्या शाळांसाठीं विशिष्ट प्रकारचा शिक्षक लागणार. त्या शिक्षकाजवळ समाजसेवा करण्याची वृत्ति असायला पाहिजे. लोकांशीं मिळून मिसळून त्यांच्याशीं जिव्हाळ्याचे संबंध स्थापन करण्याची हातोटी त्याच्याजवळ असायला पाहिजे. चांगल्या उत्साही व कर्तबगार शिक्षकांचें लक्ष ह्या शाळांकडे जावें व त्यांनीं तें काम अत्यंत आपुलकीनें व लक्ष लावून करावें म्हणून अशा शिक्षकांना योग्य तें वेतन व जरूर त्या सवलती दिल्या पाहिजेत. ह्याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ह्या ठिकाणीं काम करणाऱ्या लोकांना आपल्या कार्याची सुस्पष्ट कल्पना यावी व शिक्षणाचा नवा दृष्टिकोन त्यांना नीट समजावा म्हणून त्यांच्यासाठीं अध्यापनाचे वर्ग चालवावेत. ह्या वर्गांमुळें समाजाची आपल्या बाबतची काय अपेक्षा आहे ह्यांची त्या शिक्षकांना चांगली कल्पना येईल व त्या अपेक्षा पार पाडण्यासाठीं ते जरूर ती मेहनत घेतील.

समुदायकेंद्र म्हणून शाळा काम करूं लागल्या कीं पुढील गोष्टीं-कडे त्यांना लक्ष द्यावें लागेल.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

(१) शाळेसभोंवतालच्या विभागांत राहणाऱ्या लोकांच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक गरजा पुऱ्या पाडण्यासाठीं जरूर ते कार्यक्रम आंखून तेथील लोकांच्या मदतीनें ते पुरे पाडण्याचा प्रयत्न करणें व अशा रीतीनें त्या लोकांमध्यें 'आपण सारे एक आहोंत,' अशी भावना निर्माण करणें.

(२) लोकांमध्यें स्वावलंबनाची वृत्ति तेवत ठेवणें.

(३) लोकांना लोकशाही पद्धतीनें जीवन जगण्याची संवय लावणें व त्यांच्यामध्यें नागरिकत्वाची भावना वाढीला लावणें.

(४) लोकांना फुरसतीचा वेळ चांगल्या रीतीनें घालवितां यावा ह्यासाठीं जरूर ती तरतूद करणें.

ह्या गोष्टी साधण्यासाठीं शाळांनीं पुढील कार्यक्रम हातीं घ्यावेत.

(१) विद्यार्थ्यांच्या व गांवकऱ्यांच्या मदतीनें गांवची सफाई, विहिरीची सफाई व इतर श्रमदानांचे कार्यक्रम घडवून आणावेत.

(२) ग्रामीण जनतेसाठीं लोकशिक्षणाचे वर्ग, चर्चा मंडळें, नभोवाणी शेतकरी मंडळें, ग्रामीण वाचनालयें व ग्रंथालयें स्थापन करावींत.

(३) कलापथकें, नाटचमंडळें उभीं करून सांस्कृतिक कार्यक्रम घडवून आणावेत. त्याचप्रमाणें आखाडे, व्यायामशाळा स्थापून खेळांचे सामने वगैरे घडवून आणावेत.

(४) लोकांचें आरोग्य सुधारावें, त्यांची शेती सुधारावी, त्यांचीं घरें सुधारावींत, त्यांचें एकूण जीवन सुधारावें ह्यासाठीं त्यांना जरूर ती माहिती शाळांनीं गोळा करावी. ती लोकांपर्यंत पोहोंचविण्याची व्यवस्था करावी. तसेंच ह्या केंद्रावर तज्ज्ञ मंडळींना आणून लोकांना कायद्याबाबत, आरोग्याबाबत, शेतीसारख्या व्यवसायाबाबत जरूर तो सल्ला मिळवून देण्याची व्यवस्था करावी.

आजच्या शाळांचें रूपांतर समुदायकेंद्रांत कां व्हावें व त्या केंद्रामार्फत काय केलें जावें ह्याची कल्पना या लेखांतून देण्याचा प्रयत्न केला आहे. अशाप्रकारें आपण शाळांचें रूपांतर जर समुदायकेंद्रामध्यें

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

करूं शकलों तर आपल्या मुलांचा भोंवतालच्या लोकांशीं घनिष्ट संबंध येईल. त्यांची राहणी व त्यांचें एकूण जीवन कसें असतें ह्याची त्यांना कल्पना येईल. ह्या लोकांसाठीं आपण कांहीं तरी केलें पाहिजे ह्याची जाणीव त्यांच्यामध्यें उत्पन्न होईल. तीं समाजसेवा करण्यासाठीं प्रवृत्त होतील. समाजसेवेची सारखी संधि मिळाल्यामुळें, मुलांना चांगल्या संवयी लागतील व ते चांगले नागरिक बनतील. ह्या केंद्राचा लोकांच्या जीवनावर पण इष्ट असा परिणाम होईल. ते सर्वांच्या हितासाठीं जरूर तें करायला कार्यप्रवण होतील. शाळांचें नव्या काळांतील हें स्थान आमच्या शिक्षकांनीं नीट समजून घेतलें पाहिजे.

समुदाय केंद्र

[कम्युनिटी सेंटर]

लोकशिक्षणाचा योग्य रीतीनें प्रसार करण्याचें समुदाय केंद्र हें एक प्रभावी साधन होईल, असें आम्हीं सांगितलें आहे. परदेशांत कम्युनिटी सेंटरमार्फत ह्या क्षेत्रांत होत असलेलें चांगलें काम पाहण्याचा सुयोग लाभल्यामुळें, आपणांकडेसुद्धां हीं केंद्रें ठिकठिकाणीं स्थापन व्हावीं असें वाटतें. महाराष्ट्रांत प्राथमिक शिक्षकांना ट्रेनिंग देण्याच्या बऱ्याच संस्था आहेत. त्यांनीं आपल्या विद्यार्थ्यांमार्फत अशीं केंद्रें स्थापन करावीं असा प्रचार करीत असतांना; ‘ तुम्ही योजना आंखून द्या, आम्ही कामाला लागतों; ’ असें कांहीं जणांनीं सांगितल्यावरून पुढें थोडक्यांत एक योजना आंखली आहे. तिचा जास्तींत जास्त उपयोग केला जावा. स्थानिक कार्यकर्त्यांनीं ह्या योजनेप्रमाणें आपआपल्या विभागांतून लोकांचें आर्थिक सहाय्य व सहकार्य मिळण्याचा संभव असेल तर अशीं केंद्रें स्थापन करण्याचा प्रयत्न करावा.

१. समुदायकेंद्र म्हणजे काय ?

समुदायकेंद्र (कम्युनिटी–सेंटर) हा एका ठराविक विभागांत एकमेकांचे शेजारीं राहणाऱ्या लोकांची संघटना, परस्परांचें सहकार्य व

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

परस्परांबद्दल प्रेम ह्यांना एकत्र बांधणारा दुवा राहिल. समुदाय-केंद्र हें एखादा टाऊन हॉल, चर्च, देऊळ, रेल्वे स्टेशन अथवा नाटकगृह ह्यांसारखें ठिकाण नाहीं. ह्या सर्व ठिकाणीं लोक स्वतःची करमणुकीची भूक भागविण्याकरितां एकत्र येतात. समुदाय-केंद्राचा उद्देश केवळ लोकांची करमणूक करणें हा नाहीं. त्याचप्रमाणें ज्या ठिकाणीं आपणांला लागणाऱ्या वस्तु विकत घेतां येतात, अशा बाजारपेठेसारखें ठिकाण म्हणजे समुदायकेंद्र नव्हे. तसेंच आपलीं पोरें रस्त्यावर हिंडत राहूं नयेत म्हणून त्यांना कुठें तरी कोंडून ठेवण्याचें समुदायकेंद्र हें ठिकाण नाहीं, तर लोकशाही राज्यव्यवस्थेखालीं नांदणारे जे जे लोक आहेत त्या सर्व लोकांना एकत्र आणून त्यांच्या करमणुकीचीं साधनें त्यांना उपलब्ध करून देणें व त्यांच्याच पुढाऱ्यां-मार्फत करमणुकीचे व रचनात्मक कार्यक्रम घडवून आणणें हा समुदाय-केंद्र स्थापन करण्यामागें उद्देश आहे.

२. समुदायकेंद्रामार्फत समाजाच्या कोणत्या गरजा भागवल्या जातील ?

(अ) एका विशिष्ट भौगोलिक विभागांत राहणाऱ्या लोकांमध्यें एकजुटीची भावना निर्माण करावी लागेल.

(आ) ह्यामुळें आपली नवी लोकशाही आपणांस मजबूत करतां येईल. कारण कम्युनिटी सेंटरचा फायदा घेणारे जे जे लोक असतील त्यांना, तेथील सर्व समुदायाच्या गरजा पुऱ्या पडण्यासाठीं, एकमेकांच्या खांद्याला खांदा भिडवून जबाबदारीचीं कामें करावीं लागतील.

(इ) यामुळें लोकांना आपला फुरसतीचा वेळ योग्य रीतीनें घालवतां येईल. ह्या वेळेचा उपयोग कांहींतरी रचनात्मक कार्य करण्यासाठीं करतां येईल. घर, देऊळ, सभागृह ह्यांसारख्या समाजांतील निरनिराळ्या लोकांना एकत्र आणणारीं जीं स्थळें आहेत, त्यांची जागा समुदायकेंद्र घेणार नाहीं. त्याचप्रमाणें नाटकें, सिनेमागृहें, नाच-गाण्याचे कार्यक्रम करण्याचीं ठिकाणेंही बंद करून त्याची जागा समुदायकेंद्र घेणार नाहीं. तर हीं जीं समाजाला करमणूक पुरविणारीं

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ठिकाणें आहेत त्यांना कम्युनिटी सेंटरमार्फत मदतच होईल. लोकशाही पद्धतीवर आधारलेला एक प्रभावी व जिवंत असा समाज स्थापना करण्याचें कामही कम्युनिटी सेंटर्स म्हणजे समुदायकेंद्रें करणार आहेत.

३. समुदायकेंद्रामार्फत कोणतीं कामें चालतील ?

(अ) निरक्षरता निवारण.

(आ) लोकशिक्षणाचा प्रसार.

(इ) स्थानिक नेतृत्व निर्माण करणें.

(ई) लोकांना एकत्र आणून त्यांचें सामाजिक जीवन ते योग्य रीतीनें जगूं शकतील. सहकारी पद्धतीनें आपआपलीं कामें ते नीट करूं शकतील. आपलें वैयक्तिक, सामाजिक आरोग्य नीट ठेवतील. त्यासाठीं स्वच्छता–सफाई, यांच्यामार्फत आपली राहण्याची पद्धति ते सुधारूं शकतील.

(उ) आपल्या विभागांत राहणाऱ्या लोकांना योग्य व सात्त्विक अशी करमणूक मिळवून देणें.

४. समुदायकेंद्र ह्या कामाला कशा रीतीनें हात घालील ?

(क) सांघिक कवायती, लेझीम, कुस्त्या, शारीरिक खेळ व शर्यती घडवून आणील.

(ख) भजनें, कीर्तनें, गर्बा नाच, लोकनाटच, लोकनृत्यें, पोवाडे, गायन इत्यादि कार्यक्रम घडवून आणील.

(ग) नवसाक्षर व अर्धशिक्षित लोकांच्याकरितां लोकशिक्षणाचे वर्ग, ग्रंथालयें व वाचनालयें उघडून चालवील.

(घ) त्यांच्याकरितां भिती–पत्रकें, अभ्यास-मंडळें, चर्चा-मंडळें, वादविवादमंडळें स्थापन करील.

(ङ) माता-बाल.संगोपन केंद्रें, आजाऱ्यांची शुश्रूषा करण्याचीं पथकें, तरुणांच्याकरितां कल्याण-केंद्रें, कुटुंबसंरक्षण पथकें स्थापून त्या भागांत राहणाऱ्या लोकांची काळजी घेईल.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

(च) औषधांच्या पेटचा, प्रथमोपचाराच्या पेटचा व आजाऱ्याची शुश्रूषा करण्याचीं इतर साधनें ठेवील.

(छ) जनतेला हवी असलेली सर्व प्रकारची माहिती मिळवून ती लोकांना समजावून सांगण्यासाठीं एक खास विभाग उघडील.

(ज) सुधारलेल्या पद्धतीनें शेती कशी करावी याचीं व इतर ग्रामीण व्यवसाय नीट रीतीनें करण्याचीं प्रात्यक्षिकें दाखवील.

(झ) लोकांना आपणामध्यें असलेलें कौशल्य व कला दाखविण्यास संधि मिळावी म्हणून त्यांनीं केलेल्या कलाकुसरीच्या कामाचें, तसेंच त्या क्षेत्रांत इतरांनीं केलेल्या कामाचीं प्रदर्शनें भरवील.

(ञ) सहभोजनें, सहली किंवा सफरी यांसारखे सामाजिक दळणवळण वाढविणारे समारंभ घडवून आणील.

(ट) जनतेच्या नित्याच्या उत्पन्नांत भर घालणारे आर्थिकदृष्टचा किफायतशीर असे फुरसतीच्या वेळीं करतां येण्यासारखे उद्योगधंदे त्यांना शिकवील.

(ठ) सहकारी पद्धतीनें करावयाचीं कामें हातीं घेईल.

५. समुदायकेंद्राची दैनंदिन व्यवस्था कशी करावी ?

वास्तविक पाहतां ह्या केंद्रावर देखरेख करण्यासाठीं व तें नीटपणें चालविण्यासाठीं एक भर-पगारी मनुष्य नेमला जावा, परंतु तें शक्य होईपर्यंत एकादा उत्साही प्राथमिक शिक्षक (जो त्या भागांत राहात असेल व ज्याचें तेथील जनतेवर वजन असेल असा) हें काम करण्याकरितां नेमला जावा. समाजसेवा म्हणून विनावेतन काम करणाऱ्या माणसाच्या मदतीनें कामाला प्रारंभ करावा.

केंद्र चालविण्यासाठीं लागणारी जी जागा ती मध्यवर्ति असावी. आरंभापासून भाडचावर खर्च करावयास लागूं नये म्हणून एकाद्या प्राथमिक शाळेंत अथवा देवळांत हें केंद्र सुरू करावें.

हा प्रयोग प्रथम प्राथमिक शिक्षकांच्या ट्रेनिंग कॉलेजांतून सुरू करावा. कारण त्या ठिकाणीं असणारे शें-दीडशें शिक्षक हें केंद्र चाल-

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

विण्यास आपणास हरएक प्रकारची मदत करूं शकतील. ट्रेनिंग कॉलेजच्या नव्या अभ्यासक्रमांत समाज शिक्षणाला निश्चित स्थान मिळाल्यामुळें, हें केंद्र चालवून ह्या विद्यार्थ्यांना समाजशिक्षणाच्या क्षेत्रांत पुरेसा अनुभव मिळवितां येईल.

६. समुदायकेंद्र यशस्वी होण्याकरितां काय करावें ?

समुदाय केंद्र यशस्वी व्हावयाचीं असतील तर हीं केंद्रें अशा रीतीनें चालविलीं गेलीं पाहिजेत कीं, ज्या विभागांत तीं केंद्रें उघडलीं जातील, त्या विभागांत राहणारे लोक हीं केंद्रें चालविण्याच्या कामीं उत्साहानें भाग घेतील. या केंद्रांबद्दल तेथील लोकांच्या अंत:करणांत इतकी आत्मीयता निर्माण झाली पाहिजे कीं, त्या केंद्रामार्फत होणाऱ्या सर्व कार्यक्रमांत ते लोक सहभागी होतीलच, पण त्या केंद्राबाबतची सर्व आर्थिक जबाबदारी स्वीकारण्यास व ती पूर्णांशानें पार पाडण्यास पण ते लोक तयार होतील. हें केंद्र चालविण्याचा आर्थिक भार केवळ चार दोन लोकांवर पडूं नये म्हणून त्या विभागांत काम करणाऱ्या ग्रामपंचायती, नगरपालिका, यांच्याकडून त्या केंद्राच्या खर्चासाठीं नियमित ग्रँट मिळविण्याचा प्रयत्न केला जावा. त्याचप्रमाणें त्या विभागांत सहकारी पद्धतीनें चालवल्या जाणाऱ्या ज्या पतपेढ्या, दुकानें अथवा इतर तत्सम संस्था असतील त्यांच्याकडून सुद्धां ह्या केंद्रासाठीं पैशांची मदत मिळविण्यांत यावी. सरकारच्या मदतीची वाट पहात जनतेनें बसूं नये. लोकशाहीच्या काळांत, लोकांच्या हिताचीं कामें, लोकानीं स्वत:च्याच हिंमतीवर उभारणें योग्य होईल. सर्व देशांत चांगल्या कामांना प्रारंभ स्वयंस्फूर्त संघटनांकडूनच केला जातो.

७. प्रत्येक केंद्राची किमान गरज कोणती राहील ?

नित्यखर्च

(१) कार्यकर्त्यांना 'मानधन'.

(२) वर्तमानपत्रें, मासिकें यांचा खर्च.

(३) करमणुकीच्या कार्यक्रमासाठीं खर्च.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

(४) व्यवसाय शिकविण्यासाठीं लागणाऱ्या साहित्याप्रीत्यर्थ लोंकर, शिवण्याचें व विणण्याचें इतर साहित्य घेण्याचा खर्च (स्त्रियांच्यासाठीं).

(५) जनतेमध्यें नेहमीं आढळणारे रोग बरे करण्याकरितां लागणारीं नित्याचीं औषधें (मलम, कोयनेल, मॅग्सल्फ्–जंताची पावडर, व्हिटॅमिनच्या गोळ्या) यावर होणारा खर्च.

(६) दिवाबत्ती व इतर अनपेक्षित खर्च.

(७) फोनोग्राफच्या सुया, प्लेटी (सरकारतर्फे रेडिओ मिळाल्यास तत्संबंधीं होणारा किरकोळ खर्च.)

(८) इतर अनपेक्षित खर्च.

नैमित्तिक खर्च

(१) करमणुकीचीं साधनें (भजनाचीं साधनें)

(अ) पखवाज

(ब) टाळ १२ जोड्या

(क) एकतारी

(२) खेळण्याचीं साधनें :

(अ) व्हॉलीबॉल (स्पेअर ब्लॅडर्स सुद्धां)

(आ) लेझीम १२ जोड्या

(३) एक शिवण्याचें यंत्र

(४) शुश्रुषेचीं साधनें:–परसाकडचें भांडें (बेड–पॅन्), लघवीचें भांडें, गरम पाण्याची पिशवी, बर्फाची पिशवी, ताप–मोजण्याची नळी.

(५) पाणी पिण्याचें पिंप (तोटीसुद्धां) व पाण्यासाठीं दोन बादल्या.

(६) दोन गॅसच्या बत्त्या.

(७) दोन लांकडी फळे व सामान ठेवण्याची लांकडी पेटी.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

विशेष सूचना : वर जी योजना दिली आहे तिची अंमलबजावणी करण्यासाठीं, वर दिलेल्या सर्व गोष्टींची आवश्यकता जरी असली, तरी ह्या सर्व सोयी व सवलती उपलब्ध होईपर्यंत हें काम थांबवून धरूं नये. मिळेल ती साधन सामुग्री घेऊन कामाला प्रारंभ करावा. कोणती एकादी विशिष्ट गोष्ट नाहीं, म्हणून काम थांबवूं नये. कामाचा जसजसा उठाव होईल, लोकांना केंद्राची आवश्यकता पटून ते जसजसे त्यामध्यें लक्ष घालूं लागतील, तसतशी साधनसामुग्री वाढत जाईल. केंद्राचें स्वरूप अशा दिशेनें बदलत जाईल.

हें केंद्र आपलें आहे असा विश्वास जनतेला वाटावा ह्यासाठीं केंद्राची व्यवस्था पाहण्यासाठीं एक केंद्र व्यवस्थापक मंडळ नेमण्यांत यावें व त्यामध्यें पुढील लोकांचा समावेश व्हावा.

(१) ग्रामपंचायतीचे सरपंच.

(२) पोलीस पाटील (तालुक्याच्या जागीं मामलतदाराचा अन्य कोणी प्रतिनिधि).

(३) स्थानिक शाळेचे मुख्याध्यापक.

(४) वरील तीन सभासदांनीं एकमतानें स्वीकृत केलेले दोन कोणी तरी जबाबदार नागरिक. एकूण पांच जण ह्या समितींत राहतील. त्यांच्या मार्गदर्शनाखालीं हें काम चालेल. केंद्र सुरू झालें कीं, त्या ठिकाणीं चालणाऱ्या कार्यक्रमांना सरकारच्या सर्व खात्यांची जरूर ती मदत व सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न ही समिति करील.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

१६. लोकशिक्षण कार्यकर्त्यानें काय ध्यानांत ठेवावें ?

(१) ज्या खेड्यांत तुम्ही काम करणार तेथील लोकांना तुम्ही कोण तें सांगा व तुमच्या कामाचें स्वरूप समजावून द्या.

(२) तुम्ही खेड्याचा उद्धार करायला आलां, अशी वृत्ति बाळगूं नका. लोकांना मोठमोठीं वचनें देऊं नका. त्यांच्या अपेक्षा उगाच उंचावूं नका.

(३) खेड्याचें नीट निरीक्षण करा. बोलण्यापेक्षां अधिक ऐकून घ्या.

(४) लोकांशीं ताठ्यानें वागूं नका. मोकळेपणानें वागा. प्रारंभीं तुम्हाला लोकांकडे जावें लागेल, नंतर ओळख झाल्यावर ते तुमच्याकडे येतील. उगीच त्यांच्या कामांत मदत करायला जाण्याचा आव आणूं नका. ताठ्यानें वागूं नका. तसेंच स्वस्त भावांत विकले जाऊं नका, थोडे हातचे राखून ठेवीत जा.

(५) लोकांचे गप्पांत भाग घ्या. त्यांना आजूबाजूला झालेल्या चांगल्या गोष्टींची माहिती द्या. त्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें द्या, पण गांव कुटाळींत भाग घेऊं नका.

(६) खेडेगावांतील लोक फार चौकस असतात. त्यांच्या प्रश्नांच्या सरबत्तीला कंटाळूं नका, त्यानीं थोडी थट्टा केली तर सहन करा. प्रारंभींचे कांहीं दिवस कौतुक म्हणून ते तुम्हाला कांहीं विचारतील, सांगतील त्याला शांतपणें तोंड द्या.

(७) खेडेगांवांतील लोकांना कोणताही उपदेश करतांना आपण कोणत्या हेतूनें हा उपदेश करितों ह्याविषयीं तुमच्या कल्पना स्पष्ट असूं द्या.

(८) ज्या गोष्टींत तुम्हाला रस वाटत नाहीं, त्याबद्दल आवड असल्याचा आव आणूं नका, खेडेगांवांतील लोक हुशार असतात. तुमचा ढोंगीपणा अथवा कृत्रिमपणा ते पटकन ओळखूं शकतात.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

(९) आपणाला खेड्यांतील लोकांशीं दोस्ती करावयाची आहे. त्यांच्यांत व आपणांत कोणत्या बाबतींत सारखेपण आहे तें शोधून पहा. त्यांच्यामध्यें व आपणामध्यें फरक अथवा अंतर किती आहे तें शोधण्याच्या फंदांत पडूं नका.

(१०) ग्रामीण भाषा तुम्हाला नीट येईपर्यंत तुम्ही आपल्या नेहमींच्याच भाषेंत बोला, आपली भाषा चुकीची बोलल्याचें खेडेगांवांतील लोकांना खपत नाहीं.

(११) खेड्यांतील लोकांचीं नांवें व चेहरे लवकर ध्यानांत ठेवायला शिका. तुम्ही एकाद्याचें नांव घेऊन जर त्याला हांक मारलीत तर त्या माणसाला खूप आनंद होतो व तो लवकर आपल्याजवळ येतो.

(१२) लोकांना लवकर जिंकण्याच्या हेतूनें त्यांना भेटी वगैरे देण्याचा खटाटोप करूं नका. तुम्ही जें काम करायला आलांत त्या कामाव्यतिरिक्त त्यांना कांहींही फुकट देऊं नका.

(१३) तुम्हाला भेटणाऱ्या प्रत्येक खेडुतांची विचारपूस करा. त्याला ‘ नमस्ते ’ म्हणा.

(१४) कांहीं ठराविक लोकांशींच खूप मैत्री जोडण्याचा प्रयत्न करूं नका. सर्वांशीं सारखे संबंध ठेवा.

(१५) खेड्यांतील रोजच्या कामाची दैनंदिनी ठेवा.

(१६) हातीं घ्याल तें काम तडीस न्या. बरींच कामें सुरू करायचीं व तीं अर्धवट टाकायचीं, असें करूं नका. जें शेवटपर्यंत नेणें जमणार नाहीं तें सुरूच करूं नका. कामाला सुरुवात करण्यापूर्वीं संभाव्य अडचणींचा नीट विचार करा.

(१७) खेड्यांतील स्त्रियांकडे व मुलांकडे दुर्लक्ष करूं नका. तुमच्या कार्यक्रमांत त्यांना स्थान द्या.

(१८) सगळ्या नव्या कल्पनांचें भांडवल आपणाजवळ आहे, असा आव आणूं नका. लोकांना विचार करूं द्या. त्यांच्याजवळ कांहीं नव्या कल्पना असतील त्या सांगण्याची त्यांना संधि द्या. त्या समजून घ्या.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

(१९) फार मोठ्या गोष्टींना एकदम हात घालूं नका. लोकांच्या तात्कालिक गरजा समजून घ्या व त्या पार पाडण्यांत त्यांना मदत करण्याचा प्रयत्न करा.

(२०) पडद्याच्या आड राहून काम करायला शिका. लोकांना पुढें यायला संधि द्या. त्यांचा आत्मविश्वास वाढीला लावा.

(२१) लोकांना सांगितलेली वेळ चुकवूं नका. त्यांना दिलेल्या वेळेवर हजर रहा.

(२२) कोणत्याही बाबतींत लोकांवर सक्ति करूं नका. आपलें काम शैक्षणिक आहे. लोकांचीं मनें वळवून शिक्षणाचें काम करावें लागतें.

(२३) खेडेगांवांतील पक्षापासून, पार्टर्यांपासून अलिप्त रहा. खेडेगांवांतील राजकारणापासून दूर रहा. एका पार्टीची बाजू घेऊन दुसरीला ठपका देण्याच्या फंदांत पडूं नका.

(२४) कोणत्याही प्रकारच्या पक्षीय राजकारणाबद्दल बडबड करूं नका. कोणत्याही राजकीय प्रश्नाबाबत, सरकारी योजनांबाबत तुमचीं मतें सांगत फिरूं नका. सरकारी योजना मात्र लोकांना समजावून सांगा.

(२५) आपणाला जर एकादी गोष्ट समजली नाहीं किंवा ती माहीत नसली तर तसें स्पष्ट सांगा. आपलें अज्ञान लपवूं नका.

(२६) खेडेगावांतील लोकांसमोर आपल्या मित्राच्या अथवा अधिकाऱ्यांच्या चुका दाखविण्याचा प्रयत्न करूं नका. लोक गेल्यावर त्या त्या मंडळींना तुमचें म्हणणें समजावून सांगा.

(२७) लोकांच्यामध्यें काम करणाऱ्या ज्या संस्था आहेत त्या संस्थांचा फायदा घेण्यास लोकांना उत्तेजन द्या.

(२८) खेडेगावांतील लोकांच्या सर्व अडचणी आपण दूर करण्याचा प्रयत्न करूं नका. लोकांना त्यांच्या अडचणीची जाणीव करून द्या. त्याबाबत त्यांना विचार करूं द्या. त्या सोडविण्यासाठीं काय मदत मिळूं शकेल ह्याची त्यांना कल्पना द्या.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

(२९) लोकांना आपल्या गांवाच्या हिताच्या योजना तयार करायला उत्तेजन द्या व त्या योजना पार पाडण्याच्या बाबतींत त्यांना शक्य ती मदत करा.

(३०) लोकांशीं विनयानें व सौजन्यानें वागा. त्यांच्यावर प्रेम करायला शिका. आपल्या ज्ञानाचा, योजनांचा फायदा सर्वांना सारखा द्या. पक्षपात करूं नका.

लोकशिक्षणाचीं खालील साधनें कार्यकर्त्यांनीं लक्षांत घेऊन नित्याचें काम करावें.

१. **सरकारतर्फे मिळणारीं**–१. पाटचा २. क्रमिक पुस्तकें ३. कंदील ४. फळें ५. वाचनालयासाठीं इतर पुस्तकें.

२. **कार्यकर्त्यानें तयार करणें**–१. साधीं चित्रें २. चित्रमय गोष्ट ३. भींति पत्रिका.

३. **सरकारतर्फे सोय**–(प्रचार खात्याच्या अधिकाऱ्यांकडून) १. रेडिओ २. फिरता सिनेमा ३. वस्तुसंग्रहालयें, प्रदर्शनें.

४. **धंदेवाईक संघटना**–१. सिनेमा २. नाटकें ३. लोकनाटच.

५. **खाजगी संस्था**–१. कलापथकें २. हौशी कलावंतांचीं नाटकें ३. लोकनाटच.

६. **सरकार मान्य संस्था**–१. वाचनालयें २. फिरतीं वाचनालयें.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

१७. लोकशिक्षणाच्या गोष्टी

१. भारत जहाज

एक जहाज भर वेगांत चाललें होतें. चोहोंकडे समुद्र होता. खालीं पाणी होतें. वर आकाश होतें. समुद्र खवळत होता. जहाजाला हेलकावे बसत होते.

जहाजाच्या वरच्या मजल्यावर शिकलेले व श्रीमंत लोक होते. त्यांनीं भारी किंमतीचे तिकीट काढलें होतें. त्यांना सुखसोई पुष्कळ होत्या. चांगलें चांगलें खायला, चांगलीं बाकें बसायला, मऊ मऊ गाद्या लोळायला, नवे खेळ खेळायला. असा त्यांचा थाट होता ! वरच्या मजल्यावर माणसें फारच थोडीं होतीं.

खालच्या मजल्यावर चिक्कार माणसें होतीं. त्यांचीं तिकिटें कमी किंमतीचीं होतीं. त्यांना सोई नव्हत्या. भरपूर जागा नव्हती. बसायला बाकें नव्हतीं. खायला चांगलें नव्हतें. कसेतरी दाटीवाटीनें ते बसले होते.

एकदां खालच्या मजल्यावरचें पाणी संपलें. लोकांना तहान लागली. एकमेकांजवळ पाणी मागितलें. ज्यांच्याजवळ थोडेफार होतें तें त्यांनीं दिलें. पण तें किती वेळ पुरणार ? जहाजाच्या मालकाकडे लोक गेले. त्यानें सांगितलें; " दिवस बुडेपर्यंत थांबा. रात्रीं किनाऱ्याला पोहोंचूं. मग पोटभर पाणी मिळेल. तुम्हांला द्यायला मजजवळ पाणी नाहीं. " लोक निराश होऊन परतले.

ऊन तापायला लागलें. खालच्या मजल्यावर तहान वाढायला लागली. सारे लोक खळबळले. त्यांतला एक हुशार होता. तो हळूच वरच्या मजल्यावर गेला. तेथें भारी तिकिटाचीं माणसें बसलीं होतीं. तेथें पाण्यानें भरलेलें पिंप होतें. त्या माणसानें एक लोटी घेतली. पाण्याच्या पिपांत बुडविली. लोटाभर पाणी काढलें. तोंडाला लावणार इतक्यांत त्याला कोणी जोराचा धक्का दिला. हातांतील लोटी खालीं

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पडली. वरच्या मजल्यावरचा एक माणूस उसळून त्याच्या अंगावर आला. " मूर्ख कुठला ! आमचें पाणी घाण करतोस ? आम्ही वीस रुपये तिकिटाचे दिले आहेत. हें पाणी आमचें आहे. तूं घाण माणूस. आमचें पाणी घाण करतोस ? चालायला लाग. "

" पण आम्हाला तहान लागली आहे. खालीं पाणी नाहीं. "

" त्याला आम्ही काय करावें ? तुमचा आमचा काय संबंध ? तुम्ही खालच्या मजल्यावरचे, आम्ही वरच्या मजल्यावरचे. "

बिचारा खालीं मान घालून खालच्या मजल्यावर आला. झालेली हकीकत इतर लोकांना सांगितली. सर्व लोक चिडले. खवळले. पण करतात काय ?

उन्हानें वाढवलेली तहान रागानें वाढविली. अपमानानें त्यांत भर घातली. लोकांना काय करावें हें सुचेना. त्यांत एक जण म्हणाला, " थांबा, मी सर्वांना पाणी देतों. " त्यानें एक मोठी लोखंडी मेख आणली. एक हातोडा आणला.

एकानें मेख धरली. दुसऱ्यानें त्यावर घण मारायला सुरुवात केली. तो म्हणाला, " थोडा वेळ थांबा. पाणीच पाणी करतों. "

खालीं काय चाललें आहे हें पाहण्यासाठीं वरच्या मजल्यावरच्या एका माणसानें खालीं डोकावलें. खालीं जहाजाला भोंक पाडण्याचें काम चालू होते. तो पळत वरच्या मजल्यावरील आपल्या लोकांकडे गेला. त्यांना खालच्या मजल्यावर काय चाललें आहे तें सांगितलें.

सर्व लोक घाबरले. जहाजाला भोंक पडलें तर ? वरच्या मजल्यावरील सर्व लोक घाबरून खालीं आले. घण मारायचें काम चालूच होतें. वरच्या मजल्यावरील लोकांनीं हात जोडले आणि सांगितलें; " आमच्या मजल्यावरील सर्व पाणी तुम्हीं घ्या, पण जहाजाला भोंक पाडूं नका. " खालचे लोक म्हणाले, " तुमचा आमचा काय संबंध ? आम्ही खालीं वाटेल तें करूं. "

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

वरच्या मजल्यावरील लोक म्हणाले, "आपण सारे एकाच जहाजांत आहोंत; हें आम्हांला आतां कळलें. पुन्हां असली चूक करणार नाहीं. खुशाल पाणी घ्या आणि प्या."

सत्ता, संपत्ति किंवा शिक्षण जोंवर सर्वांना मिळत नाहीं, तोंवर हें समाजाचें जहाज केव्हां फुटेल हें सांगतां येत नाहीं.

---

२. नोकरी पेटली

डॉक्टर कटके यांनीं आमच्या गांवांत नवा दवाखाना उघडला. गांवाच्या लोकांना किती आनंद झाला. त्यांना वाटलें आतां औषध-पाण्याला लांब जायला नको. रोगराईवर उपचार होतील. गांवांतल्या गांवांत सोय झाली. हांक मारली कीं डॉक्टर दाट रात्रीलाही घरीं आणतां येईल. जरूर लागली तर बैलगाडी जोडून डॉक्टरना पडळी–वस्तीवर नेतां येईल.

मला आनंद झाला त्याचें कारण तर निराळेंच होतें. कटक्यांचें दवाखान्यांत काम मिळालें. झाडलोट करायची. दवाखान्यांतील भांडीं स्वच्छ करून ठेवायचीं. कपडे धुऊन साफ ठेवायचे. औषधाचीं कपाटें पुसून निर्मळ ठेवायचीं–कोणाकोणाचीं औषधें पोहोंचवायचीं. हीं सारीं कामें मीं करीत असें. त्यामुळें डॉक्टर कटक्यांचा माझ्यावर जीव बसत चालला. घर चालण्यापुरते पैसे मिळत असत. मला तरी कुठें जास्त पैशांची हाव होती.

परंतु एके दिवशीं मला डॉक्टर कटक्यांनीं हांकलून दिलें. कां हांकलून दिलें तेंही सांगतों, ऐका!

मी सकाळीं लवकरच दवाखान्यांत गेलों. सारा दवाखाना झाडून काढला. टेबलें–खुर्च्या झटकून टाकण्याचें काम चालू होतें. इतक्यांत

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जानबा डोकें खाजवीत आला. मला विचारलें, " बारक्या ! डाक्टर कवा येणार हाईत ?" मी सांगितलें, " थोडा वेळ बाकावर बैस, इतक्यांत येतील. पण तुझें काम काय ? कुणाला औषध पाहिजे काय ?"

तो म्हणाला, " दुसऱ्या कोणालाही नको. मलाच पाहिजे."

मी म्हटलें, " अरे, तूं चांगला रेड्यागत धडधाकट आहेस ! तुला कशाला औषध पाहिजे ?"

जानबानें डोक्याचा पटका काढला आणि म्हणाला, " हें बग माझें डोक्सं. सारी रात खाजवून खाजवून रगत फुटायची पाळी आलीया. " मी जानबाचे केंस जरा बाजूला करून पाहिलें. त्याच्या डोक्याला खांडकें पडलीं होतीं. हें आमचें बोलणें चाललें होतें, इतक्यांत डॉक्टर कटके आले. त्यांच्याबरोबरच महिपतराव आणि त्यांची मुलगी आली होती. डॉक्टर येऊन खुर्चीवर बसले. महिपतराव व मुलगी जवळच्या बांकावर बसली. डॉक्टर म्हणाले, " महिपतराव, बोला तुमच्या मुलीची काय तक्रार आहे ?"

महिपतराव सांगूं लागले.—" अहो डॉक्टर, तिला बाकी रोगराई कांहीं नाहीं. पण तिचे सारे केंस पांढरे व्हायला लागले आहेत. आतां ही तरणीताठी मुलगी. हिचे केंसच पांढरे व्हायला लागले तर हिला कोण करून घेईल ? चार दिवसांनीं तिला दाखवायला घेऊन जायचं. तिचे केंस काळे दिसले तरच नवरा तिला पसंत करील, नाहीं तर पुन्हां नकारच मिळेल. तेव्हां कांहींतरी औषध लावायला द्या आणि चार–आठ दिवस तरी मुलीचे केंस काळे होतील असें करा.

डॉक्टर कटके म्हणाले, " तुमची अडचण खरी आहे. मी तुमच्या मुलीसाठीं औषध देतों. तें रात्रीं केंसाला लावून केंस बांधून ठेवायचे. सकाळपर्यंत केंसाला रंग चढेल. चार आठ दिवस तरी तो रंग राहील."

डॉक्टरांनीं चौकशी केली. पण कंपौंडर आलेला नव्हता. म्हणून ते महिपतरावांना म्हणाले, " तुम्हीं घरीं चला. कंपौंडर आल्यावर मी तुमच्याकडे औषध पाठवून देईन. " महिपतराव मुलीला घेऊन निघून

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

गेले. डॉक्टरांनीं जानबाला विचारलें, " काय जानबा, तुमची काय तक्रार आहे ? तुम्ही औषधासाठींच आलेले आहांत ना ? "

जानबांनीं डोक्याचा पटका काढला आणि बोलायला सुरुवात केली. " हें बघा डोस्क्याला काय झालं तें. सारी रात डोळ्याला डोळा लागला न्हाई. काय तरी द्या औषध लावायला. "

डॉक्टर म्हणाले, " जानबा, मी मलम देतों लावायला. पण हे डोक्याचे केस काढून मगच जर औषध लावलं तर लवकर लागू पडेल. तर, तूं असं कर ! मी औषध देतों तें रात्रीं डोक्याला लाव. जरा चोळून लाव म्हणजे सकाळपर्यंत केंस गळून पडतील. नंतर पुन्हां येऊन भेट म्हणजे दुसरें औषध देईन. " जानबा म्हणाला, " आतांच देतां का औषध ? " डॉक्टरांनीं सांगितलें, " मी बारक्याबरोबर औषध पाठवून देईन. अजून कंपौंडर आला नाहीं. "

जानबा निघून गेल्यानंतर बऱ्याच वेळानें कंपौंडर आला. डॉक्टरनीं त्याला ताणलेंच. जानबाचें व महिपतरावाच्या मुलीचें औषध तयार करायला सांगितलें व डॉक्टर इतर रोग्यांना तपासायला लागले. थोडा वेळ तपासणी झाली. डॉक्टरना जाधववाडीवरचें बोलावणें आलें. कोणीतरी फारच आजारी होतें. ते निघून गेले.

कंपौंडरनें इतरांचीं औषधें दिलीं. मला हांक मारली, " बारक्या ! ह्या बाटल्या घे आणि जानबाकडे व महिपतरावाकडे पोहोंचवून ये. हें बघ, ही बाटली जानबाला दे. या बाटलीवर 'डोक्याला लावायचें औषध' असें लिहिलें आहे. ही दुसरी बाटली महिपतरावाला दे. 'केसाला लावायचें औषध' असें त्यावर लिहून देतों. "

मी दोन्हीही बाटल्या घेतल्या. घरीं गेलों. न्याहरी केली. एक बाटली जानबाकडे पोहोंचविली. दुसरी बाटली महिपतरावाकडे दिली. बाटल्यावरच्या चिठ्ठ्या मला कुठें वाचायला येत होत्या ?

दुसरे दिवशीं मी दवाखाना उघडला. केरसुणीनें झाडायला लागलों; इतक्यांत महिपतराव तावातावानें आले आणि म्हणतात, " कुठं आहे तुझा डॉक्टर ? हें काय ! औषध देणं कीं थट्टा ? "

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मी म्हणालों, "काय झालं तरी काय?" महिपतरावांनीं पिकायला लागलेल्या केंसाचा एक झुपका माझ्यापुढें टाकला आणि म्हणाले, "हे चिटकवा म्हणावं पुन्हा पोरीच्या डोक्याला! छान शोभा केलीत आमची."

इतक्यांत जानबा पण तडातडा बडबडत आला. त्याचा हात काळाकुट्ट होता. तोंडावर मधून मधून काळे पट्टे उठलेले होते. तो काय बोलत होता हें मला समजतच नव्हतें. मी दोन्ही हातांनीं डोकें गच्च धरून बसलों होतों.

याच आगींत तेल ओतायला डॉक्टर कटके आले आणि मग जी आग भडकली; त्यामुळें माझी नोकरी कायमची पेटली.

३. शिकाल तर जगाल

दौलती धुमाळ खबरदार शेतकरी होता. बारा बैल आणि चार विहिरी असा मोठा बारदाना. दहापांच एकर उंसाचा धनी. बारा महिने शेतीचें काम चालू राहायचें. म्हणून त्यानें शेतावरच वस्ती केली. एक छानदार घर शेतावर बांधलें. त्यामुळें रोजच्या कामावर देखरेख झाली. गडीमाणसांवर दबदबा राहिला.

रोजचा भाजीपाला गांवांत पाठवावा लागे. त्यासाठीं छकडा ठेवला होता. मुलांची शाळा गांवांतच होती. दौलतीचा मुलगा चंद्रकांत. त्याच्या शाळेसाठीं तांगा ठेवला होता. गांव फार लांब नव्हता. तरी पण दोन मैलांवरचा हेलपाटा गांवासाठीं पडे.

एकुलता एक चंद्रकांत. त्याच्यावर दौलतीचा भारी जीव. दौलतीची बायको हौसा. ती पण चंद्रकांताला फार जपे. एकदां चंद्रकांताचें पोट दुखायला लागलें. लगेच हौसानें त्याला ओवा दिला.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दौलतीनें त्याला सोडा दिला. पण सारखा धुमस निघत होता. चंद्रकांत अगदीं तडफडूं लागला. दौलतीनें तांगा जोडला, गांव गांठलें. गांवांत डॉक्टर होते, डॉक्टरांना सगळी हकीकत सांगितली. तावडतोब वस्तीवर चला म्हणून बोलावलें. डॉक्टर म्हणाले, 'दौलतराव, या चार दोन लोकांना औषध देतों. लगेच मोटार घेऊन वस्तीवर येतों. ही समोरचीं माणसें टाकून कसा निघूं? तोंवर मी हें औषध देतों तें घ्या. यांतील एका बाटलींतील औषध पोटांत द्या. दुसरें विषारी औषध आहे, तें पोटावर चोळा. बाटलीवर तसें लिहून चिठ्ठ्या लावल्या आहेत.'

दौलती तसाच घाबऱ्या घाबऱ्या घरीं गेला, औषधाच्या बाटल्या हौसाजवळ दिल्या. त्यानें हौसाला सांगितलें कीं, यांतलें हें एक औषध पोटांत दे. दुसरें हें औषध पोटावर चोळ. तोंवर डॉक्टर येतीलच. मी डॉक्टरांची वाट पहातों. मी दारांतच उभा आहें.

हौसानें घाईनें औषध ओतलें. पोटावर चोळायचें औषधच तिनें चंद्रकांताला प्यायला दिलें. बाटलीवर "विषारी" असें लिहिलें होतें. तें तिला वाचतां आलें नाहीं. विषारी औषध चंद्रकांताच्या पोटांत गेलें. चंद्रकांत जास्तच तडफडूं लागला. तो बेसावध झाला.

तोंवर डॉक्टर आले. डॉक्टरांना चूक समजली. त्यांनीं उपचार केले. चंद्रकांत सावध झाला. आईला पटलें. वाचतां आलें नाहीं म्हणून विषारी औषध पोटांत गेलें. डॉक्टरांच्या औषधानें चंद्रकांत बरा झाला. पुढें त्यानेंच आईला वाचायला शिकविलें.

---

४. आपलें सुख

मित्रांनो,

गेल्या वेळीं मी तुम्हांला आपण शेजाऱ्याशीं कसें वागावें तें सांगितलें. शेजाऱ्याचें सुख तें आपलें सुख व त्याचें दुःख तें आपलें दुःख असें पण मी तुम्हांला सांगितलें.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आपण सर्वजण स्वतःपुरतें पाहतों. शेजाऱ्याचा विचार फार कमी करतों. हें चांगलें नाहीं. शेजाऱ्याचें घर साफ नसलें, त्याच्या घरीं उंदीर, ढेकूण झाले, तर त्याचा त्रास त्याच्याबरोबर आपणाला पण सोसावा लागेल.

आम्हीं ज्या चाळींत राहत होतों, तेथें एकदां खूप ढेकूण झाले. आम्ही आमच्या घरांत ढेकूण मारण्याची भुकटी सर्व ठिकाणीं टाकली. आमच्या घरांतील सगळे ढेकूण मेले. आमचें घर स्वच्छ झालें. पण दोन दिवसांनीं पुन्हां घरांत ढेकूण फिरूं लागले. मी आमच्या घरांतील माणसांना म्हणालों, "तुम्हीं तुमचें घर साफ केलेंत. शेजाऱ्याचें घर तसेंच राहिलें. तेथील ढेकूण येथें येणारच. आधीं शेजाऱ्याचीं घरें साफ करा. त्यांना भुकटी नेऊन द्या. त्यांच्याकडील ढेकूण नाहीसे करा." आमच्या माणसांनीं शेजाऱ्यांना भुकटी वाटली. त्यांच्या घरांतील ढेकूण नाहींसे झाले. मग आमच्या घरांत पुन्हां ढेकूण आले नाहींत.

जोंपर्यंत शेजाऱ्याचें घर स्वच्छ ठेवावयास आपण मदत केली नाहीं तोंपर्यंत आपलें घर स्वच्छ ठेवून भागणार नाहीं. शेजारचा कचरा, शेजारची घाण, शेजारचे रोग, शेजाऱ्याचा अडाणीपणा ह्याचा आपणाला त्रास होणारच. शेजारी सुखी झाला तरच आपण सुखी होऊं. शेजाऱ्याच्या सुखांतच आपलें पण सुख आहे.

आपला,

नाना.

---

५. जांवयाची गोष्ट

फार दिवसांनीं जांवई घरीं आले. सासूला फारच आनंद झाला. सासू म्हणाली, "मुलीला नाहीं आणलें ?" जांवई म्हणाले, "तुमच्या पत्रांत तसा निरोप कुठें होता ?" सासूबाई म्हणाल्या, "आम्ही मास्तरकडून पत्र लिहून घेतलें. त्यांनीं काय लिहिलें कुणास ठाऊक ?"

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जांवईबापू आले म्हणून गांवांतले लोक आले. बापई माणसें आलीं. बायामाणसें आलीं. सासूबाईचें घर भरून गेलें. जो तो म्हणे, "आमच्या लेकीला आणलें नाहीं. मालन आतां बरीच मोठी झाली असेल !"

सासूबाईंनीं जेवायला चांगला बेत केला होता. शेवया, तेलच्या, मळ्यांतल्या केळीची शिकरण. लोकही जेवायला थांबले. पानें वाढलीं. रांगोळ्या घातल्या. लोक उठले. ताटावर बसले. इतक्यांत पोस्टमन आला. त्यानें एक पत्र दिलें.

जांवईबुवांच्या हातांत लोकांनीं पत्र दिलें. जांवईबुवांनीं पत्र उघडलें. सारे लोक जांवईबापूंकडे बघत राहिले. जांवईबापूंच्या डोळ्यांत पाणी आलें. घळघळ अश्रू वाहूं लागले. पंगतींत सारे लोक रडूं लागले. सासूबाईनीं तर टाहो फोडला. घरांत एकच रडारडा सुरू झाली.

त्या गांवचे मास्तर रस्त्यानें जात होते. रडारड ऐकून घरांत आले. लोकांना विचारलें, "कां रडतां ?"

जो तो म्हणूं लागला, "जांवईबुवा रडतात म्हणून आम्हीं रडतों !" मास्तरांनीं जांवईबुवांना विचारलें, "तुम्ही कां रडतां ? पत्रांत काय वाईट लिहिलें आहे काय ? कोणी मेलें आहे काय ?" जांवईबुवा म्हणाले, "अहो ! मी जेव्हां शिकत होतों त्यावेळीं "**श्री**" पाटी भरून काढत होतों. पण ती आतां रोडावली. बघा किती लहान झाली ती "श्री" ! म्हणून मी रडतों."

मास्तर म्हणाले, "तुम्हीं इतके लोक येथें जमलांत पण एकलाही लिहायला–वाचायला येत नाहीं. म्हणूनच हा सारा घोटाळा झाला."

लोक म्हणाले, "या पत्रांत काय आहे ? तुम्हीं तरी वाचून दाखवा."

मास्तरांनीं पत्र घेतलें. वाचायला सुरुवात केली.

"समस्त गांवकरी मंडळी यांना रामराम. तुमच्या गांवाला नवीन मास्तर पाठवले आहेत. ते रात्रीची शाळा चालवणार आहेत.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

लिहायला वाचायला शिकविणार आहेत. गांवांत सुधारणा करणार आहेत. त्यांना तुम्ही गांवकरी मंडळी मदत करा. तुम्ही शिकलात तर तुमचाच फायदा होईल. गांवच्या मास्तरांनाही मी याच पत्राची नक्कल पाठविली आहे. कळावें.

आपला ग्राम–सेवक,
आनंदराव जाधव.

---

६. पंढरीची वारी

होय नाहीं करतां करतां ज्ञानोबाचें पंढरीला जायचें ठरलें. निघण्याची तयारी जोरांत सुरू झाली. पैसे जमविलें. नवसे, गवसे आणि हौसे सारे लोक बाहेर पडले. ज्ञानोबानें आपलें गाठोडें उचललें, घरांतील सारीं माणसें त्याच्या पाया पडलीं. गांवांत दिंडी आली. ज्ञानोबा 'विठ्ठल विठ्ठल' तोंडानें म्हणत त्यांत मिसळला. अभंग भजनें बोलत मंडळी पंढरीच्या वाटेला लागली.

एकादशीला विठोबाचें दर्शन घेतलें तर फार मोठें पुण्य मिळतें; म्हणून रात्रीं व दिवसा लोक वाटचाल करीत होते. एकादशीचा सूर्य उगवला. ज्ञानोबा व त्यांचे लोक पंढरपुरांत शिरले. आतां विठोबा रखुमाई पहायला मिळणार म्हणून त्यांना आनंद झाला. ज्ञानोबा तर प्रथमच पंढरपुरांत आला होता. त्याला विठ्ठलाचें दर्शन प्रथम होणार होतें.

वारकरी लोकांच्या टाळांनीं पंढरी दुमदुमून गेली होती. जिकडे तिकडे भगवीं निशाणें फडकत होतीं. ज्याला त्याला विठोबाच्या पायाची ओढ लागली होती. साऱ्यांचीं तोंडें विठोबाच्या देवळाकडे वळलीं होतीं. ज्ञानोबा आपल्या लोकांच्या बरोबर पुढें चालला होता. एकाएकीं ज्ञानोबा आपल्या लोकांतून बाहेर पडले. जातांना म्हणाले, "आलों इतक्यांत. तुम्ही चला पुढें." ज्ञानोबा एका मुतारीजवळ आला. इकडे तिकडे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पाहिलें व आंत शिरला. दोन मिनिटांत बाहेर आला. बाहेर आल्या-बरोबर पोलिसानें धरलें आणि विचारलें, "काय संत, कोणत्या गांवचे ?" ज्ञानोबानें सरळ सांगितलें, "उजाडपुरचा मी. कां ?"

पोलिस म्हणाला, "मुतारीवर काय लिहिलें आहे वाचलंय का ? चला चौकीवर. अहो, ही मुतारी फक्त स्त्रियांसाठींच आहे. लुगडें नेसून गेला असतात तर सुटला असता." ज्ञानोबानें गयावया करून सांगितलें पण त्याचें कोण ऐकणार ? पोलिसानें त्याला नेऊन चौकींत डांबून ठेवलें. सारा दिवस त्याला तेथून सुटतां आलें नाहीं. एकादशीला पंढरीचें दर्शन घडलें नाहीं.

दुसरे दिवशीं ज्ञानोबाला कोर्टांत नेलें. त्याला पांच रुपये दंड झाला. मुंडाशांत बांधलेले पांच रुपये देऊन ज्ञानोबा सुटला व पुन्हां पंढरीच्या देवळाकडे निघाला. वाळवंटांत खूप लोक जमले होते. संत मेळा भरला होता. गाडगेमहाराज, तुकडोजीबुवा, सोनोपंत अशीं मोठमोठीं माणसें हजर होतीं. ज्ञानोबा त्या मेळचांत येऊन मिसळले. संत गाडगे महाराजांचें भाषण चालू होतें. सारे लोक शांतपणें ऐकत होतें. गाडगे महाराज म्हणाले, "शिक्षण ही आजची गरज आहे. एक-वेळ उपाशी रहा पण शिक्षण घ्या. निरक्षर व घाण्याचा बैल यांत काय अंतर आहे. दोघेही जन्मभर चालत असतात पण कधींही पुढें जात नाहींत. आजच्या काळांत शिकला नाहीं तर पावलो पावलीं मान खालीं घालावी लागेल."

ज्ञानोबांच्या डोळचांतून पाण्याचें थेंब ठिबकत होते. मेळा संपल्यावर ज्ञानोबा विठोबाच्या दर्शनाला गेला. पायावर डोकें ठेवलें आणि देवाला सांगितलें; "देवा, आजपासून लिहायला वाचायला शिकेन व इतरांना शिकवीन." ज्ञानोबानें तेथेंच शपथ घेतली.

ज्ञानोबा घरीं गेला. 'विठोबा रखुमाई' लिहायला वाचायला शिकला. आपल्या घरावर मोठचा अक्षरांत 'विठोबा रखुमाई' लिहून ठेवलें. ज्या ज्या वेळीं विठ्ठलाचें भजन चालतें त्या त्या वेळीं ज्ञानोबाला पंढरपूरची वारी आठवते.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

१३. लोकशिक्षणाची गाणीं

१. या भारतांत बंधुभाव

या भारतांत बंधुभाव नित्य वसूं दे । दे वरचि असा दे ।
हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसूं दे । मतभेद नसूं दे ।

नांदोत सुखें गरिब अमिर एक मतानी ।
मग हिंदु असो ख्रिश्चन वा हो इस्लामी ।
स्वातंत्र्य-सुखा या सकलामाजि वसूं दे । दे वरचि० ॥१॥

सकळास कळो मानवता राष्ट्र-भावना ।
हो सर्व स्थळीं मिळुनि समूदाय प्रार्थना ।
उद्योगी तरुण शीलवान दिसूं दे । दे वरचि० ॥२॥

हा जातिभाव विसरुनिया एक हो अम्ही ।
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगांतुनी ।
खळ निंदका मनींहि सत्य न्याय वसूं दे । दे वरचि० ॥३॥

सौंदर्य रमो घर घरांत स्वर्गियापरी ।
ही नष्ट होऊं दे विपत्ति भीति बावरी ।
तुकड्यास सदा या सेवेमाजिं वसूं दे । दे वरचि० ॥४॥

—संत तुकडोजी

२. हातीं नाहीं बळ

(अभंग)

हातीं नाहीं बळ दारी नाहीं आड । त्यांनीं फूलझाड लावूं नये ॥
घालवेना चारा होईना जतन । त्यांनींच गोधन पाळूं नये ॥
सोसता सोसेना संसाराचा ताप । त्यांनीं मायबाप होऊं नये ॥
नाम संकीर्तना गवसेना वेळ । त्यांनीं गळा माळ घालूं नये ॥

—ग. दि. माडगूळकर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

३. घरधनी ऐका

घरधनी ऐका मी सांगतें तुम्हाला ।
माझ्या बाळाला हो शाळेंत घाला ॥
कारभारी ऐका मी सांगतें तुम्हाला ।
माझ्या बाळाला हो शाळेंत घाला ॥ धृ० ॥

जरी असली गरिबी स्थितीही ।
हाल देहाचे झाले तरीही ।
शिकवीन विद्या मी । त्याला हो त्याला ॥१॥

जरी फाटली तुमची पैरण ।
शिवीन मी ती ठिगळ लावून ।
दंड भरीन मी माझ्या लुगड्याला ॥२॥

नको मला ते भरजरी कपडे ।
बरें आहे माझें फाटकें लुगडें ।
दागदागिने ते नकोत मजला ॥३॥

गांधीबाबाच्या आशिर्वादानं ।
बाळ घेईल माझं शिक्षण ।
होईल वकील जयहिंदवाला ॥४॥

माझी विनंती भावा–बहिणींना ।
विद्या शिकवा हो मुलाबाळांना ।
शिक्षणानं उद्धार होईल आपुला ॥५॥

४. पापाची वासना नको

(अभंग)

पापाची वासना नको दावूं डोळा । त्याहूनि आंधळा बराच मी ॥१॥
निंदेचें श्रवण नको माझे कानीं । बधिर करोनि ठेवी देवा ॥२॥
अपवित्र वाणी नको माझ्या मुखा । त्याजहूनि मुका बराच मी ॥३॥
नको मज कधीं अनाचार संगती । जगांतून माती उठता भली ॥४॥
तुका म्हणे मज अवघ्याचा कंटाळा । तूं एक कृपाळा आवडसी ॥५॥

––तुकाराम

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

५. झाला महार पंढरीनाथ

(अभंग)

झाला महार पंढरीनाथ । काय देवाची सांगू मात ।। धृ० ।।
नेसला मलिन चिंधोटी
घेतली हातामंदि काठी
घोंगडी टाकिली पाठी । करि जोहार दरबारांत ।।१।।
मुंडाशांत बांधिली चिठ्ठी
फेंकतो दुरुन जगजेठी
दामाजीनं विकली जी कोठी । त्याचं घ्यावं दाम पदरांत ।। २ ।।
खळखळा ओतिल्या मोहरा
घ्याजी मोजून पावती करा
ढीग बघून चमकल्या नजरा । शहा घाली बोट तोंडांत ।। ३ ।।

—ग. दि. माडगूळकर

७. समाज शिक्षण घेऊं चला

शेतकऱ्यांनो, कामकऱ्यांनो समाज शिक्षण घेऊं चला । घेऊं चला ।।
आजवरी दुसऱ्यांनीं केलें । राज्य आपुल्या देशाचें ।।
स्वतंत्र झाला भारत अपुला । निरोप सकलां देऊं चला । देऊं चला ।।
निरक्षरांना साक्षर करुनी । देशाचें कल्याण करूं ।।
सौंदर्यानें नटवूं खेडीं । उत्तम राहणीं ठेवूं चला । ठेवूं चला ।।
बसणें उठणें टापटिपीचें । स्वच्छ सुंदर घर बनवूं ।।
समुदायानें करुनि प्रार्थना । निर्मत्सर मनीं होऊं चला । होऊं चला ।।
भेदभाव हा जातिपातिचा । विसरुनि जाऊं या पुढती ।।
मानव धर्मा स्थापन करुनी । न्यायनीति वाढवूं चला । वाढवूं चला ।।
तुकड्या-दास म्हणे घ्या ध्यानीं । सुंदर वेळ आली पुढती ।।
देशासाठीं बनू शिपाई शिक्षण । सकला देऊं चला ।। देऊं चला ।।

—संत तुकडोजी महाराज

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

३९०.४
क १३२ नी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai